
म ग्रं सं वाचनालय शाखा ठाणे
विषय नाटक
दा क्र १०३०
IRBK-0101030




IRBK-0101030
IRBK-0101030

सावित्री—नकाहो नका! मला फसवून कसे हो जाता?

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

सूचना :- खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

दा० क्र० १०३०

|| श्री ||

नां. ८८८
ता. 22-2-32

# सं. पुनर्जन्म नाटक.

## ( सावित्री ).

६८०९

## अंक १ ते ३.

लेखक,

**महादेव नारायण जोशी**

स्थानिक-स्वराज्य, आनंद, हास्यतरंग, वऱ्हाडचा पाटील, विनोद,
सत्त्वसाफल्य, करमणूक, मनोरंजन, कर्णार्जुन, कृष्णविजय,
गिरणीवाला इत्यादि नाटकांचे कर्ते.

---

सन १९३१

IRBK-0101030
IRBK-0101030

---

किंमत ८ आणे.

मुद्रकः—गणेश काशिनाथ गोखले,
सेक्रेटरी श्रीगणेश प्रिंटिंग वर्क्स,
४९५-४९६ शनवार पेठ, पुणें नं. २.

प्रकाशकः—गणेश काशिनाथ गोखले,
सेक्रेटरी सरस्वती मंडळ
४९५-४९६ शनवार पेठ, पुणें नं. २

१०३०
न्।२६.

## प्रस्तावना.

पूर्वीच्या जुन्या चालीरीति, धर्मकथा, वगैरे गोष्टींकडे टवाळीच्या दृष्टीनें पाहाण्याची आधुनिक लोकांना संवयच जडलेली असते! व जुन्या भारतीय कथांच्या असंभाव्यपणाबद्दल कुचेष्टेची चर्चा करण्याची त्यांना मौज वाटत असते! इसापनीतींतील गोष्टी खऱ्या नसल्या तरी त्या तात्पर्याकरितांच लिहिलेल्या आहेत व त्याच दृष्टीनें त्या वाचल्या असतां त्यांचें सार्थक होतें! त्या गोष्टींची अरसिकपणें कुचेष्टा करण्याचा जो परिणाम तोंच भारतीय पौराणिक कथांची कुचेष्टा करण्याचाही परिणाम! कारण कांहीं भारतीय कथा जरी असंभाव्य वाटत असल्या तरी सर्व मदार तात्पर्यावरच आहे. त्या कथा धार्मिक भावना न दुखवतां संभाव्य रीतीनें मांडल्या असतां आकर्षक होतील, असें वाटून मी हा अल्पसा प्रयत्न केला आहे. तो कितपत सफल झाला आहे हे माझे प्रेमळ वाचक व प्रेक्षक ठरवितीलच!

हें नाटक अल्पावधींतच रंगभूमीवर आणल्याबद्दल नाट्यकलाप्रवर्तक मंडळीचे मालक मि. रा. गणपतराव भाटे यांचा मी फार आभारी आहें.

पुणें,
ता. ७।५।१९३१ } महादेव नारायण जोशी.

---




सारंग—प्रेमाच्या पिंजऱ्यांतच बंदिवास आवडतो! (अं. १)

संगीत

# पुनर्जन्म नाटक.

( अंक १ ते ३ ).

## अंक पहिला

### मंगला चरण

नमितो पदा कमलावरा । करुणागारा । सकल कला धारा ॥ध्रु०॥ समर्थ नच कुणी तव गुण गाना । वेदही कुंठित घेती मौना । विश्वसूत्रधारा ॥१॥ नाना रुपें नटविसी जीवा । रंगविसी त्यां विविधाभावा । नाट्यकला चतुरा ॥ २ ॥

सूत्रधार—मनाला उत्साह देणारं, धीर देणारं आणि हातीं घेतलेलं कार्य निर्विघ्नपणें तडीस नेण्याला साहाय्य करणारं भगवच्चिंतनासारखं दुसरं साधन नाहीं. प्रिये, चल तर, सर्वत्रांस परिचित असलेले श्रीयुत माधवराव जोशी यांनीं नवीन रचलेल्या पुनर्जन्म अथवा सावित्री नाटकाचा प्रयोग पाहण्याकरितां हे आबालवृद्ध प्रेक्षक कसे अधिर झालेले दिसतात ! तेव्हां त्यांचं अभिनंदन करून नाटकाला सुरुवात करूं !

नटी—आपल्या कार्याला मदत करायला मी निरंतर तत्पर आहेंच. आजपर्यंत सावित्रीच्या कथेवर निरनिराळीं पांच सहा नाटकं झालीं आणि एक दोन होऊं घातलेलीं आहेत. असं असतांना तीच तीच ऐकलेली सावित्रीची कथा पुन्हां पुन्हां सांगून आपल्यावर नेहमीं कृपालोभ ठेवणाऱ्या या प्रेमळ प्रेक्षकांना कंटाळा आणण्यांत काय बरं अर्थ आहे !

सूत्रधार—प्रिये, तुझी शंका अगदीं बरोबर आहे. आणि त्याचा पूर्ण विचार करूनच मीं हें कार्य हातीं घेतलं आहे! समाजाला आदर्शभूत झालेल्या विभूतींचीं चरित्रं आणि त्यांचे गुणानुवाद हे अमृतासारखे अवीट आहेत! फक्त तें नाविन्यानं सांगणारा असला म्हणजे झालं! जगांत नवीन असं कांहींच निर्माण होत नाहीं, नवीन जर कांहीं असेल तर त्याच कथेची मांडणी, ती सांगण्याची पद्धत आणि औचित्य! त्याच कथेकडे जरा निराळ्या दृष्टीनं पाहून तिचं प्रेक्षकांना आवडेलसं निराळं दृश्यचित्र रंगविण्यांतच काय तें कवीचं नाविन्य! आणि म्हणूनच श्री. जोशी यांचं हें दृश्य चित्र प्रेक्षकांना कदाचित आवडण्याचा बराच संभव वाटल्यावरून, मीं हे कार्य हातीं घेतलं आहे. चल तर प्रथम या रसिकांचं......... अरे, पण ही कोण मंडळी इकडे येत आहेत? (दोघे गृहस्थ येतात.)

पहिला—अरे वाः! इथें तर नटीसूत्रधार अगदीं गर्दींत दिसताहेत! नमस्कार, नमस्कार.

दुसरा—काय हो, ही काय नवीन भानगड आहे?

सूत्रधार—आमची भानगड कांहींच नाहीं, आतां तुम्ही काय कराल ती खरी!

पहिला—अरे वाः! तुम्ही तर अगदीं पवित्र्यांत बोलतां हो? अहो पण कळून तर द्या, तुमच्या नाटकाचं नांव!

सूत्रधार—श्री. जोशी यांचें "सावित्री" नाटक—

पहिला—होय ना? बस्स झालं तर मग! आणखी काय पहिजे?

सूत्रधार—कबूल! पण लोकरंजनाच्या दृष्टीनं त्यांत कांहीं सूचना असल्या तर सांगा, मला पटल्या, तर अमलांत आणूं, सांगा सांगा!

पहिला—सांगा काय कपाळ? (दुसऱ्यास) इथं कुणी लेकानं एवढं बारकाईनं लक्ष लावून त्यांचीं नाटकं वाचायचें व पाह्यचे श्रम घेतलें आहेत?

दुसरा—त्यांच्या नाटकांतून बराच भाग गाळून टाकायला पाहिजे. असं आमचं म्हणणं आहे!

सूत्रधार—अहो सज्जन, पण तुम्ही कोण?

पहिला—हे एक कविसम्राट आहेत! निरंतर यांचा अतिशय विद्या-

च्यांशीं निकट सहवास आहे, तेव्हां त्यांचं मत एवढा पुरावा बस्स आहे!

दुसरा—तेवढं कशाला? हे सारे ओटा, पीट, ग्यालरी खुर्चींचे लोक एकसारखे नाटकभर खोखोखो करून हंसत असतात यापेक्षां आणखी काय पुरावा पाहिजे? ज्या ज्या ठिकाणीं हे असले अशिक्षित लोक हंसतात तो सर्व भाग गाळून टाका! आम्ही सांगतों! (पहिल्यास) सावित्रीसारखं भारदस्त नाटक, आणि हे करून दाखविणार? विनाकारण स्पर्धा करताहेत झालं!

सूत्रधारः—कां बरं, सरस्वती आणि नाट्यकला देवी तुमच्या एकट्याच्याच घरीं कायमच्या बिऱ्हाडानं राहिल्या आहेत वाटतं!

दुसराः—उच्च ध्येयाची, उत्कट भावनांची, प्रेमकल्लोळाची—

सूत्रधारः—गायनगोंधळाची—

दुसराः—जगविख्यात पंडितांचीं, कादंबरी लेखनपटूंचीं, राजकारण धुरंधरांचीं, नरशार्दूल देशभक्तांचीं नाटकं एकांतांत करावीं लागून या असल्या नाटकांच्याकरितां लोकांची गर्दी लोटावी, यापेक्षां महाराष्ट्रा, तुझ्या विद्वानांची व नाट्यकलेची अधोगती ती कोणती पाहिजे!

सूत्रधार—अहो कवीकलंक, उत्तम सुताराला जसं सोनारकाम करतां येणार नाहीं, किंवा कुशल सोनाराला जसं सुतारकाम साधणार नाहीं, किंवा परिटाला जसं कुंभारकाम कधीं यायचं नाहीं; तसंच, या नाटकाचंही आहे! राजकारणी, कादंबरी लेखक, एडीटर, वक्ता, जरी जगविख्यात पंडित असला तरी तो उत्तम नाटककार ठरेलच असं मुळींच नाहीं. वर्तमानपत्रांतील लेखांचं, मासिकांचं, कादंबरीचं जाडंभरडं सूत काढणाराला नाट्यकलेचं नाजूक जरतारी काम करतां येईलच असं नाहीं! बरं, केवळ नाट्यकलेचा व्यासंग ठेवणारा प्रत्येक कवी उत्तम नाटककार ठरेल असंही पण नाहीं! एका दृष्टीनं पाहिलं तर कवीचं आणि कुंभाराचं काम सारखंच!

दुसरा—म्हणजे आम्ही कुंभार आहोंत असं स्पष्टच कां म्हणानात!

सूत्रधार—म्हटलं असतं, पण नाट्यशास्त्रावरील आपलं अगाध ज्ञान पाहून, आपण त्याच्या इथले चिखल तुडविणारे आहांत असंच मला वाटतं! तेव्हां तुम्हांला कुंभाराची पदवी तरी कशी देऊं?

पहिला—अरे वा! हा गृहस्थ कुंभार, टोणगे, गाढव म्हणून स्पष्ट शिव्या देऊं लागला?

सूत्रधार—बाकी तुम्हां टीकाकारांची, लब्धप्रतिष्ठित बहुरूप्यांची आणि घमेंडानंद अर्ध-हळकुंडरंगीत कवी-सम्राटांची मला मोठी मनापासून गंमत वाटते कीं ज्या नाटकांचा उदय व अस्त एकदम एकाच रात्रीत होतो, किंवा ज्यांच्या प्रसूतीकाळीं केवळ कवीरूपीं आई, कंपनीरूपी सुईण, आणि कवी-कंपनीच्या हितचिंतकरूपी दोन चार शेजारणी येवढ्याच हजर असतात, असल्या नाटकांची स्तुति करतांना तुम्ही मारे लाळेनं ऊर भिजवून सोडतां, आणि ज्या नाटकांचीं सारखीं आवर्तनं होत असतात, अशांचा सारखा मत्सर, द्वेष करून तिरस्कारानं नाकाचे शेंडे कपाळाला टेंकवितां! काय हो, असा का देवानं तुमच्या अकलेचा कोंडमारा केला आहे?

पहिला—काय हो? तुम्ही तर भरमसाट घसरलांत कीं आमच्या कवी-सम्राटावर? (दुसऱ्यास) हे बघा जाऊं द्या, आपण आतां मिटतं घेऊं! बरं पण या तुमच्या नाटकामध्यें, पातिव्रत्य, प्रेम, शृंगार, करुणरस वगैरेंचें कांहीं उत्तम प्रसंग असले तर सांगा, म्हणजे आम्हीही येतों.

दुसरा—हो, पण अट एक–कोणत्याही माणसानं हंसता कामा नये!

सूत्रधार—बहुतांचं बहुतरंजन हें माझं ध्येय आहे! आणि तो निकाल माझे प्रेक्षकच देतील. हे पहा, तुम्ही या भानगडींत मुळींच पडूं नका! मनुष्य एक वेळ जेऊन तृप्त झाला, म्हणजे तो जसा सूपशास्त्राच्या नियमानुसार पदार्थांना मसाले घातले होते कीं नाहीं याची शहानिशा करून तो जसा अभिरुचीचा निकाल ठरवीत नाहीं, त्याचप्रमाणें या नाटकां-चंही आहे! हें पहा, तुम्ही माझा निष्कारण वेळ घेतलांत! तुम्हांला वाटलं तर या, नाहीं तर तुमचा मार्ग तुम्हांला मोकळा आहे.

दुसरा—(पहिल्यास) मार्ग मोकळा आहे तो ठाऊक आहे, पण आतां घरीं कशाला परत जातों म्हणा! आधींच थिएटरवाल्याकडून पासाची तजवीज करून ठेवली आहे, दोन चार एडीटर्सही मिंधे करून ठेवले आहेत! आणि जरी नाटक आवडलं तरी असा खरबुजासारखा चेहरा करून टीकेचा भडीमार करतों, तुम्ही काय समजलां आहांत?

पहिला—हो, नाहीं तर आम्ही टीकाकार कसले !

सूत्रधार—ठीक आहे, घ्या समाचार ( दोघे जातात. ) प्रिये, साशंक होण्याचं कांहीं कारण नाहीं. या असल्या प्राण्यांच्या शापांत गाईचं मरण नसतं! चला तर, प्रथम या रसिकजनांचं वंदन करून नाटकाला सुरुवात करूं.

पद २ रें.

नमित रसिका जना सज्जना । चेतविती जे काव्य कल्पना ॥ ध्रु० ॥ सदय पयोधर कवी मयुराचे । तुम्हां निरखुनी कवी करी गाना ! ॥१॥ अभिवादन करी माधव मोदें। कमलनाट्य लोलुप भृंगांना ॥ २ ॥ आजवरीचा ठेऊनी प्रेमा। श्रवण करा या अल्प वचांना ! ॥ ३ ॥

---

## प्रवेश १ ला.

[ स्थळ—राजवाडा, दरबार. ]

रणदुंदुभी—चाणाक्ष, मी प्रत्यक्ष माझा अनुभव सांगतों, अचुक मत्स्यभेद, जलयंत्रभेद, नादभेद, अदृश्यभेद, वगैरे सर्व धनुष्यबाणांच्या करामतींत सावित्रीनं चांगल्या चांगल्यांना मान डोलावणं भाग पाडलं आहे-भरधांव घोड्यावर बसलेल्या असतांना पक्षांचा जीव घेणाऱ्या बहिरीससाण्याला नेमकं बाणांनीं, त्यांनीं मारलं आहे. ( एकीकडून शृंखला व दुसरीकडून कांक्षिणी येते. ) याला म्हणावं शरसंधान !

कांक्षिणी—( शृंखलेस ) माझ्याकडे पाहून नकोहो कुचेष्टेनं हंसायला.

शृंखला—छे हो, म्हटलं आज शरसंधानाला सुरुवात होऊन जवळ जवळ तीन तपं होत आलीं, अगदीं दरघडीला माना वेळतांना या भृकुटिकार्मुकांतून, नेत्रबाण इकडेतिकडे सारखे सैरावैरा सुटताहेत, पण बाई नवल वाटतं, अजून चुकूनदेखील एखादा बहिरीससाणा कसा जखमी झाला नाहीं !

कांक्षिणी—पहाते, पहाते हों! कोंण नरपुंगव ही शृंखला गळ्यांत अडकवून घेणार आहेत ते!

रणदुंदुभी—दोन बायका एका ठिकाणीं क्षणभर जवळ जवळ आल्या कीं झालीच कलहाला सुरुवात! तोंड आटपा, हे पहा, सरकारस्वारी आणि राणीसरकार इकडंच येत आहेत!

( अश्वपती, मालवी, व भालदार, चोपदार, येतात, चाणाक्ष व रणदुंदुभी मुजरा करतात. )

अश्वपती—देवी, राजे लोकांची सत्ता, प्रजेला अमर्याद वाटत असतें, परंतु ती प्रजेला वाटणारी सत्ता किती मर्यादित असते, भ्रामक असते, याची जाणीव रत्नमुगुटाखालीं ज्याचं डोकं असतं त्यालाच असते! प्रजेच्या असंतुष्ट हृदयांतील वाणीरूपी लहरींचे आघात, सिंहासनाला किती डळमळीत करतात हें प्रत्यक्ष सिंहासनावर बसणाऱ्यालाच जास्त कळतं!

मालवी—अठरा वर्षांच्या कडकडीत तपश्चर्येचं फळ म्हणजे मूर्तीमंत सावित्री, अलीकडे काळजी आणि संकट, या रूपानं माझ्या डोळ्यासमोर उभी राहिल्यासारखं मला तर वाटतं!

अश्वपती—उपायांची आजपर्यंत मीं परमावधी केली, सध्यांही करीत आहे! देशोदेशीं दूत पाठवून पूर्ण चौकशी केली, त्यांतही यश आलं नाहीं, शेवटीं मीं स्वतः तें कार्य अंगीकारावं, अशी माझी इच्छा आहे! तसं करूनही जर कांहीं झालं नाहींच तर शास्त्राज्ञेप्रमाणें मला करणं भाग आहे. आणि शास्त्राज्ञेचे ते कठोर शब्द या वेळेस मीं मुखाबाहेर काढूं इच्छित नाहीं!

मालवी—नका—नका—त्यांचा उच्चार मला केव्हांही ऐकवूं नका! मला एक उपाय सुचतो तेवढा सांगतें. आम्हांला या वेळीं जो कोणी सुलक्षणी जामात लाभेल, त्याला सर्व राज्य देऊन आपण उभयतां राहिलेलं आयुष्य तपाचरणांत आणि ईश्वरचिंतनांत घालविणार, असं जगजाहीर करा ना!

अश्वपती—देवी, पृथ्वीमोलाच्या लावण्यखाणी सावित्रीचं पाणिग्रहण करणारा ऐहिक संपत्तीच्या लोभांत पडेल असं मला मुळींच संभवनीय

वाटत नाहीं ! कस्तुरी हस्तगत झाल्यावर राज्यरूपी मृत्तिकेच्या ढेकळाची कोण हांव धरील ! ( भालदार येतो. )

भालदार—( मुजरा करून ) राजाधिराज, आपल्या आज्ञेनं गेलेले सरदार मतंगज आपल्या दर्शनाची परवानगी मागत आहेत !

अश्वपती—ठीक आहे, जा त्यांना समोर घेऊन ये. अजून आशेला थोडासा धीर वाटत आहे, काय मतंगज, काय वर्तमान आहे!

मतंगज—महाराजांचा जयजयकार असो ! आपल्या आज्ञेप्रमाणें आपल्या राजमुद्रांकित पत्रिका घेऊन उत्तर भरतखंडांतील सर्व राजे लोकांच्या इथं जाऊन आपली निमंत्रणपत्रिका सादर केली. तसंच राजकन्येची प्रतिमाही दाखविली, प्रतिमा पाहातांच अनेकांनीं राजकन्येस अनेक मंगल आशिर्वाद दिले !

मालवी—परमेश्वर त्यांचं सदैव कल्याण करो.

मतंगज—देवी सावित्रीच्या वरप्रसादानं प्रत्यक्ष देवीनंच आपल्या पोटीं जन्म घेतला असल्यामुळं, प्रतिमेकडे दृष्टि टाकतांच सद्गदित अंतःकरणानं प्रतिमेंतील पदकमलाचं चुंबन घेऊन " हे जगत् जननी " असं गहिंवरून बोलले !

मालवी—हायरे देवा, या भरतखंडांत माझ्या कन्येचं पाणीग्रहण करण्यास योग्य राजपुत्र निर्माणच होऊं नये का ?

अश्वपती—देवी, आपला शोक आपण आवरून थोड्या शांत व्हा ! चाणाक्ष, रणदुंदुभी आपल्याकडील वर्तमान अशाच प्रकारचं आहेना ?

चाणाक्ष—महाराजांना मागील सर्व वर्तमान विदित केलंच आहे. अलीकडील सर्व वर्तमान प्रत्यक्ष दूतांच्या वाणीनं आपण ऐकतच आहांत, यापेक्षां मी काय जास्त सांगणार ?

रणदुंदुभी—महाराजांची आज्ञा असेल तर या क्षणींच स्वारीवर निघून सर्व भरतखंडातील राजपुत्रांची दावण बांधून—

अश्वपती—पुरे करा ! सावित्री देवीच्या समोर, भरत खंडातिल राजपुत्रांचे बळी मला देण्याचे असते तर ते यापूर्वी मी केव्हांच दिले असते! समजलों

चोहोंकडील वर्तमान एकच. परमेश्वराच्या मनांत माझी सत्व-परीक्षा पहाण्याचं आहेसं दिसतं! परमेश्वरच यांतून मार्ग दाखविण्याला समर्थ आहे!

भालदार—महाराजांचा जयजयकार असो! महाराज, नारद महर्षींची स्वारी इकडेसंच येत आहे!

अश्वपती—प्रत्यक्ष परमेश्वरच या संकटांतून सोडविण्याकरितां धावून येत आहेसं वाटतं— (नारद भजन करीत येतात.)

नारद—

**पद ३ रें.**

**पावन नाम तुझे रघुराया ॥ ध्रु० ॥ दुरित निवारिसीं निजदासांचे। देसी ठाया पाया। सदया ॥ १ ॥ चुकुनि पद पडे अग्नीवरी जरी। जाळितसे तो काया। सदया ॥ २ ॥ कोणी कसेही नामा घेवो। नेसि पापा विलया। सदया ॥ ३ ॥ तुजहुनि नामा गुरुतर महिमा। येशील तूंही न कामा। सदया ॥ ४ ॥**

अश्वपती—सर्व विश्वांतील जीवांचं मंगल करणारे परमेश्वराचे अत्यंत लाडके भक्त आज केवळ माझ्या सुदैवानंच इकडे वळले. भगवन् मीं आपणाला अभिवादन करतो! या आसनावर बसावं. भगवन् आज या चरणदर्शनानं किती आनंद झाला म्हणून सांगू!

मालवी—तहानेनं व्याकूळ झालेल्या चातक पक्षाच्या मुखांत अकल्पित स्वातीबिंदुच पडले हे! शृंखले, मुनिवर्योची स्वारी आल्याचं सांगून सावित्रीला दर्शनास येण्याविषयीं सूचना दे. (शृंखला जाते.)

अश्वपती—महाराज, आज आपलं अवचित कसं आगमन झालं?

नारद—राजा, या भूतलावर पवित्र तिर्थांचं व सत्वशील सत्पुरुषांचं दर्शन, व ईश्वरचिंतन हाच आम्हां तापसीजनांचा मुख्य आयुष्यक्रम असतो! तुझ्यासारख्या सत्वप्रिय आणि धर्मनिष्ठ राजाचा क्षणभरच का सहवास घडेना, तो तीर्थवासाप्रमाणंच आम्हांला सुखकर वाटतो, तशांतून तुझ्या उदरीं जन्म घेतलेल्या कन्येचं दर्शन म्हणजे प्रत्यक्ष लक्ष्मीचंच दर्शन

होय, असं एकाएकीं मनांत येऊन, आपल्या डोळ्यांचं पारणं फेडण्याकरतां निघून आलों !

अश्वपती—भगवन् हा केवळ मजवर आपला अनुग्रहच आहे.

नारद—राजा, मीं आल्यापासून आपल्या उभयतांच्याहि मुखावर मधून मधून खिन्नतेची छाया दिसते आहे! सांग, सांग, संकट सांग, भगवत् कृपेनं सर्व संकट दूर होईल.

अश्वपती—भगवन्, सावित्री उपवर झाली असून, वरसंशोधनाची आम्ही पराकाष्ठा केली, पण कोणीही माझ्या कन्येचं पाणिग्रहण करण्यास उत्सुक दिसत नाहीं.

मालवी—आज आमच्या परमभाग्यानं, आपले चरण इथं लागले आहेत, तरी या संकटाचा सोक्षमोक्ष झाल्याशिवाय, मी हें चरण सोडणार नाहीं. ( सावित्री येते. )

अश्वपती—( सावित्रीकडे बोट करून ) महाराज,ही एकच चिंता रात्रं दिवस आमचं काळीज करपवून टाकीत आहे !

सावित्री—परमेश्वररूपीं माझी मातापितरं, कोणाकरतां बरं काळजींत आहेत ? ( नारदांना नमस्कार करते. )

नारद—चिरायुभव ! भगिनी सावित्री--

मालवी—काय, भगिनी ?

नारद—यांत नवल ते कसलं ? ब्रह्मदेवाच्या इच्छा मात्रें माझा जन्म झाला असून, सावित्री देवीच्या कृपाप्रसादानं तुला ही कन्या लाभली आहे तेव्हां ही माझी भगिनीच नव्हे कां ?

सावित्री—प्रतिसृष्टी निर्माण करण्याचं ज्यांचं सामर्थ्य, त्यांनींच या सृष्टींतल्या एकाद्या राजाच्या अजाण मुलीला, भगिनी म्हणून संबोधावं, यांत मुनिवर्यांच्या दयाळू अंतःकरणाचीच सर्वत्रांना साक्ष पटत आहे ! महाराज,आपल्या दासांचीही दासी ही सावित्री आपणांला अनन्य प्रणाम करते. ( नमस्कार करते ).

नारद—कल्याण, कल्याण ! राजा, त्रिभुवनाचं सौंदर्य जिच्या ठिकाणी एकवटलेलं आहे, अशा त्रिभुवन सुंदरीचं पाणीग्रहण, कांहीं दुर्गुण करू

मांत रुतलेल्या युवराजांनीं केलं नाहीं; म्हणून चिंता ? मर्कटांनीं मोत्याचा अव्हेर केला म्हणून चिंता ? हिच्यासारखीं सत्‌शील कुमारी म्हणजे मूर्तीमंत पार्वतीच होय ! अशांच्या दर्शनानं अमंगलांचही मंगल होतं, हिच्या लग्नाची तुम्हाला मुळींच चिंता नको !

अश्वपती—पण आमचे सर्व परिश्रम कसे निष्फळ झाले, हे आपल्याला मीं सांगितलंच आहे.

नारद—राजा, तुम्ही हिच्या पतीची निवड करण्यापेक्षां पतीची निवड तुम्ही हिच्यावरच कां सोपवीत नाहीं ? प्रौढ आणि तरुण अंतःकरणाच्या आवडीनिवडीची जड जोखीम तुम्ही आपल्या शिरावर कां घेतां ?

मालवी—काय, मुलीनं स्वतः पतीची निवड करायची ?

नारद—कां करूं नये ? वराला जसा अधिकार आहे, तसा प्रौढ वधूलाही कां असूं नये ? राजा, देवी पार्वतीनं आपल्या पतीची निवड आपण होऊनच नाहीं का केली ? देवी लक्ष्मीनं आपल्या आवडीनच श्रीविष्णुच्या कंठांत नाहीं का माळ घातली ? राजा, वधूला जर वर पसंतीचा अधिकार नसतां तर स्वयंवर हा शब्दच मुळीं अस्तित्वांत आला नसतां ! स्वयंवरांत मुख्य वर पसंती वधूकडेच असते, आणि म्हणूनच म्हणतो राजा, आपल्या पतीची आवड निवड करण्याची ही संधी ह्या प्रौढ सावित्रीवरच सोपविणं जास्त चांगलं !

अश्वपती—मुनिवर्यांचा उपदेश योग्य आहे ! राजकन्ये सावित्री, तुझ्यासारख्या धूर्त आणि चतुर मुलीच्या लक्षांत, हें सर्व आलंच असेल. तूं प्रौढ आहेस, सूज्ञ आहेस, चतुर आहेस, तुला आपल्या कुळाचा पूर्ण अभिमान आहे. माझी तुला अशी आज्ञा आहे कीं, उदईक प्रातःकालीं, राजकुलाला शोभेल अशा लव्याजम्यानिशीं—तुम्ही स्वतः वर पसंतीकरितां नगराबाहेर पडावं, आणि आपल्या पतीची योग्य निवड करावी !

मालवी—होय बाई, कदाचित् प्रत्यक्ष तुला पाहिल्यानं वरपसंती जास्त सुलभ होईल !

ना १६८

सावित्री—मुनिवर्यांचं वचन, आणि माझ्या प्रेमळ मातापितरांचं वचन, मी वेदवाक्यच समजतें. महाराज, आपली आज्ञा ही सावित्री शिरसावंद्य मानीत आहे, पण नगरउल्लंघनापूर्वी आपण आपल्या ह्या कन्येच्या शंकेचं निरसन करावं येवढीच प्रार्थना आहे !

अश्वपती—विचार, विचार, तुझी शंका खुशाल विचार ! तुझ्या गुणाला योग्य असा पति तूं स्वतःच शोधून मला कळीव, म्हणजे मी त्यास अत्यंत संतोषानं कन्यादान करीन.

सावित्री—महाराज, आजपर्यंत आपल्या ममतेच्या पंखाखालीं मी वाढलें आहे ! उभयतांच्या जीवांवर, जगाच्या परिस्थितीला पारखी राहून मी खेळलें, बागडलें आहे, मला जगाचा अनुभव नाहीं ! माझ्याकडून शक्य तितकं मी जपूनच पाऊल टाकीन, तथापि, मीं एकदां निवड कळविल्यावर ती आपल्या दर्जाला, आपल्या मर्जीला योग्य न वाटल्यास आपण माझेकडून वचनभंग तर कराविणार नाहीं ना ?

नारद—सावित्री, तुझ्या दूरदृष्टीचं आणि चातुर्याचं मला कौतुक वाटतं.

सावित्री—मन्वकुलांतील जितेंद्रिय सत्यवचनी क्षत्रिय राजाच्या पोटीं आलेल्या सावित्रीनं वचनभंग केला, असा माझा दुर्लौकिक होण्यापेक्षां, आपली जी आवड असेल, तीच माझी आवड करण्यास माझी पूर्ण तयारी आहे !

### पद ४ थें

**आवड जी आपणाला । माझ्या रुचविते मनाला ॥ ध्रु० ॥**
**वर पसंत तुम्हीं जो केला । कुलशीलवान जो गमला ।**
**मी मानीन देवची त्याला । काया वाहुनी तयाला ॥ १ ॥**

अश्वपती—सावित्री, हा सत्यप्रतिज्ञ तुझा पिता, तुला आनंदानं आपला पति निवडण्याची आज्ञा करीत आहे ! क्षत्रिय कुलांतील तूं निवडलेला पति जरी अत्यंत गरीब असला तरी कन्यादानाचें वेळीं हा तुझा

पिता त्याचे हातांवर राज्यदानाचेंही उदक सोडून त्याला सार्वभौमपदांस नेण्यास समर्थ आहे, जा !

नारद—सावित्री, पावित्र्य आणि पातिव्रत्य, हें असिधाराव्रत आहे ! ह्यांतून तो दयाळू परमेश्वर तुला सुखरूप निभावून नेवो. अशीच त्या परमेश्वराजवळ माझी प्रार्थना आहे.

सावित्री—मातापितरांचं आणि त्रिभुवनवंद्य साधूंचं,आशीर्वादांचं अभेद्य कवच माझ्या सभोंवतीं असल्यावर ही सावित्री, पावित्र्य आणि पातिव्रत्याच्या तीक्ष्ण तलवारीच्या धारेवर चालण्याचं दिव्य करायला मुळींच डगमगणार नाहीं !

---

## प्रवेश २ रा.

( स्थळ—रस्ता. पात्रें—प्रणयसिंह व काळवीट. )

प्रणयसिंह—सावित्रीला निरोप देण्याकरितां राजवाडयांत नगरवासी यांची मुंग्यासारखी रांग लागली आहे ! लष्करचे सेनासारंग, शिपाईप्यादे, आपापले, ढाल, तलवार, भाले, परशु, साफसूफ करूं लागले आहेत- नाना प्रकारचे लोक नाना प्रकारच्या कामांत गुंग झाले आहेत, ही संधि साधून मीही आपलं काम करून आलों ! हो, न जाणो राजकन्येबरोबर आमची रवानगी झाली तर ? प्रणयसिंहा, शंखशिरोमणे, भोग बाबा आपल्या कर्मांचीं फळं आतां ! वीसपासून पंचविशीच्या ऐन उमेदींत, चांगले आईबाप इष्टमित्र, लग्न कर, लग्न कर म्हणून आग्रह करीत होते, पण त्या वेळेस मला आठवली होती अवदसा ! मीं आपल्या पायावर उभा राहिल्याशिवाय लग्नच करणार नाहीं, म्हणून त्या वेळेस दिलीं उत्तरं ! सांगून आलेल्या गौरीसारख्या दुसऱ्यांच्या मुलींत हजार दोष काढून लावल्या वाटेला ! आणि आतां या मिशा उरावर लोळूं लागल्या; तेव्हां डोळे उघडले ! आतां डोळे उघडल्यावर पहावं, तो तेल गेलं, तूप गेलं, आणि हातीं जन्मभर धुपाटणं येण्याचा रंग दिसतो आहे! पहावं, सध्यांच्या योजनेंत कितपत यश

येतं तें! एकवेळ सोडून दहा वेळां मनांत येतं कीं, सरळ जाऊन सेनासारंगानाच सौभाग्य-कांक्षिणीची मागणी घालावी, पण तो पडला यमाजीभास्कर! न जाणो, त्यानं मी हा लहान तोंडीं मोठा घांस घेतलेला पाहातांच दोन श्रीमुखांत लगावून, आमच्या राहिलेल्या दांतांचं बिऱ्हाड बाहेर काढलं, तर काय करतां? म्हणून हा असा नाजूक ठिकाणाहून शह देऊन पहातों. इतक्यांतच रेशमी पिशवींत पत्रिका ठेऊन आलों. या वेळेस जशी मला कोणीही असली तरी चालेल, त्याचप्रमाणं, कांक्षिणीच्याही लग्नाची लांबण लागल्यामुळं, तिलाही पण कोणीही असला तरी चालेल! या माझ्या समजुतीमुळें, मीं तिच्यावर हा पत्रिकेचा मारा सुरू केला आहे, तिचं मनोहर रूप जरी मी या डोळ्यांत अखंड सांठवून ठेवतों आहें, तरी पण तिला मात्र पत्रिका कोण पाठवतो याचा मुद्दापत्ता लागू दिला नाहीं. प्रथम पत्रिकेंचा जादू तिच्यावर किती चालतो याचा रागरंग पाहून नंतरच प्रगट व्हावं! अरे, पण हा कोण लपत छपत इकडे येत आहे? अरे, हा तर काळवीट, आपण थोडं आड होऊं. हा देखील माझ्यासारखाच कांहीं तरी भानगडींत दिसतो आहे. (एका बाजूला लपतो.) (काळवीट येतो.)

**काळवीट**—एकपत्नी-व्रतासारखं दुसरं व्रतच नाहीं, तो माझा कल्पतरु, माझ्या संसाराची गोड फळं धारण करणारा तो माझा आम्रतरु, मदनाच्या उन्हाळ्यानं शरीरसंतप्त झालं असतां माझ्यावर शीतल छाया करणारा, तो माझा हंसरा जाईचा लताकुंज मला सोडावा लागून, सावित्रीच्या लव्याजम्यांत तर माझी रवानगी होणार नाहीं ना? तें माझं भूत, तें माझं वर्तमान, तें माझं गोड भविष्य, माझ्या डोळ्यांसमोर कसं अखंड उभं आहे.

**प्रणय०**—(स्व०) बिचारा हा काळवीट, या प्रणयसिंहासारखाच ललनेच्या दंडकारण्यांत मदनाच्या व्याधानं जबरदस्त घायाळ झालेला दिसतो! समदुःखी म्हणून जाऊन डोळे पुसूं का? पण नको, आम्हा दोघांनाही घायाळ करणारा, दोघांचींही हृदयं विदारण करणारा एकच व्याध असला तर!

**काळवीट**—काय करावं, मी रणदुंदुभीच्या बरोबरीचा नसल्यामुळं

आणि तो तर नुसता अग्यावेताळ असल्यामुळं, माझ्या लाडक्या जादूगाराबद्दल, सौभाग्यवांछिनीबद्दल, त्याच्याजवळ मागणी घालायला, माझी जीभच वळत नाहीं काय करावं !

प्रणय०—छे, आतां मात्र संशयच नको ! माझ्या डोळ्यासमोर भर दिवसां तारे तुटायला लागले, कानांतून ठिणग्या उडायला लागल्या, छे शंकाच नको, थोडीशी विश्रांतीला म्हणून मीं इतक्या भगीरथ प्रयत्नानं जागा शोधून काढली, तो वांटणीच्या ऐन वेळेस आपला भाऊबंद उभा ! काय करूं रे, या वेळेस दोन्ही हात धनुष्यबाणानं अडकून पडले आहेत, नाहीं तर दाखवला असता तुला मजा ! या हरामखोराचा जाऊन गळा दाबूं का ? छे, तोही पण अविचारच ! कारण हा मजबूत तरणाबांड मलाच जमीनदोस्त करायचा ! हो, पण ती याला सोडून माझ्यासारख्या मध्यम वयस्कराला कशी माळ घालणार ? हो, ऊंस धडधडीत दिसत असून, हें गाजर कोण खाणार ?

काळवीट—हे चारुगात्रे ! मनोरमे ! मिनाक्षे ! अरे पण, माझें स्वगत भाषण हा कोण ऐकतो आहे, अरे, हा तर प्रणयसिंह ! अहो, नमस्कार !

प्रणयसिंह—नमस्कार, नमस्कार ! ( स्वगत ) आणलीस खरंच बाबा नमस्कार घालायची पाळी मला.

काळवीट—तुला काय थट्टा करायला होतंय ( श्वास सोडून ) खरी पाळी मला आहे.

प्रणयसिंह—कां रे, असा दीर्घ श्वास सोडून चेहरा अगदीं सपाट केला आहेस ( श्वास सोडून ) हं, खरं आहे बाबा !

काळवीट—तुझा देखील चेहेरा जमीनदोस्त दिसतो आहे!(श्वास सोडून) हं खरं आहे बाबा ! हो, दोघांनाही एकच व्याधी, तेव्हां चिन्हं सारखींच असायची, आणि एकच औषध लागू पडायचं !

प्रणयसिंह—( स्वगत ) याचा प्रत्येक शब्द कसा जिव्हारी लागतो आहे ! ( उघड) कायरे, तुझं कारण तर मला कळूंदे !

काळवीट—काय सांगू, प्रणयसिंहा, एका कोळणीनं, एका धीवर-

कन्येनं, एका मत्स्यगंधेनं, आपल्या नेत्रकटाक्षानं घायाळ करून आपल्या हास्यजालांत पकडून ह्या माशाचा तिनं कसा छळ मांडला आहे !

प्रणयसिंह—काय ? काय ? कोळणीनं ?

काळवीट—प्रणयसिंहा, जगांतील सर्व सुंदर स्त्रिया माझ्या मतें कोळणीच आहेत ! माझी बिशाद काय ! सुंदर नदीचा प्रवाह वाहतो आहे, मध्येंच एक मोठा डोह आहे, जवळच खडक आहे, आकाशांतील चंद्रमा नीळसर पाण्याच्या समुद्रांत मारें पोहतो आहे, मंद वारा सुटला आहे अशा वेळेला जर माझी मीनाक्षी, खडकावर उभी राहून, तिनं जर नुसती गालाला चिमकुली खळी पाडून, ओंठांला हंसवलं, पैजणांना वाजविलं, हातांनीं बोलावलं, आणि डोळ्यांनीं खुणवलं, तर आसपासचे सर्व लहानमोठे मासे पाण्यांतून उसळी मारून तडातड तिच्या टोपलींत शिरून बसतील ! अगदीं टोपली पालथी करून हपटली तरी निघायचे नाहींत ! काय सांगू प्रणयसिंहा.—

पद ५ वें.

हृदीं या भरुनी राहे सुगात्री, तीच मनहरणी ॥
नाचे सदा ती नयनीं माझ्या, चारु प्रियकरणी ! ॥ ध्रु० ॥
पाहतो जो ठाई ठाई, रुप ते नयनीं या पाही ॥
दिसेना रिकामे मजसी स्थल जे, ती जिथें नाहीं ॥ १ ॥
हीही माझी, तीही माझी, भावना हृदयीं होईरे ॥
हरपले सकल नाते मनाचे, आपपर नाहीं ॥ २ ॥
आठवेना वळुनि ललना, पाहिली जी कधीं नाहीं ॥
अष्टवक्रा, काळी गोरी, असो ती कोणी कैशीही ॥ ३ ॥
असो राजी, नसो राजी, असो वा ती कुणी आजी ॥
भेदभावा मुळी न धरिले, भिन्नता नाहीं ! ॥ ४ ॥
सकल ललना व्यापुनि जी, मूर्त रूपें प्रिया दिसली ॥
हृदयीं खिळलीं नयनी भरली, दशांगुलें उरालि ! ॥ ५ ॥

(श्वास सोडून) हं पण तुझं कसं काय !

प्रणयसिंह—माझं काय बाबा विचारतोस ? माझंही तुझ्यासारखंच झालं आहे. पण काळवीटा, हें बघ, माझी सर्व मदार तुझ्यावर आहे.

काळवीट—ती कशी काय ? कायरे माझ्या मदतीशिवाय, माझ्या प्रसंगावधानीपणाशिवाय तुझा निभाव लागणार नाहीं म्हणतोस ? ठीक आहे, अरे असं सत्पात्रीं दान कोण करणार नाहीं ? अरे,तुला माझ्या दानशूरपणाची कल्पनाच नाहीं !

प्रणयसिंह—( स्वगत ) जर मी याच्यापेक्षां बळवान असतों, तर याला जमिनींत पुरून वर देऊळ बांधून मोकळा झालों असतों.

काळवीट—वयस्का, जीर्ण प्रणयसिंहा, असा घुटमळूं नकोस ! माझं सामर्थ्य तुझ्या कारणीं लावायला मीं तयार आहें, बोल, अगदीं मन मोकळं करून सांग.

प्रणयसिंह—(स्वगत) सर्वच मिळकतीचा नाश होण्याची पाळी आली, म्हणजे जे पंडित आहेत,ते अर्ध्या मिळकतीवर पाणी सोडतात असं म्हणतात. ( उघड ) हे पहा काळवीटा, तूं बलिष्ठ आहेस, तरुण आहेस, सुंदर आहेस ती तुझ्यावरच जास्त मोहून जाईल, तुझ्यावर प्रेम करील, तुला जीवप्राण करील, तें उघडच दिसतं आहे ! पण मी तुला असं विचारतों कीं,—

काळवीट—ती चारुगात्रीं माझा प्राण आहे ! विचार, विचार—

प्रणयसिंह—कायरे तूं एकपत्नी व्रत कडकडीत पाळणारा आहेस ?

काळवीट—हें काय विचारतोस ? त्या व्रतांत तशीच जादू आहे.

प्रणयसिंह—कायरे काळवीटा, तुझ्या माझ्यांत कांहीं तरी अटींवर तह घडवून आणून,आपल्या उभयतांनाही एकाच ठिकाणीं गुण्यागोविंदानं नांदतां येणार नाहीं का ? दोघांही गारोड्यांना एकच जादू करून दाखवतां येणार नाहीं कां ? दोघांही गारोड्यांना एकच पुंगी नाहीं का वाजवतां येणार ? हें बघ नाइलाजानं तुझ्या शक्तीकडे पाहून मीं आपला हा उपाय शोधून काढला आहे !

काळवीट—हां हां, प्रणयसिंहा, तोंड संभाळ, एका पत्नीला आणि दोन पति ?

प्रणयसिंह—होयरे, आणि ते दोघेही एकपत्निव्रतस्थ !



**सावित्री**—या चरणीं माझ्या आत्म्यानें केव्हांच उडी घेतली आहे ! (अं. १)

काळवीट—काय, त्या स्वर्गीय फुलाचा वास तुला देऊं म्हणतोस? या काळवीटाची भावी अर्धांगी, ती माझी जीवप्राण-हरणी—

प्रणयसिंह—( स्वगत ) अरे हा तर हरणीकरितां मरतो आहे! बरं झालं, मी शिरसलामत निभावलों. माझा संशय साफ खोटा ठरला.

काळवीट—काय, माझ्या हरीणीच्या भागीदारींत तुला वृद्ध गाढवाला घेऊं म्हणतोस! थांब, तुझा आतां प्राण घेतो, ती केशराची पेंढी तुला रासभाला खाऊं घालूं म्हणतोस!

प्रणयसिंह—हें पहा काळवीटा! बाबा, तुझी नाखुषीच जर असेल तर मी माझं बोलणं परत घेतों.

काळवीट—बस ते कांहीं-नाहीं, नुसतं बोलणं परत घेऊन भागणार नाहीं, मीं सांगतों तें कबूल करून, शपथ वहात असलास तरच तुला जीवदान देतों!

प्रणयसिंह—तूं सांगशील तें कबूल! आणि म्हणशील त्याची शपथ घेतों!

काळवीट—म्हण तर, मी तुझा पिता आहें, आणि माझी लाडकी हरणी तुझी मातोश्री आहे, आणि तूं—

प्रणयसिंह—तीर्थरूप काळवीटा, आणि वज्र चुडेमंडित सौभाग्यवती मातोश्री हरीणी या वडिलांचे सेवेसी, हे वृद्ध प्रणयसिंह लेकरूं आहे! आतां तर झालं ना बाबा?

काळवीट—हां, याद राखून ठेव, पुन्हां मातोश्रीवर डोळा ठेवलास तर—

प्रणयसिंह—तीर्थरूपा शांत हो, पुन्हां असला प्रमाद केव्हांही करणार नाहीं.

काळवीट—चल तर माझ्याबरोबर, हो, आपण दोघंही तोंड चुकवून इकडे आल्याचा बोभाटा व्हायचा. बाळ-प्रणयसिंहा चल—

प्रणयसिंह—तीर्थरूप काळवीटा, चलावं.

( दोघे जातात. )

---

## प्रवेश ३ रा.

[ स्थळ—बगीच्या. पात्रें—शृंखला व हरिणी ].

शृंखला—तिकडे सावित्री पतीकरितां, तलवारीच्या धारेवर चालण्यास देखील तयार आहे, तर सौभाग्यकांक्षिणीनं इकडे पतीकरितां सारखा धुडगुस घातला आहे। कोण मेला नेमानं एक पत्रीका रोज पाठवीत असतो, देव जाणे. कोण, केव्हां येऊन जातो, तेंही कळत नाहीं ! रोज लहानशा रेशमाच्या पिशवींत आपली प्रणयपत्रिका घालून ठेवलेलीच असते. एकंदरींत काय, मदनराजा, तुझी धन्य आहे बाबा. त्यानं आपल्या पाठीशीं अक्षयभाता बांधलेला आहे, आणि हातानं बाण सोडण्याचा सारखा सपाटा सुरू केला आहे; मग तो कुणालाही लागो ! म्हातारा, थेरडा, लंगडा, लुळा, अंधळा, काणा, चकणा, कुणालाही लागो; बाण लागला कीं लागलाच हा डोळे किलकिले करायला ! अगबाई, ह्या कोण ? हरिणाबाई ! आमच्या कांक्षिणीची मावस बहीण ! हो, पण विचार कसला करीत येताहेत हरणीबाई ? हं, काळविटाला हुडकीत असतील झालं : ( हरिणी प्रवेश करतो ).

हरिणी—कुठंबाई तुला हुडकायचं तरी ? कायग, इकडे तूं काय करीत होतीस एकएकटी ? बरं पण कांक्षिणी अक्कासाहेबदेखील, घरींच का अडमडताहेत ?

शृंखला—अंतरिक्षांतून त्यांच्या प्रणयभृंगांचा रेशमी लखोटा उतरला असेल ! सूर्य उगवायचा चुकेल, पण लखोटा उगवायचा कांहीं चुकायचा नाहीं हो.

हरिणी—म्हणजे अगदीं स्वप्नसृष्टींतलाच प्रियकर आहे म्हणायचा ! कोण बाई, हिच्या स्वरूपावर उसळला पिसळला आहे, देव जाणे.

शृंखला—पण या चमत्कारावर, त्या अगदीं लोलूप आहेत मला म्हणाल्या सुद्धां कीं शृंखले, चमत्काराशिवाय आकस्मिताशिवाय प्रेमाला रमणीयत्वच येत नाहीं.

हरिणी—अगबाई, आज अगदीं नवा थाटमाट आहे, हें पाहिलंस कां,

ही प्रेमोद्यानांतील कल्पनातुषारांच्या कारंज्यासमोर नृत्य करणारी मयुरी इकडेसच नाचत येत आहे.

पद ६ वें

मदनाचा ताप हराया । शोधी उपाया । ही पती मुख चंद्रचकोरी ॥ ध्रु० ॥ आभरणें, नटली सजली । कुसुमें वेली । यौवनमदगंधे फुलली ॥ १ ॥ चिंतातूर प्रौढ कुमारी । वृद्धा नारी । कंठित दिन कारागारीं ॥ २ ॥

चल, आपण थोड्या बाजूला वळूं. ( बाजूला जातात )

सौ. कांक्षिणी--( एका हातांत पिशवी व भुर्जपत्र घेऊन प्रवेश करते. ) तेंच तेंच अगदीं तेंच हें हस्ताक्षर ! किती सुरेख, किती वळणदार, किती अक्कडबाज ! अहाहा ! लपेटी आणि ऐट तर वळणावळणावर भरलेली आहे. ह्या अक्षरांच्या ओळी तर, मोत्यांनीं गुंफल्या असून, ह्या अक्षरांच्या ओळीवरून, कोणत्याही कुमारीकेनं, डोळे मिटून आपला आयुष्याचा मार्ग क्रमावा, असा विश्वास दाखवीत आहेत. पत्रिकेंतील मला अनुलक्षून लिहलेलीं संबोधनं किती मार्मिक आहेत ! "प्रियकरें, वंशवर्धिने !" अहाहा माझ्यासारख्या कुमारीकेचं हृदय हरण करणाऱ्या प्रणयानंदा, तूं देव, यक्ष, किन्नर, गंधर्व, असा आहेस-आहेस तरी कोण ?

हरिणी--( एकीकडून ) हिच्या मन्मथसमुद्रावरून उड्डाण करणाऱ्या हनुमंता, भेट बाबा एकदांचा !

सौ. कांक्षिणी--माझ्या अदृश्य प्रियकराचे, हें पत्र लिहतांना इथंच इथंच हात लागले असतील नव्हे ( हुंगते व चुंबन घेते ) हें पत्र लिहून त्यांनीं अस्सं हृदयाशीं घट्ट धरलं असावं ! हे पहा त्याच्या यौवनमदाच्या गंधानं माझं सर्व शरीर स्फुरण पावून मला उन्मत्त करीत आहे; पत्र तरी वाचते सर्व, " प्रियकरवंशवर्धिनें, या रेशमाच्या पिशवींत मीं माझं हृदय कापून पाठविलं आहे".

हरीणी--हं, बरं चला, नुसत्या हृदयावरच भागवलंन् !

सौ. कांक्षिणी--डोळ्याला डोळा नाहीं, सारखी उठतां, बसतां, निजतां, स्वप्नांत, सारखी तुझी मुर्ती अखंड डोळ्यासमोर उभी आहे.

शृंखला—अरे पण, प्रत्यक्ष भेट देऊन, कां तरफडेनास, बाबा यक्ष गंधर्वा ! कां या वृद्ध कुमारिकेच्या अंगाचा असा तिळपापड करून अंत पहातोस ?

सौ. कांक्षिणी—इश्य, मीं आपली प्रणयतरंगांतच गुंग होऊन पात्रिकावाचन विसरून गेलें ! (वाचूं लागते.) या अदृश्यरूपी निराशेच्या अंधकारांतून एक दिवस आपल्या परस्पर चुंबनाचा हंसरा अरुणोदय होईल तो सुदीन ! तुझा " प्रणयभृंग, " प्रणयभृंग, प्रणयभृंग (मुका घेते.)

हरिणी—तुझ्या विरहानलानं बिचारीचे पंचप्राण कसे कंठाशीं आले आहेत, धांव आतां भैरवेश्वरा, भेट बाबा एकदांचा ! (हरीणी व शृंखला पुढे येतात व डोळे मिटून उभी असलेली सौ. कांक्षिणी दचकते.)

शृंखला--अगबाई, लखोटा ? भृंग ? पुन्हा आला ?

सौ. कांक्षिणी—मेल्यांनो, काय बाई मी दचकलें तरी ! अंगाला कसा डबडबून घाम सुटला हो.

शृंखला—ते असू दे हो, पण भृंगचना ? तो, तो, भृंगचना ?

सौ. कांक्षिणी—होय होय, तूं तरी बाई भारीच, विचारून विचारून कीस काढणारी आहेस, पण बाई, कांहीं झालं तरी आमचं हें, इतक्यांतच दादाला सांगायचं नाहीं हो !

हरिणी—मुळींच सांगू नका, कारण, खोटंच वाटेल मुळीं त्यांना ! आयुष्याच्या उतरणीवरून घसरणीला लागलेल्याच्या मागं कोण मेला धावपळ करून, त्याला गांठणार ? खोटंच वाटेल मुळीं !

सौ. कांक्षिणी—तुला नाहीं विचारलं कुणी ! ठाऊक आहे मोठी आतां तारुण्याच्या चढणीवरून कायमचं ध्रुवपद गाठणार आहेस तें. माझी थोडी दादाच्या अंगवळणासारखी, दुहेरी हाडकाठीं आहे, एवढं खरं ! आतां अंमल थोडी उफाड्याची दिसते, म्हणून, लग्नाला आणि प्रेमाला कां कुठं आडकाठी असते !

हरिणी—छे ! माझें तर म्हणणं उलट तोंडाचें बोळकें होईपर्यंत वाटेल त्यांनीं लग्न करावें !

शृंखला—अगवाई, रणदुंदुभी, सैन्याची पहाणी करायला निघाले वाटतं, चला हरणीबाई, आपण जाऊं या, येतांना तुम्ही ! कां आम्ही जाऊ पुढं ?

सौ. कांक्षिणी—चालू लागा. आलेच मी मागोमाग ( त्या जातात ) चाहटळ मेल्या ! त्यांना काय ठाऊक आहे, कच्च्या कैऱ्यांच्या पेक्षां पाड लागलेला अंबाच जास्त चविष्ट असतो !

( स्व. ) हे अदृश्य अगम्य कल्पनांतीत प्राणेश्वरा तुला आनंदाश्रुंनीं अभिषेक करून ह्या हृदयाचा केव्हां राजाधिराज करीन असं मला झाल आहे.

---

## प्रवेश ४ था.

स्थळ-अरण्यांतील तपोवन, पात्रें-व्याध, सत्यवान, सारंगनयना सावित्री

पद ७ वें.

चाल—इतना तो करना शिवजी.

**वरदाना देई किराता । तवध्यास हृदयीं राहो । श्रीसांभ-नाम मधुसे । रसनेला ओलावा हो ॥ ध्रु० ॥ श्रीगंगामाता-तटिनी । प्रिय यमुना सखीच्या पुलीनीं ॥ मुखीं नाम तांडव करितां । मम प्राण शिवजी जावो ॥ १ ॥ लल्लाटीं चंद्रा धरिलें । शिरीं भूषण फणीचे सजेल ॥ हें रूप हृदयघटीं भरलें । मग प्राण जावो राहो ॥ २ ॥**

नेम मारण्याकरितां, आड येत असलेलीं बिल्वदळं, पूर्वीं व्याधानं खुडून काढलीं, तीं चुकून कुठं आमच्या भोलानाथाच्या शिरावर पडलीं, तर लागलीच, शंकरा, तूं त्याचा उद्धार केलास, पण मीं तुझं नाम निरंतर जपत असतांना, उद्धार तर राहोंच, पण या माझ्या पोटाच्या खळगीची भूक देखील भागेना. सारखा सर्व रान तुडवतों आहे, अजून एकही सावज किंवा पक्षी जठरानलांत आहुती देण्याकरितां, मला दिसेना. चला थोडे पलीकडे पाहूं. ( व्याध जातो, दुसरीकडून सत्यवान् येतो. )

सत्यवान—कालपुरुषा, ज्या स्थितीत तूं ठेवशील, त्या स्थितींतच मनुष्यानं संतोष मानून राहिलं पाहिजे. तुझ्या प्रबल समर्थ्यापुढं आणि नियमापुढं, ईश्वरी अवतारांनाही मान तुकवावी लागते, तिथं आम्हा पामरांचा काय पाड ! इतका जरी काळाचा जबरदस्त प्रभाव आहे, तरी त्या काळाशी टक्कर देऊन त्याला पराभूत करण्याचं एकच शस्त्र परमेश्वरानं मनुष्याच्या हातांत दिलेलं आहे, त्या भयंकर शस्त्राचं नांव सत्य आणि शील ! सत्य आणि शीलाच्या गोष्टी बोलायला किती तरी मनोरम वाटतात, परंतु त्या आचरणांत आणतांना प्रत्येक वेळीं जीवाचा जामीन द्यावा लागतो, ह्या वनांतील प्रत्येक वस्तू केवळ परमेश्वरी इच्छेचं रहस्य गर्जून सांगत आहेसं वाटतं ! हे पर्वताच्या स्कंधावरून खालीं उतरून, खेळणारे बागडणारे अल्लड निर्झर मात्र आम्हां मानवांच्या महत्वाकांक्षेला हंसत आहेसं वाटतं ( पाहून ) काय ! काय चमत्कार पहा ! नुसते हंसत नाहीं तर हंसत हंसत ईश्वराचं अत्यंत गूढ रहस्य ओरडून सांगत आहेत ! तो पहा तो तुषार उडाला, क्षणिक इंद्रधनुष्याचा भास दाखवला, बाष्पकरूप होऊन मेघांत गेला, आणि पर्जन्यरूपानं समुद्रांत मिसळला, जन्मकीर्ति मृत्यु आणि मुक्ती, या मनुष्यजन्मांतील चारी अवस्थांचं रहस्य या निर्झरांतील प्रत्येक बिंदू निमिषांत सर्व जगाला दाखवीत आहे. खरेच, हे कालपुरुषा—

पद ८ वें.

**सकलांतका । नमो हे कालपुरुषा, तुला । अनादी अनंता ॥ ध्रु०॥ व्योमांबरी पांहतां । समर्था, । अनीवार सत्ता, ही । भ्रमवीत चित्ता । कुंठे मती ही मना कल्पना येती नाना ॥१॥**

असो चला, त्या पलीकडील झाडीकडं जाऊन फळं तोडून आणावी.
( जातो दुसरीकडून चाणाक्ष येतो. )

चाणाक्ष--मुत्सद्देगिरी, आणि शिपाईगिरी, दोन्ही एके ठिकाणीं सांपडणं विरळा ! गादीवर बसून वाटेलतशीं खलबतं, राजकारणं लढवूं, वाटेल तसे पत्रिकांचे घोडे नाचवूं पण ।शिपाईगिरींत प्रत्यक्ष घोड्यासारखं नाचायची जेव्हां वेळ आली, तेव्हां अदमास लागला कीं, लेखणीच्या

चुरचुरीत आणि तलवारीच्या कुरकुरीत जन्म आणि मृत्युइतकं अंतर असतं. कुठून या सावित्रीबाईच्या बरोबर लवाजम्यांत जाण्याची माझी निवड सरकारनीं केली कुणाला ठाऊक ! मद्र देशाहून या शाल्व देशा-पर्यंत जवळ जवळ आमचा शंभर सवाशें योजनें प्रवास झाला, बऱ्याच राजपुत्रांच्या मीं गाठीभेटी घेतल्या, पण राजपुत्रांच्या भेटी घेतल्या का नंदी पुत्रांच्या गांठीं घडल्या,हा माझा मलाच उलगडा लागत नाहीं. काय वेश्यांचे नाद, काय व्यसनं, काय हौस, मी तर दंगच होऊन गेलो, छे ! छे ! पशु म्हटला कीं तो चार पायाचाच पाहिजे ही माझी जन्मापासूनची ठाम सम-जूत साफ खोटी ठरली ! वाहवा ! कोणी म्हणे, घागरभर भांग तीन वेळां पितो, कोणी दर प्रहराला अफूची नागीण गिळतो, कोणी एक एक मुष्टी सोमल खातो, कोणी भालदार चोपदारांच्या प्रोत्साहनानं अतःपुरांत शिरतो कोणी अंततःपुराचा हवाला इतरेजनावर सोपवतो ! असें अनंत प्रकार प्रत्यक्ष याच चक्षूंनीं पाहिले ! असले हे किळसवाणे नरलांछन राजपुत्र यांच्या-बद्दल, मीं काय शिफारस करावी ! आणि करायला जीभ तरी कशी धजावी ? ही पहा राजकन्येची स्वारी आलीच— (सावित्री व सारंगनयना येतात.)

**सावित्री**—अमात्य माझ्यामुळं आपणांवर ही प्रवासाची आपत्ति ओढवली; पण आतां त्याला उपाय नाहीं.

**चाणाक्ष**——छे, छे, आपण असं मुळीं देखील मनांत आणूं नका.

**सावित्री**—आणा आणि आणू नका ! आतां काय त्याचं ? मी कारणी-भूत आहे, येवढं मात्र खास ! नगरांतील कृत्रिम वस्तूंची मला कशी शिसारी आली आहे ! ढोंग, फसवेपणा, कपट, स्तुति आणि डामडौल यांच्या विषानं ज्यांचीं मस्तकं, भणाणलेलीं आहेत, अशांची मुखं पुन्हां कधींही दृष्टीस पडूं नयेत, असं मला झालं आहे. अन्याय आणि क्रौर्य यांनी मढवलेल्या राजमुकुटांत ज्यांनीं आपलीं डोकीं लपवलीं आहेत, त्या दिवाभीत राजपुत्रांचं दर्शनही पुन्हां घडूं नये, अशी माझी मनापासून इच्छा आहे. मग काय व्हायचं असेल ते होवो ! हें पहा अमात्य ! आतां-पर्यंत प्रवासाची बरीच दगदग सर्वांनाच झाली आहे. तेव्हां आपण आपला मुक़ाम आहे इथंच चार दिवस जास्त वाढवूं या.

चाणाक्ष—ठीक आहे, जशी आपली आज्ञा. (मुजरा करून जातो.)

सावित्री--सखे सारंगनये, मला कुठं तरी, एकांत अशा रम्य तपोवनांत, निवांत बसण्याची वेळ आली, म्हणजे कसं पिंजऱ्यांतून उडालेल्या पक्षाप्रमाणें वाटतं ! कोणच्याही प्रकारची होईना, बंधनं म्हणजे पिंजराच होय ! मानमरातब आणि मानापमानाच्या राजकीय रूढींच्या पिंजऱ्यांतून, केव्हां थोडी स्वतंत्रता मिळेल, असं मला वाटतं.

सारंग--तुझं म्हणणं अगदीं खरं आहे, तरी पण कितीही स्वतंत्रताप्रिय मनुष्य असला, तरी त्याला सुद्धां एक वेळ अशी आयुष्यांत येते कीं, त्यावेळेस त्याला स्वतंत्रता देखील कष्टमय वाटून प्रेमरज्जूंच्या विणलेल्या पिंजऱ्याचाच बंदिवास आवडतो.

पद ९ वें.

( चाल—खबर लेते जाना हमारी मुरारी.)

**स्वातंत्र्य तेही रुचेना मनाला । बहु आवडे त्या बंदीशाळा**
**॥ ध्रु० ॥ कथूनि हितगुजा जीवींच्या । रची मनोरथांना ।**
**ते तोषविती उभयां जीवांना ॥ १ ॥ प्रणयतंतू बंधनींच्या ।**
**मनीं मोद त्यांना । दे स्वर्गसौख्यसि त्या बंदीवाना ॥ २ ॥**

मग अशा वेळीं, ज्याला तूं स्वतंत्रता म्हणतेस, ती स्वतंत्रता देखील त्या बंदिवानाला शत्रूसारखी दिसूं लागते. कां मी म्हणतें ते खरं ना ?

सावित्री--तूं अगदीं—अगदीं माझ्या मनातलं बोललीस जगांत एकट्याला मुळींच सुख नाहीं, प्रकृती आणि पुरुष निर्माण करण्यांतच, देवानं हे रहस्य, जगाला सांगितलं आहे. सारंगनयने ही गोष्ट मी केव्हांही विसरलें नव्हतें. पण आतापर्यंतच्या प्रवासांत पाहिलेल्या विचित्र गोष्टींवरून संपूर्णता लाभणं किती कठीण आहे, हे आलंना तुझ्या लक्षांत ?

सारंग०--हे काय विचारतेस ? असल्या नरलांछनांच्या गळ्यांत माळ घालून संपूर्ण गळफांस वैरिणीच्याही गळ्याला लागूं नये असंच मला वाटतं !

सावित्री—आणि म्हणूनच, आतां पुढील बेत काय करावा, ह्याच विवंचनेंत मीं रात्रंदिवस पडले आहे ! काय ग ! पण हें काय गं हे ! हा पहा माझा डावा डोळा सारखा लवत आहे.

सारंग०--अग बाई, पण हे शुभशकुन या तपोवनांत होणं म्हणजे विसंगत नाहींत कां ! पण विसंगत कसलं ! पाषाणांच्याच पोटीं हिरे निर्माण होत नाहींत कां !

सावित्री--अगबाई, पण हा काय प्रकार आहे ! सारंगनयने, या आपण इथं थोड्याशा आड होऊं या. (कपोतीमागं व्याध येतो व बाण सोडतो, सावित्री व सारंगनयना एका बाजूला उभ्या राहून हें पाहात असतां, दुसऱ्या बाजुनं सत्यवान येतो, कपोती व्याधाच्या बाणानं घायाळ होऊन पडते, व्याध तिला उचलू लागतो तोंच सत्यवान त्यांस धरतो.)

सत्यवान--हं हं, अधमा काय केलंस हे ! चल हो पुढं, (धनुष्य गळ्यांत अडकवून त्याला पुढं खेचतो) तुझ्या धनुष्यांतून बाण सूटण्या-पूर्वीं जर दृष्टीस पडला असतांस, तर तुझा बाण धनुष्यातून सुटतो न सुटतो इतक्यांत माझ्या बाणानं तुझं उदर फोडून तुला जमिनींत रोवून टाकलं असतं ! (पांखरूं हातीं घेऊन) तुझा संकेत जरी मला कळला असतां तरी तुझा सुटलेला बाण मधल्यामधेच तोडून ह्या गरीब बिचारीचा प्राण वांचविला असतां ! शिवशिव निर्दय काळा ! काय गरीबांची ताटातूट केलीस ही ! अरे निर्दया, हिनं तुझा असा काय घोर अपराध केला होता कीं ज्याबद्दल तूं हे घोर शासन हिला केलंस ! अरे अरे, पंख न फुट-लेल्या व घरट्यातल्या घरट्यांतच भुकेनं व्याकूळ होऊन चिवचिव कर-णाऱ्या, पोटच्या पिलांकरतां, हे पहा, नराधमा, हिच्या चोचींत अन्नकण कीरे भरलेले आहेत, पिलांना दुखूं नये खुपू नये, म्हणून हे पहा पायांत मऊमऊ शेवाळं देखील घट्ट धरलेलं दिसतं आहे रे. अरे अरे अरे रक्ताची कशी धार लागली आहे. हा पहा एक पंख अजीबात घायाळ झाला, हिला जर वांचा असती तर आपल्या वेदना, दुःख इतक्या करुणेनं टाहो फोडून सांगितलं असतं कीं, त्या दुःखानं हे पाषाण देखील दुभंग झाले असते, वृक्षलतांनीं अश्रूची संतत धार धरली असती तरी देखील, निर्दय काळा, तुला भंग नाहींना, बोल कां मारलंस बोल !

व्याध—तरुण पुरुषा, या पोटासाठीं.

सत्य—अस्सं, धनधान्यांनीं समृद्ध शेतं तुला पुरेशीं झालीं नाहींत

कां ? या अरण्यांतील कंदमुलं, फलपुष्प, आणि वनस्पती तुला पुरेशा झाल्या नाहींत का ? शंभर वर्षांच्या तुझ्या आयुष्यांतील, एका क्षणाची, तुझ्या पोटाच्या खळगीची भूक भागण्याकरितां, निर्दया, दुर्बल जीवांच्या सर्व आयुष्याचा असा बळी घेतोस ? अशी निर्दय ताटातूट करतोस ? चिल्या पिल्यांना धाय मोकलावयाला लावतोस ? केवढं भयंकर पाप हें ! घे, हीं रत्नमाला घे, ही अहिंसेनं तुझी भूक भागवील, आणि पश्चातापानं शपथ वहा कीं "आजन्म निरपराध, असाह्य, दीन,–दुर्बल जीवांचा केव्हांही वध करणार नाहीं, तरच तुला जिवानीशीं सोडतों.

व्याध—( स्व. ) ह्याचा स्पर्श होतांच माझी सर्व शक्ती कां बरं हरण झाली ? शंकरा, हा माझा उद्धारकाल तर नसेल ना ! ( उघड ) तरुण पुरुषा तूं आज माझ्या डोळ्यांत चांगलंच अंजन घातलंस ! हें पहा, हें धनुष्य, तुझ्या पायांवर अर्पण केलं आहे, आणि त्या कैलासनाथाची शपथ घेऊन सांगतों, आजपासून, निरापराध्यांच्या संरक्षणाकरितांच ह्या धनुष्याला बाण लावीन. तरुण पुरुषा द्या द्या तें पाखरूं माझ्याजवळ ! मला अनेक वनस्पती माहीत आहेत, मी आतां हिला सावध करतों, ( पांखराकडे पाहून ) हें पहा, हिच्या अंगावर झाडावरील लाल मुंगी दिसते, ती चावल्यामुळं ही थोडी हलली, आणि त्यामुळंच माझा बाण नुसता निसरतांच लागला. दैव हिच, पंख सबंध जायबंद झाला नाहीं. आता हिला सावध करून घरट्यापाशीं सोडतो, हिच्या प्राणाकरितां, मी माझे प्राण वेचीन, पण हिचे वांचवीन !

सत्यवान—तुझ्या वचनावर विश्वास ठेवावासा वाटतो, ठीक आहे. घे ( पांखरूं देतो. ) जा ताबडतोब व्यवस्था कर जा ! आणि त्या पलीकडील आश्रमांत येऊन मला सर्व कळीव, जा. ( तो जाऊ लागतो ) अरे, पण थांब, पुन्हा तुला हत्या करण्याचा मोह अनावर झालाच, तर तूं सांगशील तिथलं माझ्या शरीराचं मास कापून द्यायला मीं तयार आहें.

व्याध—आता हे बोलणं कशाला ? तरुण पुरुषा हिला सावध करून, आतां येऊन सांगतो. हिच्याकरतां प्रत्येक क्षण मोलाचा आहे ( जातो. )

सत्य—चला आपणही काष्ट गोळा करून जावं ( जातो. )

सावित्री—( सा. सा. पु. ये. ) अहाहा काय सुंदर मूर्ति ही, पण-पण काय-हा देवपुरुषच ! खचित मानव नव्हे.

पद १० वें.

झाला प्रगट का हा जागा उद्धराया ॥ध्रु०॥ क्षणिक दर्शनानें अधीर जीव केला । लीन करुनी वाणी । हरपवी मती । विकल होय काया । दास जीव केला ॥ १ ॥

सारंग—ह्याच्या सद्गुणामुळंच तुझे डोळे दिपले, म्हणूनच तुला असं वाटतं ! अग हा क्षात्रियकुमारच, ते पहा, धनुष्यबाण ऋषीकुमार कशाला बरं बाळगील ?

सावित्री—अशी सुंदर आणि शूर मूर्ति म्हणजे सद्गुणाचं माहेरघरंच ! अशा हृदयांत दुर्वासना जर कदाकाळीं आली तर ती केवळ सद्गुणाच्या संगतीनं स्वतःच्या उद्धारार्थच येईल. त्याशिवाय कदाकाळीही येणार नाहीं सारंगनयने, मला हा तरुण कोण, कुठला हें जाणण्याची बाई भारी इच्छा झाली आहे.

सारंग--अग मग त्याला काय हरकत आहे? (सत्यवान भारा घेऊन येतो ) प्रथम त्याला वंदन करून विनयानं विचारूं.

सावित्री--पण मला गडे धीर होत नाहीं, प्रथम.!

सारंग--अग मी विचारतें प्रथम, पण वंदन करायला तर तुझी हरकत नाहीं ना !

सावित्री—मीं कुठं नाही म्हणतें ( स्व. ) यांना पाहून आजपर्यंत न आलेले विकार कां बरं माझ्या मनांत येऊं लागले ! ( दोघी एकमेकींला " तूं हो पुढं " म्हणतात. सत्यवान सावित्रीस पाहून )

सत्य०—कोण-कोण ही ! हा काय चमत्कार ! सर्व वनश्री हें मोहक रूप घेऊन, आपलं वैभव प्रत्यक्ष पाहाण्याकारितां तर अवतरली नाहीं ना !

पद ११ वें.

प्रगटे वनीं । काय मनमोहनी, रमणी । मधुरवच वदोनी । लोभवी सकल जना पाश टाकोनी ॥ ध्रु० ॥ सगुणरूपका

धारण करुनी । वनदेवी ही भ्रमते विपीनीं । वैभवासी निज पाहे नयनी । मधुहास्यांमृती तया प्राण घालोनी ॥ १ ॥

हिच्या सस्मित आणि समज्ञ दृष्टिपातांत दुसऱ्याची सर्व शक्ति हरण करण्याचं सामर्थ्य आहेसं वाटतं. छे,नव्हे मी चुकलों. हिच्या नेत्रांत आणि सलज्ज मुखकमलांत असं कांहीं अमृत भरलेलं आहे कीं, अचेतनही सजीव होतील, मग मला एकदम असा अनावर उत्साह वाटत आहे यांत नवल काय ? ( दोघी वंदन करतात. ) तुमचं कुशल असो.

सारंग--महाराज, आपली आज्ञा असेल तर मी...

सत्यवान—अपरिचितांना प्रथमभेटींत दोघांनाही एकदम एकच प्रश्न उद्भवतो ! आपल्याला काय विचारायचं असेल तें खुशाल विचारा (स्व.) मीं प्रथम विचारलं असतं, तर हिचा वृत्तांत मला आधीं कळला असता.

सारंग—महाराज या तपोवनांतील आपल्या आगमनानं, आपण कोणत्या देशाच्या प्रजेला विरहांत लोटलं ?

सत्यवान--या शाल्व देशाचा नृपति जो द्युमत्सेन, त्याचा मी एकुलता एक मुलगा ! मला सत्यवान असं म्हणतात.

सावित्री—व्याधाशीं झालेल्या चारित्रावरून मला जें वाटलं तेंच शेवटीं खरं ठरलं !

सारंग--आपण मृगयेसाठीं का इकडे आलांत ?

सत्यवान—नाहीं-

सावित्री—हें ग काय विचारलंस ? छे, छे, दुर्बलांचा संहार कधीं तरी त्यांचे हातून होईल का ?

सारंग—मग कांहीं इष्ट सिद्धीच्या आशेनंच या धर्मारण्यांत वास होत असेल !

सत्यवान—होय,हा वास दुर्दैवामुळं म्हणा अगर सुदैवामुळं म्हणा,पण करावा लागत आहे एवढं मात्र खरं !

सावित्री--हा प्रश्न विचारतांच यांची मुद्रा इतकी खिन्न आणि उदास कां बरं झाली ! महाराज, अमर्यादा झाली असेल तर माझ्या सखीबद्दल मी आपली क्षमा मागतें.

सत्य०--छे छे, पण माझं दुःखवृत्त ऐकवून तुम्हांला कशाला क्लेश द्यावे, असं मनाला वाटलं.

सावित्री--पण आपलं दुःख दुसऱ्याला सांगितलं म्हणजे थोडं हलकं होतं असं म्हणतात.

सारंग--त्यांतून, समदुःखी भेटले तर दुःखांतूनच समाधानाचा जन्म होतो.

सत्य०--ठीक आहे, थोडक्यांत सांगतों. माझ्या बालपणीं माझ्या पित्याला एकाएकी अंधत्व आल्यामुळं शत्रुंनीं आमच्या त्या दुःखदप्रसंगीं स्वारी करून आमचं सर्वस्व हरण केलं!

सावित्री--अरे अरे, कालगतीसारखी दुसरी कोणतीही गति नाहीं!

सत्य०--पोटच्या मुलांप्रमाणें वागवलेली प्रजासुद्धां शत्रुला मिळाली अंधत्वामुळं माझ्या पराक्रमी पित्याचे प्रयत्न निष्फळ ठरले; तेव्हां इहलोकालातर मुकलोंच, निदान परलोकचं तरी साधन करून ठेवावं, म्हणून पलीकडील ऋषिजनांच्या आश्रयानं, या धर्मारण्यांत मी व माझीं माता पितारं रहात आहोंत! पण या तपोभूमींतच आम्ही विशेष सुखी आहोंत असं मला वाटतें!

सावित्री--अरे अरे, हें ऐहिक वैभव किती क्षणभंगूर आहें!

सत्य०--( सारंगनयनेस ) तुमच्या सखीविषयींही मी वृत विचारूं कां! ( स्व. ) माझं जसं, एकाएकी हिच्याविषयीं आदर उत्पन्न होऊन मन गेलं, तसंच हिचं माझ्या विषयीं झालं असेल कां!

सारंग--महाराज, माझं नांव म्हटलं सारंग-नयना!

सावित्री--तुझं नांव ग कुठं त्यांनीं विचारलं!

सारंग--मीं ही जी, मद्रदेशाधिपति अश्वपतींची कन्या सावित्री, हीची मी सखी आहें. मला हिच्याशिवाय क्षणभरसुद्धां करमत नाहीं! माझी माहिती--

सावित्री--आतां पुरे कीं तुझं स्वतःच चऱ्हाट! तुझी चौकशी त्यांना नको आहे! माझी माहिती सांग!

सत्य--क्षात्रीयकन्याच तर मग ? तुमचं तरी आगमन इकडं कां बरं झालं ? ( स्व. ) हिचा वृतांत ऐकायला माझं मन अधिर झालं असतांना, हिची ही सखी, ही-मीं-जी आपला वृतांत सांगून मला अत्यंत अधिर करीत आहे.

सारंग--ऐकावं महाराज, ही माझी सखी उपवर झाल्यावर आपल्या पित्याच्या आज्ञेवरून वृद्ध मंत्रिजन बरोबर घेऊन इच्छित वर संशोधनार्थ निघाली आहे, पण या क्षणापर्यंत हिच्या आशेला काडीचाही आधार मिळाला नाहीं.

सावित्री--कसं बाई, अगदीं माझ्या मनांतलं बोललीस ? खरोखरच ही पुण्यवान् मूर्ति माझ्या दृष्टीस पडतांचं एकदम माझ्या हृदयाला पंख फुटले हें मनोहर रूप पहाण्याकीरतां सर्व इंद्रीयं माझ्या डोळ्यांत एकवटून सज उभी राहिली ? पापणी लवण्याचा देखील अडथळा त्यांना असह्य होऊं लागला.

सत्य—( सारंगनयनेस ) या विस्तीर्ण पृथ्वीवर अनेक रूपगुणसंपन्न राजपुत्र असतांना, अद्याप तुमच्या सखीला, योग्य वर मिळूं नये हें आश्चर्य नव्हे कां ?

सावित्री--माझ्यासारखीच चमत्कारीक स्थिती यांची देखील झाली असेल कां ? ह्यांच्या हृदयांत माझ्या विषयीं देव प्रेरणा करील कां ?

सारंग०--पुष्कळ मागण्या आल्या, आतांपर्यंत बरेच राजपुत्र पाहिले, तरी देखील, हिच्या मनाला कांहीं पटेना !

सावित्री--महाराज, रत्नखचित मुगुटांची किंमत मला वाटेनाशीच झाली आहे. क्षणभंगूर संपत्तीची किंमत, मला रुचेनाशीं झाली आहे. राज्यवैभव आणि ऐश्वर्य याला माझे डोळे भाळेनासे झाले आहेत, याला मी तरी काय करूं ? या सर्व पाषाणमय, रत्नांच्या-राशीपेक्षां ह्या हृदयांतील सत्य, शील, आणि सद्वर्तन याच संपत्तीची मीं अत्यंत लोभी झाले आहें, ही संपत्ती आपलीशी करण्याकरतां, स्तुति किंवा दास्य करण्याची मला मुळी सुद्धा लाज वाटेनाशी झाली आहे.

सारंग०—हो-वेळप्रसंगीं चोरी देखील करील.

सावित्री--( स्व. ) माझं सर्व शरीर कसं रोमांचित होऊन कांपत आहे. मला अत्यंत हर्ष होत असतांना माझ्या डोळ्यावाटें, टपटप अश्रू पडत आहेत, हें काय बरं हं ! हें वेड्या सारखं नाहीं का ? (डोळे पुसतें)

सत्यवान्--हा हा सावित्री, तूं रडतेस का ?

सारंग—( स्व. ) परस्परांच्या मनोविकारांची केवढी ओढाताणहि ! देवा, या वेळेला तुझ्या कृपेचं सिंचन करून उभयतांनाही सुखी कर. आपण थोडं आड व्हावं ! ( मागं होते. )

सावित्री—प्रीति भेली, जितकी लपवावी तितकी जास्तच लपवाविशी वाटते ! जों जों तिला लपवावी तों तों ती उन्मत्त होऊन छळूं लागते ! निर्दय लज्जे, हो बाजूला ! महाराज या हृदयांतील प्रेम, हें शरीर, हे हातें, या चरणांचं दास्य करायला योग्य नाहींत, या दुःखानें हें माझे भयभीत झालेले डोळे आपल्या चरणांवर अश्रूंचा अभिषेक करीत आहेत, या चरणांचं, अखंड दास्याचं दान मागण्याकरितां, करुणा भाकीत आहेत, आपण ह्या दीनदासीचा अंगीकार कराल कां ?

सत्यवान्--सावित्री, माझ्यासारख्या निर्धन आणि रानावनांत आयुष्य कंठणाऱ्या तपसव्याला वरून, आपल्या जन्माची माती करूं नकोस!

सावित्री--आपल्या एका शब्दानं या मातीचं सोनं होणार आहे! आजपर्यंत, पाहीन तिकडे व जाईन तिकडे मातीच दिसत होती, आज माझ्या परमभाग्यानं ही मला कस्तुरी मिळाली !

सत्य—सावित्री, हा तू अत्यंत अविचार करीत आहेस, हा एक प्रकारें गोवध करण्याचाच रुकार तू मागत आहेस.

सावित्री--नाहीं मृतवत गाईला संजीवनी मिळण्याची करुणा भाकत आहे, आपण रुकार द्या, अगर माझ्या दुर्दैवाच्या भारानं जिव्हा जड झाल्यास देऊं नका, पण मीं मात्र हे चरण कदापी सोडणार नाहीं.

सारंग—( मागून ) केलीन, चोरी नव्हे चांगला दिवसा ढवळ्या दरोडा घालतात.

सत्य—या दुराग्रहाला मी काय उत्तर देणार ?

सारंग—( पुढं येऊन ) होय म्हणून ! ( व्याध येतो. )

व्याध--तरुण पुरुषा, केवढा तुझ्या पुण्याईचा प्रभाव आहे पहा! थोडासा वारा घालून एक दोन वनस्पतींचा लेप पंखावर लावतांच, ती कपोती, ती पहा आपल्या घरट्यांत बाणासारखी उडून गेली.

सारंग—पण व्याधा, तूं तिकडे तिला सावध करीत होतास त्यावेळींच इकडं, एक हंसी एका व्याधानं घायाळ केली.

व्याध—असा कोण चांडाळ निर्दय व्याध आहे, तो मला दाखीव! कुठं आहे तो व्याध ? आतां त्याच्या नरडीचा घोट घेतो !

सारंग—हा पहा व्याध, आणि ही पहा हंसी !

व्याध—तरुण पुरुषा, ही मोत्याची माळ मला कशाला ? इतक्यांतच अहिंसेचा धडा मला सांगितलास आणि तूंच असली हिंसा करतोस ? राजपुता एकदम बाण मारून प्राण घेण्यापेक्षां, ही अशी हळूं हळूं मान कापण्याची हिंसा अधीक कठोर नाहीं कां ? घे हें मोती हिलाच खाऊ घाल! ही रत्नमाला तुलाहीपण अहिंसेचाच मार्ग दाखवील ( माला सत्यवानास देतो. )

सारंग--मीं देखील आपल्याला पदर पसरते.

सावित्री--अजून आपण माझा अंत पहाणार कां ?

सत्य—सावित्री तुझी इच्छा ! ( रत्नमाला सावित्रीस देतो. )

सारंग--व्याधा, त्या कपोतीनं घरट्यांकडं धांव घेतली, आणि या राजहंसीनं मानस सरोवरांत उडी मारली.

अंक पहिला समाप्त



**व्याध**—मी पडलों एक रानवट अडाणी मनुष्य !

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
ना. क्र........ नों. दि ........
वि........ क्र. ........

# अंक २ रा.

## प्रवेश १ ला.

( स्थळ—महाल—कांक्षिणी व शृंखला )

शृंखला—(येऊन) हिचा प्रणयभंग मला कसा बाई तरी सांपडावा ! बरं प्रयत्न न करावा, तर ही थेरडी माझ्या नी हरणीबाईच्या कार्यात विघ्न उपस्थित करायची ! तरुणांच्या शृंगारचेष्टांचा वयस्क नेहमीं मत्सर करीत असतात, ते कांही खोटं नाहीं, एकंदरींत मदनराजा तुझी धन्य आहे बाबा—

### पद १२ वें.

**राजाधिराज अनंग करी शिकार । शरसंधानि जाई न कुणासी हार ॥ ध्रु० ॥ अंध जरि हा डोळसाहुनि । शूरांत निष्णांत नेमांत फार । देवदानवा जखमी केले । चंद्रासी बाह्मयासि केलेनी ठार ॥ १ ॥**

ही पहा, ही कांक्षिणी आलीच आपण हिचं बोलणं थोड आड होऊन ऐकूं या ! ( बाजूला लपते, कांक्षिणी येते. )

**सौभाग्यकांक्षिणी**— ( येऊन ) कुमारीकांनो चतुर्भुज व्हा. या विरहानं तळमळणाऱ्या कुमारीकेचा उपदेश अगदीं ध्यानांत धरा, भगिनी कुमारीकांनो चतुर्भुज व्हा ! प्रीती, यक्ष, किन्नर, राक्षस, वाटेल तो प्रकार करा, पण चतुर्भुज व्हा ! नाहीं तर हे पहा माझंच उदाहरण, सामानं नाहीं तर दामानं, दामानं नाहीं वळलं तर भेदानं, काय वाटेल ते प्रकार मंत्र, तंत्र, गंडे, दोरे करा पण चतुर्भुज व्हा ! स्वस्थ बसलांत कीं फसलांत, फसलांत कीं वायां गेलांत; वाया गेलांत कीं संपलांत ! घट्ट पातळ, होय नको, बरा बाईट, कुरुप सुरूप, अशी पसंतीची किरकिर चालवून, आपल्या तारुण्याचा कीस काढायला लागलांत कीं तारुण्य, सौंदर्य, वय, या कालाच्या

किसणीवर किसलं जाऊन नुसती किसणीवर हाडं मात्र शिल्लक रहातील, आणि ती नुसती हाडं, मेल्यानंतर कोणा तरी कुत्र्यापुढं चघळायला टाकायची वेळ येऊन पश्चात्तापाची पाळी येईल ! म्हणून म्हणते जोपर्यंत सोळा ते बाविशीच्या वयांतच तारुण्याची, सौंदर्याची आपापसांत हमरी तुमरी चालू असते तोंच चतुर्भुज व्हा! एक वेळ तारुण्यउपवनांतील सर्व वृक्षवेली,फुलं,कमळं,पर्वत शिखरं गडगडून कोसळू लागली,म्हणजे तसल्या ओसाड वैरान रानमाळाकडं वैतागलेला तपस्वी देखील ढुंकून पहाणार नाहीं. म्हणून आपली पुन्हां सावध करतें कीं, दोहोंचे चार करा, चतुर्भुज व्हा ! ही पहा श्रृंखला इकडंच येत आहे, पण उ-योग काय ? चतुर्भुज नाहीं. ( शृंखला येते. )

शृंखलाः—कसला उपयोग ? आणि कसलं चतुर्भुज ? काय म्हणता ? मला कांहीं कळलं नाहीं !

कांक्षिणीः—कसं कळणार ? तूं आलीस सगळं रामायण आटोपल्यावर !

शृंखलाः—म्हणजे ! तुमचं इष्टवरप्राप्तिचं रामायण आटोपलं की काय ?

कांक्षिणीः—इश्श, असं ग काय अभद्र बोलतेस ! ते माझे भृंगराज या प्रेमाच्या हृदयकरंडकांत अखंड बंदीवान करून ठेवले आहेत. तो माझा भृंगराज चंद्रमा या हृदयरूपी आकाशांत प्रेमकणांच्या उचंबळत असलेल्या समुद्रांत, माझ्या मनोरथ रूपी नौकेंत बसून, नौकाविहार करीत आहे ! आणि ही सौभाग्यकांक्षिणी भोळी रजनी त्या चंद्रमाला कवटाळून उभी आहे !

शृंखलाः—( स्व. ) हिला प्रेमाचा जबरदस्त तडाखा लागलेला दिसतो. ( उघड ) त्या भृंगराजानीं तुमचं हृदय बरंच पोखरलेलं दिसतं, त्या मेल्याचे दांत भारीचं बळकट दिसतात ! मेलं जुनाट फणसाचं झाड, लोखंडासारखं घट्ट कणखर असतं, पण ते देखील पोखरऊन ! एकीकडून काळ आणि एकीकडून मदन असे हे दोन भृंगराज हाडं पोखरायला लागले, म्हणजे काय करायचं बाई माणसानं ? डोक्याकडून काळाचा भुंगा लागला कीं तिकडे प्रथम केशकलापांना चाटून पुसून पांढऱ्या शुभ्र अंबाड्या करतो, आणि डोकं पोखरून पोखरून, जी कांहीं थोडीबहूत

अक्कल असेल, ती चट सारी खाऊन धडावर भांडं रिकामं करून ठेवतो. बरं, या आंधळ्या धनुर्धराचा मदनाचा भुंगा लागला, म्हणजे तो इकडे टवटवीत शरीराचा तजेला खाऊन सुरकुत्या पाडून हाडं पोखरून अस्थीपंजर शिल्लक ठेवतो! एकंदरींत काय? कोणचाही भुंग लागणं वाईट ग बाई! मला कीं नाहीं तुमची मनापासून दया येते! पण करणार काय? वाटेल तशी पाळतीवर राहिले, शोध शोध शोधलं, त्रिभुवन पालथं घातलं, पण त्या भृंगाचा मला तरी बाई, मुळींच सुगावा लागत नाहीं. पण मीं म्हणते त्याचा नादच सोडाना?

कांक्षिणी—अग कसा नाद सुटणार! मला तर वेड्यासारखं झालं आहे! हो, पण कायग श्रृंखले, मी एकटीच वेडी आहे, कां माझ्यासारख्या बऱ्याच जणी वेड्या असतात, ह्याच्या उलगडा करण्याकरतां, तुला एक हृदयातल्या आतली गोष्ट विचारते, तुला नाहीं कागं विरहानलाची धग लागली? तुला नाहीं कागं त्या धनुर्धराचा एकादा निसुरटतां बाण चाटून गेला? नाहीं कागं तुला प्रितीच्या ज्वाला लागल्या?

श्रृंखला—हें पहा कांक्षिणीबाई, माझ्या प्रेमाला येवढं शास्त्रोक्त, वेदोक्त वळणच लागलेलं नाहीं, मीं आपली धोपटमार्गी, सरळमनमोकळी आहे. तुम्हाला खरंच सांगू कां?

### पद १२ वें.

**नकळे प्रीति। कशासि म्हणती। कुठे रहात ती। कशी उद्भवे। कैसी करीती। तीची रीती॥ ध्रु०॥ रोमांचित गात्र थरथरिती। अश्रुजलें नयनां ये भरती। विरही अधीरता वाटत चित्ती। अशा लक्षणा, काय शहाणे। वदती प्रीति॥१॥**

हें पहा, मला देखील धग लागते, निसुटते बाण लागतात सगळं कांहीं तुमच्या सारखं वाटतं! पण ही जाळपोळ आणि हें अंतरीचे घाव, दाखवायचे कुणाला आणि सांगायचे कुणाला? समजा, एखाद्या मतंगजाच्या गंडस्थळावर युक्तीप्रयुक्तीनं ही श्रृंखला बसली, पण पुढं त्यानं बंधनाला कंटाळून, ही श्रृंखला तोडून, रानांत पळ काढला तर? मग कोणत्या देवाची शपथ घेतां?

कांक्षिणी०—अग ती तुला शंका देखील नको, ही कांहीं शेणा-मेणाची बेगडी श्रृंखला नाहीं, हे डोळे, हे गाल, हे वक्षस्थळ, हे नाक, हे हात, हे पाय, ही कटी; अहाहा ! ही एकेक कडी देखील हा एकेक दुवा देखील, किती मजबूत, किती मोहक, त्या विधात्यानं घडवलां आहे ! अग तूं जर मनांत आणलंस, तर एकेका कडीला देखील, एकेक मतंगज जन्मभर अडकून पडेल, मग या सगळया कड्यांच्या श्रृंखलेनं, जर एखादा गजेंद्र बांधला, तर त्याची काय सुटण्याची प्राज्ञा आहे ? आतां पहिल्यांदा करील थाडंस तारांगण, पण पुढं लागेल वेठीला ! अगं कसला रानांत पळ काढतो आहे ! या श्रृंखलेशी, खेळून बागडून, तिला आपल्या हाताखांद्यावर झेलण्यांत, तोच मेला आपल्या जीवाचं रान करील, ठाऊक नाहीं तुला !

श्रृंखला—ठीक आहे, आधी एकएकाचं लागलं आहे ओळीला, तें पार पडूं दे. सावित्री गेली आहे, तिकडं कोणातरी पुण्यवानाच्या शोधाला तुम्ही आहांतच भृंगराजांच्या भानगडींत, तिकडं हरिणीबाई, त्याही आहेत काळविटांच्या विवंचनेत ! तुम्ही एक वेळ पार पडलांत म्हणजे तुम्हालाच गुरु करून मीही घालते एखाद्या गजेंद्राला फांस, मग तर झालं कीं नाहीं !

कांक्षिणी०—पण, कायग श्रृंखले, मीं तुला एक विचारते, मला कीं नाहीं माझे विचार दुसऱ्यांच्या कल्पनेशी पडताळून पाह्यची मेली आपली एक सवयच लागलेली आहे. खरंच सांग हं पण. काय ग—ज्याच्या बरोबर जन्म कंठायचा, तो प्राणवल्लभ तरीं कसा असावा ग ? अगदीं तुझ्या मनांतली आवड सांग हं.

श्रृंखला—आतां, तुम्हीं अगदीं विचारतांच तर सांगते मी आपली आवड ! मला कीं नाहीं बाई, दोन टोकं वजा करून राहिलेला मध्यम प्रियकर आवडतो !

कांक्षिणी०—मध्यम प्रियकर ! ही आवड आज मीं नव्यानंच ऐकते. म्हणजे ग काय ?

श्रृंखलाः—म्हणजे असं कीं, तो इतका सुंदर नसावा कीं, नगरकामि

न्यांचा त्याच्या भोंवतीं वेढा पडावा, बरं इतका कुरूप नसावा कीं, पहातांच जीव मळमळायला लागावा! बरं इतका उंच नसावा कीं, ज्याच्या अधर-चुंबनाकरतां तपेलं, पातेलं, चौरंग यांचा उपयोग करावा, बरं अगदीं ठेंगणा मुईकमळही नसावा कीं, जो पायघोळ ओच्यातच अदृश्य व्हावा! बरं, असा रानदांडगा नसावा कीं, ज्यानं माझा जीव दिवसांतून दहावेळ मुट्ठ्यास आणावा, बरं असा रडतरावहि नसावा कीं, जरा घोडं बिचकतांच घोड्याच्या गळ्यांत यावा! बरं, असा गलेलठ्ठ नसावा कीं, दुसऱ्या कुशी-वर वळतांच माझा पापड लाटावा, बरं, असा झुरळ नसावा कीं, ज्याला हंथरुणांतच हुडकावा लागावा! एकंदरींत काय सांगू कांक्षिणीबाई तुम्हाला, उत्तरधृव आणि दाक्षिणधृव सोडून समशितोष्ण कटीबंधातला मध्यम प्रिय-कर असावा.

कांक्षिणीः—अग गुलामे! तूं जरी ग्रंथाचं पठणचिंतन केलं नसलंस तरी श्रवणमनन बरंच केलं आहेस! हो पण मी तुला असं विचारणार होते कीं, आताशा तुझी नी हरणीची कसलीगं येवढीं खलबतं होत अस-तात? (ती बोलत नाहीं) बरं नको सांगूस! करा अगदीं वाटेल तशीं खलबतं करा, एक दिवस येईलच सगळी मसलत बोहल्यावर!

शृंखलाः—अहो, तिथंच थांबत नाहीं, बोहल्यावरून मंदिरांत, मंदिरां-तून मंचकावर, आणे मंचकावरून ही मसलत कडेवर बसून सारा गाव मिरवते! बरं पण कांक्षिणीबाई, मला आतां राणीसरकारांच्याकडे जायचं आहे, सावित्रीबाईसाहेबांचं वर्तमान ऐकायला! तुम्ही येतां का माझ्या बरोबर?

कांक्षिणीः—तूं हो पुढं (शृंखला जाते) मला तिच्या वरसंशोधनाचं वर्तमान ऐकून काय करायचं आहे? अगबाई, हा पहा गृहीणींना मोक्षाचा परमानंद देणारा आणि कुमारीकांचं हृदय हरण करणारा हा चंद्रमा आपल्या प्रियेचं, रजनीचं चुंबन घ्यावयाला लागून तिला हसवूं लागला आहे! हीच माझ्या भृंगराजांची लखोटा ठेवण्याची वेळ, तेव्हां लखोटा आला कीं नाहीं तें प्रथम पहातें! (जाते).

---

## प्रवेश २ रा.

[ स्थळ—जंगलरस्ता. सावित्री येते. ]

सावित्री--आजपर्यंत न उद्भवलेल्या विचारतरंगांनीं, या हृदयांत कशी खळबळ उडवून दिली आहे, आनंदाच्या लहरीवर लहरी उचंबळून एकमेकीमधें कोण उंच आहे, हे दाखविण्याकरतां जणू काय स्पर्धा सुरु झाली आहे व ही मेली लाज हिनं जर रात्रंदिवस माझ्या जीभेवर दडपण घातलं नसतं, तर या हृदयांत चाललेल्या जयघोषाला वांचा फोडून, मीं देखील हें तपोवन, या प्रियकराच्या नावाच्या उच्चारानं दणाणून सोडलं असतं. ( सारंग येते ) सारंगनयने बरं झालं तूं लौकर आलीस ! काय ग म्हणाले ते ? आपण तिथं गेलो तर चालेल ना ? चलतेस कां तिकडे ? काय म्हणालीस तूं त्यांना ? कुठें होतें ? काय करीत होते ?

सारंग०—अग बाई बाई बाई ! अग पण हो ! एक एक विचार ! एकदम तुझ्या सगळ्या प्रश्नांचीं उत्तरं त्या ब्रह्मदेवाला सुद्धां देता यायचीं नाहींत ! छे ! कामी जनांना संभाषण करायला सहस्र जिव्हा देखील अपुऱ्याच पडतील !

सावित्री—लागलीस कां तूं द्राविडी प्राणायाम करायला ? काय म्हणाले ते ? मग चलायचंना आपण तिकडे ?

सारंग०—ते काय म्हणाले ते जर मीं सगळं तुला सांगू लागले तर एक रामायणच होईल, आहे का तुझी सगळं रामायण ऐकायची तयारी ?

सावित्री--मीं नाहीं जा तुझ्याशीं बोलत ! आहे तयारी !

सारंग०—ऐक तर थोडक्यांत सांगते, रामाला जशी जानकी तशीच सत्यवानाला सावित्री, जसं रामाचं सीतेवर प्रेम तसंच सत्यवानाचं सावित्रीवर प्रेम जसा, राम तसा सत्यवानही, एकपत्नी, एकवचनीं आहे, झालं ना आता ?

सावित्री—पण सखे जसं ते बोलले, तसाच तूं माझ्याबद्दलही त्यांना विश्वास दिलास ना ? मग मनःपूर्वक तुझ्या तोंडानं उच्चार करीनास एकदा! बोल, बोल कीग ! मीं नाहीं जा, अशा कपाळाला आठ्या घालून मी

रुसेन तुझ्यावर; दहादा बोलायला आलीस, तरी मी बोलणार नाहीं ( रागा-वून तोंड फिरवते. )

सारंग०--रागवा ! रहा, अशाच फुरंगटून उभ्या रहा; तर मग राग-वाच हं ! मग मीं त्यांच्या जवळ तुमच्या बद्दल काय काय सांगितलं, तुम्हीं करतां त्याच्या दसपट प्रेम सावित्रीचंही आहे, पाण्याच्या प्रत्येक घोटाबरोबर कशा पदोंपदीं तुमच्या आठवणी काढते, कसे तिचे डोळे आनंदानं गहींवरतात, ह्याचं मीं किती किती खुबीदार वर्णन केलं, आणि तें ऐकत असतांना, ते देखील गहींवरून काय म्हणाले, ते मीं मुळी देखील तुला सांगत नाहीं जा. मीं देखील अशी रागावते तुझ्यावर ( रागावून तोंड फिरवते. )

सावित्री--मी नाहींग तुझ्यावर रागावत ! मी चुकले, चुकले म्हणते ना ?

सारंग०--डोळ्याला पाणी आणून, त्यांचा कंठ गहींवरून आल्यामुळं ते म्हणाले—

सावित्री—कायग म्हणाले ?

सारंग०--सारंगनयने, मला या वेळेस एक अक्षर देखील तोंडाबाहेर काढवत नाहीं.

सावित्री--सखे, ते कायगं आणखी म्हणाले ? अगदीं त्यांच्या मुखां-तले शब्द सांग हं ! कायगं असा अंत पहासेस ? सांगेनास झटकन !

सारंग०—एक अक्षर देखील तोंडाबाहेर निघत नाहीं.

सावित्री—जा गडे, आम्ही नाहीं जा अशानं ! ( तोंड फिरवून उभी रहाते. )

सारंग०--( स्व.हंसत ) काय देवाची विचित्र करणी आहे पहा. आजन्म कधीं ज्यांचं मुखावलोकनही घडलं नाहीं; अशी दोन अनोळखी तिऱ्हाइतं, परकी का असेनात, पण दोन प्रेमी हृदयं, प्रेमाच्या रज्जूंनी एक वेळ बांधली गेली म्हणजे एकमेकांवर मततेची वरचढ करण्याची सारखी धावपळ सुरू करतात. ही दोन प्रेमळ पांखरं एकमेकांवर मम-

तेच्या छायेचं पांघरूण घालण्याकरतां मायेच्या आकाशांत कशी उंच उंच भराऱ्या मारूं लागतात.

पद १४ वें.

ममते महिमा तुझा गे। न कळे विपरीत भारी ॥ ध्रु०॥
रानींवनीं या कंटक तुडवी। पाही राजकुमारी। राज-
विलासा त्यागुनी फिरते। दुनियेच्या बाजारी ॥ १ ॥ देह
गेह स्मृति विलया नेसी। आपपर नातीं सारी। हंसविशी
कोणा। रडविशी कोणा। दिससी लीला धारी ॥ २ ॥

सावित्री—पण तूं आतां हे सगळे आढेवेढे सोडून सरळ सांगणार आहेस का! चलतेस ना त्यांच्याकडे?

सारंग०--आले असते ग, पण त्यांनी सांगितलं कीं ही गोष्ट तें आपल्या मातापितरांना युक्ती-प्रयुक्तीनं सांगून त्यांचा रुकार मिळेपर्यंत आपण द्युमत्सेन महाराजांच्या दृष्टीस पडणं ठीक नव्हे.

सावित्री—कां बरं? आपल्या लग्नाला, ते रुकार कां बर देणार नाहींत?

सारंग०--अग ते पडले तपस्वी निर्धन, आणि तूं पडलीस सुकुमार राजकन्या! तेव्हां या संयोगाला रुकार देतांना त्यांना थोडं कानकोंडं वाटणारच!

सावित्री--अरेरे, ही श्रीमंताच्या अंगाखांद्यावर लोळणारी चंचल लक्ष्मी, गोरगरीबांच्या काळजाला असे निष्ठुर वज्रप्रवाह करीत असते का? चल सारंगनयने, आपण आपल्या शिबिरांत जाऊं. तिथं या रत्नांचा आणि वस्त्रप्रावर्णांचा त्याग करून, मी त्यांच्यासारखीच वनवासी होते ग, मग तर या गरीबावर ते आपली कृपादृष्टी टाकतील ना? चल तर.

सारंग०--होय खरंच, चाणाक्षांनाही पुन्हां आपल्या राजधानीकडं मुक्काम हलविण्याची, मी सूचना दिली होती, तेव्हां तीहि तयारी कुठवर आली आहे, हेंही पहायला सांपडेल. चल तर (थांबून) हो बाई बरी आठवण झाली, तूं एकटीच शिबिराकडं जा, मी इथंच थांबते. मला किनई थोडं काम आहे इथं!

सावित्री—म्हणजे ग काय?

सारंग०--तसं नव्हे ग, मला सत्यवान महाराजांनीं सांगितलं कीं, ते आतां तुला निरोप देण्याकरतां समक्ष इथं येणार आहेत ! आतां इतक्यांतच येतील, आणि तूं तर हा श्रीमंती वेष बदलण्याकरतां शिबिराकडं धांव घेत आहेस, तेव्हां निदान म्हटलं कीं, मीतरी एकटीच इथं थांबते, सांगेन तरी त्यांना कीं, तूं शिबिराकडे बैरागीण व्हायला गेली आहेस म्हणून ! जा तर मग जातेस ना ? जा बघू चटकन ! हं उचल पाऊल झपझप.

सावित्री--सखे, तुझ्या या मधुर वाणीनं सर्व विश्वाचं जड ओझं माझ्या पायांत बांधल्यावर मला कसंग पाऊल टाकवेल ?

पद १५ वें.

तुचलती या समया पाही। मम पद प्रेममया झालें मी ॥ ध्रु० ॥ रोमांचित मम झाली काया। कंप सुटे या हृदया। सकल तिमिर। जाई लया। झालें मी ॥१॥

या वेळेस माझे सर्व अवयव कसे गोंधळून गेले आहेत.

सारंग०--कांहीं गोंधळायला नको ! फार कशाला, हे पहा सत्यवान महाराजच आले. तुझे गोंधळलेले सर्व अवयव ते सावरून धरतील बरं आता ! ( सत्यवान येतो, सारंगनयना वंदन करते. )

सावित्री--कर बाई वाटेल ती थट्टा !

सारंग०--सावित्री, तुझ्याकरतां मला मात्र हीं रिकामीं दंडवतं घडताहेत हो. पाहिलंस ना, कसे स्तब्ध उभे राहिले आहेत ते ? काय करतील बिचारे ? तुझ्या या काळ्याभोर हरणासारख्या डोळ्यांची कट्यार लागून कसे घायाळ झालेले दिसताहेत ?

सत्य०—आश्रमांतील कांहीं आन्हिक उरकण्यांत मला थोडा उशीर लागल्यामुळं, तुम्हांला तिष्ठत रहावं लागलं, याचं मला फार वाईट वाटतं !

सारंग०—सखे सावित्री, अग तुम्ही उभयतां असे मुखस्तंभासारखे काय झालांत ? अग निरोप घेतेसना ? सारखे आपले डोळ्याचे भ्रमर त्या मुखकमलावर सोडून काय आरंभलं आहेस ?

सत्य०--हो, प्रथम येतांक्षणिच तुम्हांला सांगणार होतो, पण विसरलों; आपल्या या सुखसंयोगाला, माझ्या मातापितरांचा रुकार एकदांचा मिळाला.

सारंग०—होय कां ! वरं तर बाई, सावित्री, मी तिकडं शिबिराकडे जाते व निघण्याची सर्व तयारी करते, तुम्ही दोन विसराळू आहांतच एकमेकासमोर उभे. पहा कांहीं आठवलं तर बोलायला एकमेकाकडं पाहून !

सत्य०--सावित्री, आतां यापुढील माझं आयुष्य म्हणजे तूं परत केव्हां येशील हे क्षण मोजण्यांतच जाणार !

सावित्री--आपले चरणसाक्ष माझेंहि पण तसेंच जाणार !

सारंग०—दोन प्रेमी हृदयं, भाटासारखी जरी बोलकीं असलीं तरी एकमेकांसमोर येतांच, त्यांचं मुक्यांत रूपांतर होतं, आणि मग हे मुके, डोळ्यांनीं वाचाळापेक्षांहि जास्त बोलूं लागतात !

सावित्री--महाराज, मी होईल तितक्या त्वरेनं या चरणाच्या सेवेला परत येते. ( वंदन करून ) महाराज येऊं ना मी ?

सत्य०—सावित्री, त्या विरहाच्या तीव्र वेदना, कशा सहन होतील त्या होवोत.

सावित्री—महाराज शांत व्हा, मी एक क्षणही विलंब करणार नाहीं.

सत्य०—शांतता आणि प्रसन्नता आता सर्व लयास जाणार ! सावित्री,–

सारंग०—अगबाई चाणाक्ष आलेच, मी जाते पुढें, सावित्री ये हो सगळं आटपून चटकन ! ( जाते ).

सावित्री—महाराज एवढं एकंच सांगते कीं, या सावित्रीचा जर आतां कोणी परमेश्वर असेल, तर ते हे एक चरणच आहेत.

सत्य०—सावित्री, या तुझ्या प्रीतीनें, माझ्या हृदयांतील सर्वशक्ती हरण करून त्याला विकल करून टाकलं आहे ! या वेळेस जर ते तुझ्या कोमल करांनीं बांधलं गेलं नाहीं, तर ते उलून जाईल ( अलिंगन देण्यास पुढें होतो, सावित्री मागं सरते ).

सावित्री—थांबा थांबा महाराज, या बाहूतील स्वर्गसुख उपभोगण्या-

करतां, या हृदयांतील आत्म्यानं केव्हांच उडी घेतली आहे, पण केवळ जनापवादाकरतां हें जड शरीर इथं उभं आहे. परमेश्वराच्या नियमानं आणि आशिर्वादानं दोघेंही एकरूप होईपर्यंत केवळ या चरणांचाच आश्रय घेण्याचा माझा अधिकार आहे. ( पाय धरून ) द्या मला प्रेमपूर्वक निरोप द्या.

सत्य०--सावित्री, मी तुला आनंदानं निरोप देत आहे. जा, तुझ्या प्रेमाचं सुख मी अनुभवित आहे, परंतु तें किती आहे, हें मात्र सांगण्याला मी असमर्थ आहे. कारण-

### पद १६ वें.

प्रेमासी मोल नाहीं, प्रीती अमोल ठेवा ॥ प्रेमा विना न येना, वास्तव्य जगतीं कोणा ॥ ध्रु० ॥ प्रीतींत जन्मजीवा, प्रीतीच बंध देवा । प्रेमांत विश्व सारे, दे प्रेम जन्म देवा ॥१॥

महाराज येते तर मी.

सावित्री--महाराज, गरीबांनीं आणि कृपणांनी, पाहिजे तर आपल्या जवळील थोडीशी संपत्ती, पुन्हां पुन्हां मोजावी, परंतु आपल्या प्रेमाची संपत्ती मी लुटल्यापासून, मी इतकी श्रीमंत झाले आहे कीं, माझी संपत्ती मोजण्याला माझं सर्व आयुष्यही पुरं पडणार नाहीं !

सत्य०--जा सावित्री, लवकर परत ये. ( दोघेही दोन्ही बाजूस जातात ).

---

## प्रवेश ३ रा.

[ स्थळ-माजघर-व्यासपीठ. ]

हरणी--कायग शृंखले, बाबा तिकडं महाराजांच्या बरोबर सर्व सैन्याची पहाणी करायला गेले आहेत. ही आज आपल्याला चांगली संधी मिळाली आहे. आज आपल्याला थोडासा तरी विसावा सांपडण्याचा संभव दिसतो, नाहींतर सारखा हुतुतु नीं हमामा पाठीमागं लागलेला होता. कावळ्याची नजर आणि या कांक्षिणीची नजर सारखी आहे. जरा चोरून कुठं तोंड चुकवून काळविटांशी बोलेन म्हटलं तर बया लागलीच हजर ! कायग, तूं सांगितलंस ना काळविटांना कीं आज--

श्रृंखला—ते मीं कसं विसरेन ! मींहून काळवीटांना सांगितलं कीं, आज अगदीं तुम्हाला घरांत रान मोकळं आहे, आणि बिचारी हरणी सारखी रानांत तुमची वाट पहात बसली आहे !

हरणीः—शाबास! काळवीटाला पहाण्याकरतां, ही हरणी किती उतावीळ झाली आहे म्हणून सांगू ? ( शीळ ऐकून, पाहून ) होय ग होय तेच आले, श्रृंखले, तूं माल इकडं जवळपासच ऐस हो, आणि कोणी आलंच तर ताबडतोब मला सूचना दे हो.

श्रृंखला—कांहीं काळजी नको. हरणीबाई, जाते हो मीं, पण लक्षांत ठेवा, काळवीट रानांत शिरतो आहे, फार दूरवर, प्रेमाच्या कुंजांतून, लतावेलींतून, गुंफांतून, त्याला हिंडवू नका हो, नाहीं तर फुकट बिचारा वेलीच्या गुंताड्यांत अडकून गतप्राण व्हायचा ! जाते हो मीं !

हरणी--जाहो, पण मात्र इकडं कोणी यायला लागला तर ताबडतोब तुझ्या करश्रृंखलेनं तिकडंच बांधून टाक ( श्रृंखला जाते,–काळवीट येतो. ) इश्श भिता काय असं ? आतां इथं कोणी नाहीं.

पद १७ वें.

**प्रियकर भीति धरा या समया कां ? ॥ ध्रु० ॥ कंप सुटे धडकीं भरें, काय अशी, या हृदया ॥ १ ॥ रवी पतीची वाट बघे नलीनी मी प्रिय जाया ॥२॥**

काय हो तुम्ही तरी निर्दय आहांत ? आज इतके दिवसांनीं तुम्हाला माझी आठवण झाली का ? चला, खोटे कुठले ! पुरुष निर्दयच एकंदरींत.

काळ०--माझा काय बरं अपराध ? हा काळवीट या हरणीला अशी गळामिठी मारायला सारखी वाट पहात होता, पण काय करूं ? या रणदुंदुभीच्या सैन्यशिस्तीच्या धूमधडाक्यासुळं हूं का चूं करायला फुरसतच सांपडली आहे कुठं ! नुसतं आम्हाला, यंत्राप्रमाणं करून टाकलं आहे त्यांनीं. छे छे, असला भयंकर माणूस मीं नाहीं बाबा कधीं पाहिला !

हरणी—आणि म्हणूनच, आपले सगळे एकदांचे निश्चित काळवेळ ठरेपर्यंत, आपल्या प्रेमाचे बेत मी त्यांना कळविले नाहीं.

काळ०--बरं केलंस.

हरणी—पण मीं म्हणते गडे, तुम्हीच आपल्या उभयतांच्या लग्न-निश्चयाची गोष्ट त्यांना उलगडून सांगानात ?

काळ०—अग कबूल, पण रागाच्या भरांत,त्यानींच मला धरून उलगडून टाकला, तर लग्नाचं कारणच रहाणार नाहीं !

हरणी—खरंच बाई, त्यांचा रुकार मिळवणं म्हणजे एक प्रकारचं प्राणसंकटच आहे.

काळ०—अग पण प्रथम रुकार मिळालाच पाहिजे असं शास्त्र थोडंच आहे ? मीं तर म्हणतो एकदम पसार व्हावं, लग्नाची पक्की निरगांठ मारावी, परत यावं, आणि घट्ट पाय धरून सांगावं कीं पुन्हां आतां अशी चूक करणार नाहीं. झालं ते होऊन गेलं ते कांहीं परत येत नाहीं. काय तुला कसं काय वाटतं ?

हरणी—मीं म्हणते हें कधीं जमायचं नाहीं. अहो तुम्हाला जगायचं आहेना चार दिवस ?

काळ०—म्हणजे काय ? मीं कांहीं इथं प्राण द्यायला आलों नाहीं.

हरणी—तर मग आपल्याला कांहीं दिवस नशीबावर हवाला ठेऊन असंच चोरटं प्रेम करीत राहिलं पाहिजे. सावित्रिचं लग्न होऊन स्वाऱ्या परत आल्या, म्हणजे मग आपला प्रश्न काढूं ! तुम्हाला कसं काय वाटतं ?

काळ०—चोरटं प्रेम ? बाकी त्यांत देखील कीं नाहीं एक प्रकारची खुमारी असते. ठीक, तर मीं अशीच चोरी, दरोडा, घरफोडी, करीत जाईन.

हरणी—तर मग मी देखील तुमच्याकरतां अशीच चोरटी, भामटी, उचली, होईन !

काळ०—असं का ! तर मग मीं प्रारंभ करतोच हं ! चल तर चोरटे, आण, कुठं माझं धन लपवून ठेवलं आहेस ते दाखीव ! मला एकवेळ तें हृदयाशीं घट्ट धरूं दे, चोरटी कुठली, दाखीव कुठं लपविलं आहेस तें ?

हरणी—होयकां ? तर मग दाखीवरे भामट्या कुठं माझ्या हृदयां-

तला ऐवज लपवून दडविलास तो ! भामटे कुठले ! ( दोघेही कंबर बांधून उभे राहतात. )

काळ०--घे, हे घे तुझं धन !

हरणी--घे, हा घे, तुझा ऐवज ! ( दोघे आलिंगन देतात. )

काळ०--खरोखर मदनराजा तुला शतशः नमस्कार असो.

पद १८ वें.

मदन सजला । दया नसे मुळीं तयाला । अदय । सकला जनां छळाया ॥ धृ ० ॥ कुसुमापरी कोमल शर असती । प्रखर विषाला ते लाजविती । हलाहलाला ॥ १ ॥ हासवी, रडवी, नाचवी, सकलां । प्रबलाहुनी ह्या प्रबला अबला करिती अनेक लीला ॥ २ ॥

शृंखला--( येत येत ) पळा, पळा, शत्रू, शत्रू, अहो दरोडा !

काळ०--झालं, घातलंन खिरींत तोंड ! अगपण शत्रू तरी कोण ? येतो आहे कोणत्या दिशेनं ! मोर्चा कुणीकडं आहे ?

शृंखला--कांक्षिणी आणि रणदुंदुभी !! दोन्हीं शत्रू अघाडी पिछाडीकडून येत आहेत.

काळ०--अरे बापरे, होय ना ? झालंच तर मग ! म्हणा 'तत्सत् ब्रह्मार्पणमस्तु !' अग लपीव, दडीव, वाचीव, पळीव....

हरणी--आतां काय करू तरी बाई ! अहो असं धांवता कुठं, पळता कुठं ? अचानक हातीं जाऊन सांपडला कीं ! अरे देवा. !

शृंखला--ही पहा कांक्षिणी इकडंच आली, आणि रणदुंदुभी मागून येऊन पुढेंच दरवाज्याशीं बोलत बसले आहेत ! छे, ते तर अगदीं रागावून, डोळे हिरवे पिवळे करून, सर्वांना शिव्यांचा भडीमार करताहेत.

काळ०--तलवार उपसलेली आहेना ? मग म्हणा तर ' इदं मम श्राद्ध कर्म करिष्ये !' काळवीटं तर्पयामि ! अगं वाचीव !

शृंखला--अहो असे घाबरु नका, दडा दडा या चौरंगाखालीं, चला दडा दडा ( व्यासपीठाखाली काळवीट लपतो. ) चला हरणीबाई, आपण तिकडं जाऊं ( कांक्षिणी येते. )

कांक्षिणी--घेतली बाई एक वेळ दादाची संमत्ती.! भारी चेंगट आणि कोपिष्ट स्वभाव हो त्याचा. हजार प्रश्न नाना प्रकारचे विचारले, काय सांगणार मीं तरी ? दिली उत्तरं झालं, जीं तोंडाला येतील तीं. मला विचारलं कीं तुला ते भृंगराज भेटणार तरी केव्हां ? सांगितलं झालं आज उद्यां भेटणार म्हणून ! मला विचारलं कीं उद्योग तरी काय करतात ? सांगितलं झालं घरचंच पहातात म्हणून ! प्रणयभृंगा, कीती रे माझा अंत पहातोस? कानामागून आली आणि तिखट झाली, माझ्या मागून जगांत येऊन सावित्रीनं लग्न देखील ठरवून टाकलं आणि तूं जीवितेश्वरा, माझा कुमारीकेचा असा छळ मांडला आहेस ! ( व्यासपीठावर बसते )

काळ०--अरे बाप रे मातोश्री तर अगदी उरावरच येऊन बसल्या.

कांक्षिणी--जीवितेश्वरा ! जीवितेश्वरा ! !

काळ०—आता काशीविश्वेश्वरा, कैलासाला नेणें किंवा मृत्युलोकीं ठेवणं तुझ्या हातीं आहे रे बाबा. ! ( नमस्कार करतो. कांक्षिणीला हात लागतो. )

कांक्षिणी--(दचकून) अगबाई कोण हे ! धांवा हो धावा, चोर चोर !

काळ०--( बाहेर येऊन हात धरून ) थांबा थांबा ! गप रहा ! ! हे काय बरं कांक्षिणी,माझा गरीबाचा प्राण का घेणार? ही पहा क्षमा मागतो, पाया पडतो.

## पद १९ वें.

**वरी दया हृदयीं या, प्राण त्राण करी दासाचे ॥ धृ० ॥**
**तुजविण आतां कोणी न त्राता ॥ कमलाहुन कोमल मन**
**वदति जन ललनांचे ॥१ ॥ येईन कामा कधीं तरी तुझिया ।**
**विफल न जाई पुण्य कर्म काधिं या भूतलीचे ॥ २ ॥**

कांक्षिणी--कां आलांत ?

काळ०--तुझ्याकरतां !

कांक्षिणी—काय पाहिजे ?

काळ०—प्राणेश्वरी !

कांक्षिणी--कोण तुम्ही ?

काळ०--नाहीं कां या दासाला ओळखलंस ! आतां वाटेल ते करून माझे प्राण वाचीव (स्व.) तो रणदुंदुभी दैत्य बाहेरच तलवार पाजळून बसला आहे, करता काय ?

कांक्षिणी--असं असं (लाजून) इश्श आपणच का ते ? तुम्हीच का ते ?

काळ०--होय होय आम्हीच ते ! (स्व.) कोणा लेकाला ठाऊक कोण मसणे तें ?

कांक्षिणी--आपणच का ते प्रणयपत्रिकांचें चिलगुप्त ? माझे गुप्त-गंधर्व ?

काळ०--होय होय, तोच गुप्त गंधर्व ? प्रणयभृंग (स्व.) आतां हा भुंगा कडकडून चावणारसं दिसतं. परमेश्वरा, सांभाळ रे बुवा, इकडं मातोश्री आल्या आहेत अगदीं हातघाईवर, अन तिकडं उंबरठ्यावर मामा बसला आहे, तलवार उपसून !

कांक्षिणी--असे शंकित कां होता ? गुप्तगंधर्वा, प्रगट व्हायला निर्दया किती रे दिवस लावलेस ?

काळ०--काय करूं मेनके, फुरसतच सांपडली नाहीं !

कांक्षिणी--थांबा हं, मीं दादाला हांक मारते.

काळ०--अग नको, नको मारू नकोस.

कांक्षिणी--हो गडे, असं काय ? मारते गडे.

काळ०--अग, नको, मारू नकोस ! इतक्यांतच नको ! (स्व.) केव्हां तरी या जन्मांत आहेच व्हायची भेट त्या यमाची.

कांक्षिणी--वरं तुमचंच का होईना, प्राणवल्लभा, मीं तुमच्याकरतां कशी वेडी झाले आहे रे.

काळ०--(स्वगत) हं आणलान खरा या वृद्धकुमारिकेनं, गळफांस लावण्याचा प्रसंग ! चैतन्यमर्दिने, सुसरकुमारी गिळगिळ मला एकदाची !

शृंखला--(दोघांना भेटतांना पाहून) अगबाई हरणाताई (हरणी येते) हरणाताई, हे पाहिलंत का कुमारकुमारी संमेलन ?




काळवीट—कुमारिकांनो ! वाटेल त्या अडगळींत मला दडवा ! (अं. २)

हरणी—( पाहून ) अरे मेल्या लांडग्या, श्रृंखले, घर बाई, मला घेरी येईलसं वाटतं, अरे निर्दय लांडग्या !

श्रृंखला--( तिला सांवरून ) पाहीलीत ना ? कशी गरीब कोंकरावर झडप घातलीनं ती ? अरे मेल्या फसव्या......

कांक्षिणी--प्रयणभृंगा, आतां इतक्यांत दादा येईल, मी तो इकडं येतांच गडे कायमचा सोक्षमोक्ष करून घेते.

काळ०--( घाबरून, स्वगत ) तो ब्रह्मसमंध आंत आला कीं कपाळ-मोक्ष झालाच! (उघड) अग मीच जाऊन भेटतो त्यांना ( जाऊ लागतो, ती मागं ओढते. )

कांक्षिणी—मीं नाहीं गडे तुम्हाला आतां दृष्टीसमोरून जाऊ द्यायची !

श्रृंखला—ऐकलंत ना हरीणीबाई आतां ही जीर्णकमलिनी या भृंगाला गिळल्याखेरीज का ठेवणार आहे ?

काळ०—(स्वगत) आणलीन खरी गच्छंतीची पाळी! (उघड) अग पण चारुगात्रे प्रेमाची अंगठी तरी घेऊन येऊ दे तुझ्या करांगुलींत घालायला !

कांक्षिणी—नको मेली ती आंगठी, जन्मभर माझ्या गळ्याभोंवती नुसता असा हा हाताचा हार असला तरी पुरे ! थांबा हं मीच दादाला घेऊन येते, व आधीं सगळं सांगते, म्हणजे ते तुमच्याशी धुसफूस करणार नाहींत. ( गर्दीनं निघून जाते. )

काळ०--अगं कंबुकंठे ! कुरंगनयने !! प्रेमकल्लोळे !!! काय करावं गेलीच ही ! परमेश्वरा– (श्रृंखला व हरणी येतात.)

हरणी--अरे मेल्या लांडग्या–

काळ०--आतां काय सांगावं ?

श्रृंखला--अरे मेल्या कोल्ह्या–

काळ०—आतां काय बोलावं !

हरणी--अरे बगळ्या–

काळ०—आतां काय रडावं ?

हरणी—अरे निर्दया, असा कां रे फसवून माझा गळा कापलास ?

श्रृंखला— नुसता कसारे या कांक्षिणीच्या पैशावर भाळलास ?

रण०--( आंतून ) हरामखोरा, काय मांडलं आहेस घरांत ?

श्रृंखला--अग बाई हरणाताई ! चला पळा ! आधी आपले प्राण वांचवा ?

काळ०--अरे बापरे आतां हा मार्कंडेय कुणीकडून येतो आहे देव जाणे, आपण याच दारानं पळून जावं. ( जाऊं लागतो. रण० येतो ).

रण०--कायरे हरामखोरा कुणीकडं येत होतास !

काळ०--येत नव्हतो, जात होतो, जातो! भेटेन पुन्हां. (जाऊं लागतो).

रण०--चाललास कुठं ? आधीं कोण, कुठला, काय, कशासाठीं आलास ? बोल ( तलवार दाखवून ) हे पाहतो आहेसना ?

काळ०--पहातो आहे ? (स्वगत) आतां इथंच समाधी ! पाहू या प्रयत्न करून ! आतां असाच डाव टाकावा !

रण०--काय पुटपुटतोस ? बोलतोस कीं नाहीं ? कां दाबूं नरडं !

काळ०--( घाबरुन ) मीं-मीं-प्रणयभृंग !

रण०--भृंग ? घरांत कां शिरलास ? दे याचं उत्तर ! सांग, सांगतोस कीं नाहीं ?

काळ०—थांबा सांगतो !(स्वगत) आतां रामबाण योजून पहावा ! नाहीं तर आहे इथूनच स्वर्गारोहण ! ( उघड ) आतां सांगा म्हणून आग्रह करतांच तर ऐका ! मीं आपल्या भगिनीचा प्रणयभृंग. ( स्व. ) खुलत चालला बरं का चेहरा यमाचा !

रण०--कांक्षिणी म्हणत होती खरंच कीं, आज उद्यां भेटणार म्हणून ! असं असं ! आहो ! अलभ्य लाभ ! वाहवा ! अलभ्य लाभ ! हरकत नाहीं. सरदार भेटा मला कडकडून. ( आंवळतो, काळवीट ओरडतो ) हरकत नाहीं, कांक्षिणी आहेच तशी चतुर. ( पुन्हा भेटतो ) हरकत नाहीं हरकत नाहीं भेटा मला.

काळ०—अरे अरे अरे, अहो पण तुमच्या भेटींतच आटपलो, तर तुमच्या भगिनीकरतां काय शिल्लक रहाणार ?

रण०—हरकत नाहीं, चला आम्हीं चार दिवसांनीं स्वारीवर निघणार

आहेंत त्याच्या आंतच, तुमचा सोहळा उरकून घेऊं. कांक्षिणी, अग कांक्षिणी, ए अक्का-

कांक्षिणी—( येऊन ) दादा हेंच रे तेच !

शृंखला—( येऊन ) हाच ग मेला तो !

हरणी—( येऊन ) तोच ग मेला हा !

---

## प्रवेश ४ था.

[ स्थळ-जंगलरस्ता, व्याध दोन सैनिक घेऊन येतो. ]

व्याध—चला व्हा पुढं, अरे हा पहा राजपुत्र आलाच. ( दुसरीकडून सत्यवान येतो ). राजपुत्रा, तुझ्या आश्रमासभोंवतीं या दोघांनीं सारखी टेहळणी ठेवल्याचा मला संशय आल्यावरून मी यांना इथं धरून आणलं आहे. हे कोणी तरी मायावी कपटी लोक दिसतात. यांनीं आश्रमासभोंवतीं धनधान्याची, कंदफळांची समृद्धी करून, एका उंटालाही उचलतां येणार नाहीं, इतक्या सुवर्णमुद्रांची रास आश्रमांत टाकून, स्वीकार करण्याविषयीं तुझ्या मातापितरांना गळ घालीत होते. तेव्हां हें कांहीं तरी कपट आहे, असं मला वाटून त्यांना मी धरून आणलं आहे. बरं झालं, हे मुकाट्यानें आले, जर का दंगामस्ती करते, तर या मोळींतील लांकडांनीं यांचीं हाडं नरम करून, यांची खिळखिळी हाडं भरलेल्या त्या चांबड्याच्या पिशव्या, मला फरपटत ओढीत आणाव्या लागल्या असत्या.

१ ला सैनीक--ए आडदांड रानवटा, चुप रहा.

व्याध—हं, हं ! केवळ तुझ्याकडे पाहून हा परशु अनमान करीत आहे. आतां एक शब्द तरी बोल कीं, मग पहा याचा काय प्रभाव आहे तो !

सत्य०—( व्याधाला थांबवून ) व्याधा, स्तब्ध रहा. ( सैनिकास ) हा काय प्रकार आहे तो कृपा करून सांगतां का ?

२ रा सैनिक—होय महाराज. आम्ही राजकन्या सावित्रिकिडील लोक आहोंत. राजकन्या सावित्रीच्या आज्ञेवरून आपल्या आश्रमांत सर्व

प्रकारची समृद्धी करण्याचं काम आमच्यावर त्यांनीं सोंपवलं होतं. तरी कृपा करून या सर्व वस्तूंचा स्वीकार आपण करावा, येवढीच आमची विनंति आहे.

सत्य०—याबद्दल मी आपला व राजकन्येचा अत्यंत आभारी आहे. परंतु आपल्या या वस्तूंचा मला केव्हांही स्वीकार करतां येणार नाहीं, आपण खुशाल याचा इतर गोरगरीबांना दानधर्म करा किंवा बरोबर घेऊन चला.

व्याध—राजपुत्रा, तुझ्या पित्यानं व मातेनं हें यांना केव्हांच सांगितलं ! पण यांनीं सारखा लोचटपणा चालू ठेवला होता, आणि म्हणूनच यांना धरून आणलं !

सत्य०—आमच्यापेक्षां जास्त गरीब, दुःखी, कष्टी किंवा गरजू लोक या तपोवनांत पुष्कळ आहेत त्यांना सर्व धनधान्य धर्म करा.

१ ला सैनिकः--ठीक आहे, आपली इच्छा तर मग आम्हांला आज्ञा असावी. ( जातात )

व्याध--राजपुत्रा, आज मला वाटलंच कीं तुला या निरोपाच्या भानगडींत, आश्रमांत यायला बराच उशीर लागणार ! आणि म्हणूनच मीं ही लाकडांची मोळी आणि कंदमुळं गोळा करून आणलीं. राजपुत्रा, तूं आताचा केलेला त्याग पाहून मला फार कौतुक वाटलं. खरंच आहे, संपत्तीची आणि धनाची काय प्रतिष्ठा ? मनाचं औदार्य दाखवावयाला परमेश्वरानं राजाला व गरीबाला सारख्याच मोजमापाचीं हृदयं आणि संधी दिली आहे. ( स्वगत ) राजपुत्राची सध्याची ही स्थिती पाहिली, म्हणजे माझ्या डोळ्याला कसं पाणी येतें. ( डोळे पुसतो ).

सत्य०--व्याधा, कां बरं डोळयाला पाणी आणलंस ? माझ्याबद्दल वाईट वाटलं होय ? बोल कां बरं पाणी आणलंस ?

व्याध--कोण ? कुठें ? छे, आतां इतक्यांत एक धुंधुरडं माझ्या डोळ्यांत गेलं.

सत्य०--( स्वगत ) सर्वत्रांनीं माझ्याबद्दल कष्टी व्हावं, प्रत्येकाच्या उपकारांनीं माझा जीव दडपून टाकावा, आणि मोबदला देण्याला मी

असमर्थ असावं, एवढ्याकरतांच माझा जन्म झाला आहे कीं काय नकळे. हं आता असंच केलं पाहिजे. उगीच एखाद्याच्या चांगुलपणाचा अंत पहाणं हा शहाणपणा नव्हे. तसंच विनाकारण उपकारांचा बोजा शिरावर रहाणं यांत माणुसकी नव्हे. काय वाटेल ते होवो याला एकवेळ सांगावच. ( उघड ) व्याधा, असा इकडे ये. तुझे उपकार माझ्या शिरावर इतके झाले आहेत कीं ते यापुढें मला सहन करणं शक्य नाहीं. मी तुला अर्पण केलेली आणि तुझ्या मालकीची झालेली, मौक्तिकमाला, तूं मला अत्यंत औदार्यानं परत दिलीस. केवळ माझ्याकरतां अहिंसा पत्करून गरीब पशु-पक्षांना जीवदान दिलंस, अष्टौप्रहर माझी आणि माझ्या माता-पितरांची अखंड सेवा काबाडकष्ट करून केलीस ! या तुझ्या ऋणांत, मला याउपर रहावयाचं नाहीं असा माझा कृतनिश्चयच झाला आहे. चल, मी तुला माझ्याजवळ असलेल्या आणखीही दोन मौक्तिकमाला देतो, त्या घेऊन तूं दुसऱ्या तपोवनांत जा आणि आनंदानं कालक्रमण कर, पण या तपोवनांत मात्र राहूं नकोस.

व्याध--राजपुत्रा, माझे तुझ्यावर काडीइतके देखील उपकार नाहींत, आतां तूं आहेत म्हणतोस, हा तुझा थोरपणा आहे.

सत्य०--तुझे माझ्यावर अतीशय उपकार झाले आहेत रे! तूं मौक्तिक-माला घेऊन हें तपोवन सोडून जा कसा !

व्याध--आतां माझे उपकार आहेच म्हणतोस, तर मीं मौक्तिक-माला घेतो पण मला हें तपोवन सोडून जायला कां सांगतोस ?

सत्य०--तुझं ऋण वाटूं नये म्हणून.

व्याध—असं असं ! तर मग राजपुत्रा, तुला सांगतों कीं, माझे तुझ्यावर काडीइतके देखील उपकार नाहींत; पण उलट, तुझ्या सत्संगतीचे आणि सदुपदेशाचे उपकार माझ्यावर येवढे झाले आहेत कीं, या शरीराचे जोडे करून तुझ्या पायांत घातले, तरी ते फिटणार नाहींत ! झालीना आता फिटास् फीट ? आतां मात्र जा जा म्हणून माझ्या मागं लागू नकोस ?

सत्य०--तें कांहीं नाहीं, तुला गेलंच पाहिजे. विनाकारण मला तूं आपल्या उपकारानं कां बरं लाजवतोस ? तें कांहीं नाहीं, तुला गेलंच पाहिजे.

व्याध--अरे वा, पण आता मीं जाणार कुठं ! मोठं नवल आहे ! राजपुत्रा, तुझ्या या उजव्या पायाला जा म्हणून सांग पाहूं !

सत्य०--व्याधा, हें काय वेड्यासारखं बरळतोस ?.

व्याध--राजपुत्रा, हें वेड्याचं बरळणं नाहीं. तुझ्या संगतीनं चांगल्या पंडितासारखा तुझ्याशीं वाद घेतो आहे ! आजपर्यंत तुझ्या या पायानं, हें सर्व तपोवन तुडवलं, काष्ठांचे भारे वाहून नेले, थंडींतून, उन्हांतून, पावसांतून, चिखलांतून कंदफळं वाहून नेतांना ठेचाळले, रक्तबंबाळ झाले, थकले दमले ! तूंही त्यांना मातेच्या नकळत, चोळलंस, तैलमर्दन केलंस, उन पाण्यानं शेकलंस ! मग आतां त्या तुझ्या उजव्या पायाला सांग पाहूं, कीं बाबा माझे आतां काबाडकष्ट करण्याचे व भार वाहून नेण्याचे तुमचे उपकार नको आहेत ! मला आतां गरीबाला मुळींच ऐपत नाहीं. तेव्हां बाबांनो जा, एखाद्या लंगड्या राजाला जाऊन चिकटा ! तो तुम्हाला चांगले शालजोडींत ठेवील, दासदासीकडून चोळवील. पाहूं या जातात का तुझे पाय ! हं, सांग जारे, बाबा उजव्या पाया–

सत्य०--व्याधा, मला तुझं बोलणं समजलं. ( स्व० ) कांहीं तरी याच्याशीं नसती कुरापत काढूनच याला टाळला पाहिजे. ( उ० ) व्याधा, मला हा तुझा वेदांत, हटवाद, हा फटकळ स्वभाव, ज्याच्या त्याच्याशीं तुझा हा रानवट उर्मटपणा मला मुळींच आवडत नाहीं. ऐकलंस ? तुला वाटलंच तर तूं मधून मधून मला येऊन भेटत जा, पण तूं इथून जा कसा !

व्याध--संपलीना एकदाची माझ्या दुर्गुणांची आणि खोड्यांची यादी ? कांहीं का असेना ! माझ्या मोत्या कुत्र्यापेक्षां तर मी दुर्गुणी नाहीं ना ? राजपुत्रा, माझ्या मोत्या कुत्र्याची तुला एक गंम्मत सांगू का ?

सत्य०--मला तुझ्या कुत्र्यामांजराच्या गोष्टी ऐकायची मुळींच जरूर नाहीं.

व्याध—जरूर कशी नाहीं ? ज्या तपस्वी ऋषींनीं जगत्कल्याणाकरतां, कुत्रीं, मांजरं, कोल्हीं, बकरीं, यांच्या मजेदार गोष्टीं लिहून उराएवढाले भूर्जपत्रांचे ढीग पाडले, ते सर्व निरुद्योगी वेडे होते काय ? अरे पण, नुसती माझ्या गरीबाच्या कुत्र्याची गोष्ट ऐकून तर माझे उपकार

तुझ्यावर वाढणार नाहींत ना ! काय, का वाढतील ? मग मोठं नवलंच आहे म्हणायचं.

सत्य०—( स्व. ) हा मला कुठंही बोट शिरकावू देत नाहीं ( उ. ) व्याधा, चल सांग चटकन तुझी गोष्ट थोडक्यांत !

व्याध--ऐक तर, राजपुत्रा, नुकतंच कांहीं दिवसापूर्वी मी दिवसभर शिकार करून, सायंकाळीं आपल्या झोंपडींत परत फिरलों, तों इतक्यांत एकदम सोसाट्याचा वारा सुटून सर्व आकाश मेघानं काळमोर होऊन, प्रचंड गडगडाटानं कडाडून विजा लवूं लागल्या ! सर्व रान थरारून गेलं ! सर्व पशुपक्षीं, आपापल्या गुहांतूत व घरट्यांतून, उरांत धडकी भरून दडून बसले. प्रचंड सोसाट्याच्या वाऱ्यानं, आजन्म ताठयानं उभे राहिलेल्या वृक्षांचे शेंडे, जणूं काय पश्चात्तापानं नम्र होऊन, मायभूमीला वंदन करू लागले. काळ्याभोर मेघांच्या उदरांतून, स्पटिकासारखा शुभ्र पाषाणांचा वर्षाव सुरूं झाला. मी एका तुटलेल्या कड्याचा आश्रय घेऊन, हा कैलासनाथाच्या सहज लीलेचा प्रलय पाहिला. सर्वत्र जलमय झालं !

सत्य०—तर मग तूं तुझ्या परम भाग्यानंच वाचलास म्हणायचा ?

व्याध—राजपुत्रा, केवळ माझ्या भोळ्या कैलासनाथाच्या कृपेसुळंच वांचलों.

### पद २० वें.

**विश्वास ठेवतांना । शिव काय मग करीना ॥ निजदास करील कां तो । जगतांत दैन्यवाणा ॥ ध्रु० ॥ देव तो कशा भजावा । अपमृत्यु टाळवेना ॥ धर्म तो कशा जपावा । जरी दुरित तो हरीना ॥१॥ भजन मनन या व्रतांना । जरी शांती देववेना ॥ अंध पंगू नाहीं माझा । कैलासनाथ राणा ॥ २ ॥**

सत्य०—बरं पण तुझ्या गोष्टीचं काय पुढं ?

व्याध--त्याच गोष्टीच्या मी ओघांत आहे. कैलासनाथाची क्षणिक लहर फिरतांच, सर्वत्र शांत झालं ! वृक्ष, वनस्पति, लता थरारून उभ्या राहिल्या, आकाशांतील कृष्ण मेघ दुभंग होऊन, आंतून चंद्रिका डोकावूं लागली ! काजवे चमकू लागले, रानकिड्यांचा कीर्रर्र आवाज सुरू

झाला, मधून मधून कोल्हेही हुकी देऊ लागले, अशा रितीनें मी धनुष्य टेकीत सांवधगिरीनं चालू लागलो !

सत्य०---व्याधा, अजून तुझ्या गोष्टीचा शेंडाबुडखा याचा कांहींच थांग लागत नाहीं. चटकन मुद्यावर ये पाहूं !

व्याध---राजपुत्रा, मी माझा मुद्दा प्राण गेल्यानं देखील सोडणार नाहीं. ऐक, अशा रितीनं सावधपणानं चालतां चालतां एका खळग्याला चुकवून मी चार पावलं पुढं आलों, तोंच मागं डुब्बदिशी आवाज होऊन खळग्यांत कांहीं तरी पडल्यासारखं वाटलं. थोडा तसाच कानोसा घेतला तो कांहीं तरी आंत धडपड करीत आहे, नाकातोंडातून पाणी गेल्यामुळं फूत्कारे टाकीत आहे, असा भास झाला ! त्यासरशीं मागं फिरून डबक्यांत डोकावलों, तों कोणीतरी पोर धरपड करीत आहे, असं वाटलं ! अरे अरे अरे ! बिचारं फुकट मरणार, असं वाटून मी त्या खळग्यांत उतरलों, आणि पाहतों तों तें माणसाचं पोर नसून एक कुत्र होतं ! म्हटलं आतां उतरलोंच आहोंत, कुत्रं काय आणि माणूस काय ? जीव दोघांचेही सारखेच ज्याला त्याला प्यारे, आणि गंम्मत पहा राजपुत्रा, वांचविणाराला त्याचं पुण्यही पण सारखंच. काढला बाहेर त्याला आणि मी पुढं चालू लागलों. माझी झोंपडी अशी एका हाकेवर आली, इतक्यांत पुन्हां कांहीं चाहूल वाटली, म्हणून मागं वळून पहातों तों आपला मोत्या, माझ्या मागं हजर ! मला लहानपणापासून होती जरा कुत्र्याची चीड, म्हणून त्याला हांकलून द्यायला लागलो, हाडहूड केलं, धनुष्य उगारलं, जवळपास सांपडेल तें फेंकून मारलं, अगदीं तसल्या थंडींत घामाघूम झालो ! काय सांगू राजपुत्रा, कुत्र्याचं एक पोर हाकून देतां येईनारे मला ! कंटाळलो, एकदम धूम ठोकून झोंपडींत शिरलों, तों आपला मोत्या दारांत हजर ! दार लावून घेतलं, सकाळीं उठून दार उघडतो, तों चटकन उडी मारून पाय चाटूं लागला ! तशी आली झालं दया आणि घेतला ठेऊन झालं !

सत्य०---हं, कळला मला तुझा अर्थ. तूं त्याला ठेऊन घेतलास हें ठीक केलंस, पण तुला मात्र गेलंच पाहिजे.

व्याध---माझ्या जाण्याचं मी पाहिन रे, पण त्या मोत्याची गम्मत तर पहा.

[library stamp]

सत्य०—तुझी गोष्ट तरी मोत्याची किती आहे ! (स्वगत) पण आहे खरंच गमतीची.

व्याध—राजपुत्रा, जवळ जवळ संपतच आली. काय त्या बेट्याची गंम्मत पहा. माझ्याशिवाय कोणालाही हात लाऊं देत नाहीं, किंवा तो जवळ असला म्हणजे माझ्या जवळ येण्याची कोणाचीहीं प्राज्ञा नाहीं. अगदीं लेकाची रानवट, जंगली जात आहे बघ ! हं पण राजपुत्रा, गुण मात्र अस्सल खानदानींचे आहेत. माझ्यावर त्याचे किती उपकार आहेत म्हणून सांगू ? राजपुत्रा, एके दिवशीं रात्रीं--

सत्य०--हं आतां कुत्र्याची संपवून मांजरीची गोष्ट सुरू केली वाटतं.

व्याध—छेरे, त्याच कुत्र्याची आहे. एके दिवशीं रात्रीं मीं माझ्या झोंपडींत झोंपलो असतांना एकदम दचकून जागा झालो, आणि पहातो तों माझ्या पायाला एका काळ्या भोर नागाचा विळखा बसला असून, त्याची फूफू करीत असलेली फणा मोत्याच्या तोंडांत ! बेट्याचं तोंड रक्तबंबाळ झालेलं ! ताबडतोब उशागतचा परशू घेऊन विळखे कापून काढले ! मोत्यानंही तोंडातली फणा सोडली. पहातो तों त्या फणेच्या मोत्यानं चावून चावून अगदीं चिंध्या केल्या होत्या ! अहाहा ! एकदम त्या माझ्या मोत्याला उराशीं घट्ट कवटाळून कैलासनाथांच स्मरण करून पोटभर रडलो ! फार बेट्याचे माझ्यावर उपकार झाले आहेत. मी देखील त्याला लाथ मारून घालवून देणार आहे. नको बाबा, उगीच त्याचे उपकार माझ्यावर वाढायला. हो, मीं गरीब, फेडणार कसे ? माझ्याजवळ थोड्याच दोन मौक्तिकमाला आहेत कीं मी त्याला देणार.

सत्य०—( गहिवरून ) व्याधा, पुरे कर, घणाचे घाव घालून माझं हृदय फोडू नकोस. पुण्यवान पुरुषा, साधुपुरुषा, मला कडकडून भेट. तुझ्या स्पर्शानं माझा उद्धार होईल रे! ( दोघे आलिंगन देतात. )

व्याध--राजपुत्रा, मी चालतां बोलतां, बुद्धीचा धडधाकट माणसासारखा माणूस. मी प्रामाणिकपणांत कुत्र्याहून निपटारा होऊन जाऊं का रे ? पशूपेक्षां माणसांत जास्त भलाई पाहिजे, म्हणून माझ्या कैलासनाथानं माणसं जगांत निर्माण केलीं. नाहींतर कुत्र्यामांजरांनीं सर्व जग भरून

काढणं त्याला अशक्य होतं कीं काय ? तूं काय मला जनावराहून निपटारा समजलास ?

सत्य०—व्याधा नाहीं रे नाहीं ! मी चुकलो, मी तुझी पुन्हां पुन्हा क्षमा मागतो.

व्याध—पुन्हां मला हें तपोवन सोडून जा म्हणून म्हणणार नाहींसना?

सत्य०—छे छे ! पुण्यवंता, उलट तूंच मला अंतर देऊ नको ! दे तर मला तसं वचन--

पद २१ वें.

देई वचन मज आता किराता। न घडो अंतर या पतिता ॥ ध्रु० ॥ तव सहवासे जीवनयात्रा । शीतल करिन मी या भवतापा ॥ १ ॥

व्याध--राजपुत्रा, या जीवांत जीव आहे, तोंपर्यंत मी हे तुझे चरण कधींच सोडणार नाहीं.

सत्य०—व्याधा चल तर, तिकडे माझी मातापितरं आपली वाट पहात असतील.

व्याध—चल. ही कंदमुळंफळं आणि परशु घे तुझ्या हातांत, आणि हा पहा काष्ठाचा भारा घेऊन, तुझ्या मागोमाग तुझा मोत्या हजर. ( चालतांना ) राजपुत्रा, वठणीवर यायला फार वेळ घेतलास रे ? पण हरकत नाहीं, तूंही एक खंदा–गडी आहेस.

सत्य०—परमेश्वरा, तुझा वास राजवाडयांत नसून गरीबांच्या झोंपडीतच असतो हेंच खास ! व्याधा, चल तर. ( जातात. )

---

## प्रवेश ५ वा.

[ स्थळ–मैदान. रणदुंदुभी, प्रणयसिंह, मतंगज व इतर अधिकारी. ]

रण०—मद्रदेशांतील रणझुंझार सैनिकांनो, बोला हा विजय तुम्हीं कोणाच्या जिवावर संपादन केला ?

प्रणय०—रणदुंदुभीमहाराज, केवळ मद्रदेशांतील डोक्याच्या बळावर. मर्दुमकीच्या शिकस्तीची त्या वेळीं आम्हीं अगदीं कमाल केली. आणीबाणीचा प्रसंग पहातांच, मीं माझ्या सैनिकांना पर्जन्यास्त्र सोडण्याचा माझ्या अंबारींतून हुकूम सोडला. शिस्तीच्या संवयीनं यंत्राप्रमाणं बनलेल्या माझ्या सैनिकांनीं, हा हुकूम ऐकतांच, आपल्या समोरच्या शत्रूंच्या कमरेला मिठी मारून, प्रचंड गळा पसरून, नेत्रांतून पर्जन्याचा मुसळधार मारा सुरू केला. गळा काढून पर्जन्यास्त्र अभिमंत्रित असतांना शत्रु अचंब्यानं गांगरून कर्तव्यमूढ झाले. कमरेला, पायाला, गळ्याला, मारलेल्या वज्रामिठ्या पाहून, आणि चौपदरी गळ्यांतून, झंझावाताप्रमाणं निघत असलेला मंत्रघोष ऐकून, अंगवंग गांगरून गेले. ही अमोलिक संधि साधून, सेनासारंग, या प्रणयासिंहानं अंबारींतून निर्वाणीचा हुकूम सोडला. तावडतोब ससाण्याच्या वेगानं, ह्यांनीं या मद्रदेशांतील तटबंदीचा आश्रय केला. सेनासारंग, सैनिकांच्या पावलांच्या टांचा, जमिनीवर केव्हां असत, अधांतरीं केव्हां होत, किंवा नितंबाला केव्हां लागत हें तो सर्वसाक्षी सूर्यनारायण देखील पाहूं शकला नाहीं.

रण०—बोला हा विजय आपण कोणाच्या जिवावर मिळविलांत ?

प्रणय०—केवळ या मद्रदेशांतील तांदुळाच्या बळावर. सेनासारंग, विस्मयांत पडण्याचं कांहीं कारण नाहीं. तंडुलाच्या अल्प आहारानं आलेल्या पावलांच्या चापल्यावरच आम्हीं हा विजय संपादन केला आणि अशा रितीनें आम्हीं शांतता प्रस्थापित केली.

रण०—असो. चतुर विरांनो, एकंदरींत तुमच्या लक्षांत आलं असेल कीं, सर्व राज्याची भिस्त सैन्यावर असते ! आणि सैन्याची मजबुती शिस्तीवर असते! लवकरच आपल्याला राजकन्या सावित्रीच्या लग्नाप्रीत्यर्थ परदेशीं जावं लागणार, किंवा कदाचित् परकी लोक त्यानिमित्त आपल्या राजधानींत येणार ! तेव्हां आपल्या सैन्याची शिस्त दाखवून त्यांना चकित केलं पाहिजे ! एवढ्याकरतांच आज मीं तुम्हां सैन्यांतील अधिकारीवर्गाची परीक्षा घेणार आहे. चला सरळ उभे रहा, आज्ञा पालन करा. हं. “ सावधान ” ! नासाग्रदृष्टि, नासाग्रदृष्टि, बुबुळं नाकाच्या कोपऱ्यांत.

( तसे सर्व उभे रहातात ). " शाबास ! " वामभ्रमण " ( तोंड डावीकडे वळतात ). " अर्ध मंडळ ", " द्रुतगच्छ ! " ( चालू लागतात ). सव्य वाम, सव्य वाम, सव्य वाम. " तिष्ठ " ( उभे रहातात ). " वामभ्रमण " ( तोंड डावीकडे वळवितात ). " शस्त्रस्कंध " धनुष्य सरसवतात ) " सज्ज " ( धनुष्याला बाण लावून उभे राहातात ). " गुणाकर्ष " ( तीर दोरीसहित मागें ओढतात ). हं मूठ कानाला, मूठ कानाला, कंबर ताठ, पाय पुढें. "मुंच" ( तीर सोडतात ). "पूर्ववत्" ( सरळ उभे रहातात. ) शाबास, शाबास, अशी शिस्त पाळल्यावर, इंद्र सुद्धां पळवून लावूं. ठीक आहे. द्वितीय पाठः—" अधःपतन " ( सर्व पालथे पडतात ). एकदम सपाट, अगदीं सपाट, माणूस आहे कां मुर्दा आहे ! सैन्य पडलं आहे कां प्रेतं पडलीं आहेत ! " पूर्ववत् " ( सर्व पळत जातात ). " सव्यभ्रमण " (तोंडें उजवीकडे वळवतात ). " पलायन " ( सर्व पळत जातात ). ( ते गेल्यावर ) शाबास, शाबास, ह्या मैदानमाप छातीच्या रणपुंगवांनीं,डोळ्याची पापणी उघडते न उघडते तोंच मैदान मोकळं केलं. (पाहून) अरे हे बरेच दूर गेले. चला आपणही जाऊं या. " सावधान " ( सरळ उभा राहतो ). " सव्यभ्रमण " ( उजवीकडे तोंड फिरवतो ). " द्रुतगच्छ " ( चालू लागतो ). ( सव्य वाम, सव्य वाम, सव्य वाम करीत जातो. )

---

## प्रवेश ६ वा.

[ स्थळ–अश्वपतीचा दरबार. पात्रें–अश्वपती, मालवी. ]

मालवी—तें सगळं खरं, प्रसंग आला म्हणजे चांगले धैर्यवान देखील गोंधळून जातात, मग ही तर काय मुलीची जात. खरंच, मन चिंती तें वैरीही न चिंती म्हणतात, तें अगदीं खरं. आज आठ दहा दिवस झाले, मला झोंप कशी ती ठाऊक नाहीं. बरं त्यांतून मन थोडं घट्ट करून पडेन म्हटलं तर इतकीं भयंकर स्वप्नें पडतात, कीं नंतर जागी झालें तरी प्रहरानु प्रहर हृदयाची धडकी थांबतच नाहीं ! तिला एक वेळ सुखरूप या

डोळ्यांनीं पहावं, मग आमच्यावर जरी आकाश कोसळलं तरी हरकत नाहीं, असं शेवटीं निकरावर येऊन मनाला वाटूं लागलं आहे.

अश्व०--शांत व्हा ! आपण उभयतां एकमेकांच्या मनाला धीर द्यायचं सोडून, उलट एकमेकांना निराशेच्या समुद्रांत बुडवीत आहोंत. तें कांहीं नाहीं. आतां असंच केलं पाहिजे. कोण आहे रे तिकडं ? ( भालदार येतो ). जा आपल्या सैन्यांतील अतीत्वरित चालणारे सांडणीस्वार असतील त्यांना शाल्व देशाकडे जाण्याची आज्ञा करण्याविषयीं सेनापती रणदुंदुभी यांना माझा निरोप सांग. तसंच असाल तसे मुक्काम हालवून, राजकन्या सावित्रीसह इकडं निघून येण्याविषयीं अमात्य चाणाक्ष यांना माझा निरोप सांग. ( भालदार जातो ). बस, पुरे झाला हा वरसंशोधनाचा सोहळा. यापुढील मार्ग कसा आक्रमण करायचा, हे आपल्या दरबारांतील पंडित, बुधजन व कुलगुरु यांच्या संमतीनं ठरवूं.

भाल०--( येऊन ) महाराज, नारदमहर्षी इकडेच येत आहेत.

मालवी--तुझी वाणी अमृतमय होवो. महाराज, महर्षींना विचारून मगच काय तें ठरवावं.

अश्व०--योग्य ! पुन्हा त्यांच्या अकल्पित आगमनामुळें परमेश्वर माझा पाठीराखा आहे असंच मला तर वाटतं.

( नारद भजन करीत येतात. )

नारद—

पद २२ वें.

**पावन नाम तुझें रघुराया ॥ध्रु०॥ चुकुनी पद पडे अग्नी-वरी जरी ॥ जाळितसे तो काया ॥ सदया० ॥ १ ॥**

अश्व०--यावं महाराज. मीं आपणाला अभिवादन करतों. या सुखा-सनावर बसावं महाराज ! (नारद बसतात, मालवी नमस्कार करते. )

नारद—कल्याण, कल्याण. राजा, सर्व कुशलक्षेम आहेना ?

अश्व०--महाराज माझ्या परम भाग्यानं, आपलं दर्शन घडल्यावर सर्व कुशलक्षेम कसं होणार नाहीं ? महाराज, आपल्या आज्ञेप्रमाणं,

माझ्या प्रियकन्या सावित्रीवरच वरसंशोधनाची जडजोखीम मीं सोंपवली, परंतु अद्यापपावेतों तिकडील शुभवर्तमान कांहींच कळलं नाहीं.

**मालवी**—मुनिवर्य, संकटग्रस्त मनुष्याच्या मनासारखा, निरंतर छळणारा, दुसरा वैरी या जगांत कोण आहे ? यांतून सोडवणारा आपणाखेरीज दुसरा कोण समर्थ आहे ?

**नारद**—राजा, राणी, शांत व्हा, परमेश्वरकृपेनं सर्व चांगलं होईल ! मीहि तुमच्यासारखाच त्या अनंत आणि अचिंत्य देवाधिदेवांचा एक नम्र दास आहे. त्या भगवंताच्या कीर्तिरूपी कामधेनूच्या दुधाकरितां रात्रंदिवस धडपड करणारा, मीही एक बुभुक्षित बालक आहें. त्या तेजोमय ज्योतीवर लुब्ध होऊन स्वात्मार्पण करणारा एक दीन पतंग आहें. या प्रफुल्लित विश्वकमलांतील माधुरीकरितां श्रीरामचंद्राचा महिमा गुणगुणत भ्रमण करणारा मीही एक भ्रमर आहें.

**भाल०**—(येऊन) महाराज, अमात्य चाणाक्ष यांनीं राजकन्या सावित्रीताईसाहेबासह इतक्यांतच राजवाड्यांत प्रवेश केला. ( चाणाक्ष, सावित्री, सारंगनयना येतात व नारदास नमस्कार करतात. )

**नारद**--सर्वत्रांचं कल्याण असो.

**मालवी**--सावित्री; कितीग श्रम झाले तुला या प्रवासाच्या दगदगीनं ! सारंगनयने, हीच का जपलीस तूं सावित्रीला ?

**सावित्री**—आई, ती प्राणापेक्षांही जास्त जपत होती हो मला.

**सारंग०**--आतां कोणी नको जपायला ! आतां हां हां म्हणता चांगलं प्रस्थ वाढेल ! होयना ग सावित्री ? आईसाहेब, हिच्या प्रेमकालिकेला थोडा मंगलाष्टकाच्या जयघोषाचा वारा लागू द्या. मग पहा वसंत देखील फुलं हंसवणार नाहीं असं हिचं मुखकमल उमलेल ! हें पहा, यांनीं काढलेलं चित्र !

**मालवी**—खरंच का सारंगनयने सगळं अगदीं ! होय का ? हा कोण ? कुठला ? काय रूप हें !

**अश्व०**—बघूं बघूं तें चित्र ! वाहवा ! या अजानुबाहु आणि तेजस्वी राजपुत्राचं नांव काय ?

चाणाक्ष—यांना सत्यवान असं म्हणतात.

नारद—राजा, द्युमत्सेनाचा हा पुत्र, सूर्याप्रमाणं तेजस्वी, इंद्राप्रमाणं वीर आणि बृहस्पतीसारखा बुद्धीमान आहे.

मालवी—आई जगदंबे, आज तूं सर्वत्रांची लाज राखलीस बाई !

अश्व०--कुलशीलवान आणि मातृपितृभक्त राजपुत्र निवडण्यांत सावित्री, तूंही आपली पारख सर्व जगाला दाखविलीस खरी. मुनिवर्य, सावित्रीनं काढलेलं हें चित्र किती सुंदर आहे पहा. जसं कांहीं आपले गुण आपल्या मुखानंच सांगत आहे कीं काय असं वाटतं !

सारंग०--महाराज, आणखी एक गोष्ट मला सुचवाविशी वाटते आपली आज्ञा असेल तर--.

मालवी--सारंगनयने, सांग सांग.

सारंग०--माझी सावित्री आपल्या भावी पतीच्या प्रेमांत किती तन्मय झाली आहे, व एकमेकांच्या हृदयाचं एकीकरण, किती परमावधीचं झालं आहे, याची साक्ष मला तर वाटतं, हें चित्र सर्वांना एकसारखं ओरडून सांगत आहे. आईसाहेब, तेजांत तेज, मेघांत मेघ, किंवा समुद्रांत सरिता देखील इतकी एकरूप होणार नाहीं.

अश्व०--सारंगनयने, तूं माझ्या सावित्रीची खरी पाठीराखी आहेस.

नारद--राजा, याचीं मातापितरं सत्यवादी आहेत, म्हणूनच याचंही नांव सत्यवान ठेवलं आहे. याच्यासारखा सर्वगुणसंपन्न राजपुत्र या भूतलावर आढळणं खचित दुर्मिळ.

चाणाक्ष--आतां दोष शोधून काढयाचा म्हटला तर राज्यभ्रष्ट आहे, इतकंच.

अश्व०--छे, नाहीं नाहीं; हा मुळींच त्याचा दोष नाहीं. असा सर्वगुणसंपन्न जामात प्रत्यक्ष मुलगाच मला मिळत असतांना, या सर्व राज्याचं कन्यादानाच्या वेळीं त्याच्या हातावर उदक सोडण्यास मला अभिमान वाटेल. आपल्या मुलालेकरांना आनंदांत पहाणं कोणत्या आईबापांना आवडणार नाहीं ! हा एवढाच क्षुल्लक दोष ना ?

सावित्री—माझ्या बाबांच्या मुखांतील ही धैर्याची वाणी, रुकाराची

अमृतवाणी ऐकून आज माझ्या आनंदवृक्षाला मनोहर पालवी व फुलं आलीं.

अश्व०—कां ? मुनिवर्य, आपण मुग्धता पत्करलीत ? मुनिवर्यांनीं कृपा करून एखादा दोष असल्यास तोही सांगावा, म्हणजे वेळींच निवारण करण्यास ठीक पडेल !

सावित्री—थांबा ! थांबा ! मुनिवर्य, केतकीला कांटे असतात, चंदनाला सर्पांचे विळखे असतात, साधूंना निंदक असतात, जगांत अशी कोणतीही गोष्ट नाहीं, कीं ज्यांत थोडा फार दोष नाहीं; निर्दोष वस्तू परमेश्वराशिवाय अन्य नाहीं.

अश्व०—मुनिवर्यांनीं आतां कोणताही संकोच न ठेवतां दोष सांगून या यातनांतून आम्हांला मुक्त करावं.

नारद—राजा, ऐक तर. सर्वगुणसंपन्न सत्यवानाला वरण्यांत सावित्रीकडून एक न कळत भयंकर चूक झाली आहे. सत्यवानाचा एकच दोष त्याच्या सर्व गुणांना पादाक्रांत करून राहिलेला आहे. त्या दोषाचं निवारण करणं क्षुद्र मानवांच्या हातीं नाहीं. आजपासून केवळ एक वर्षच त्याला या मृत्युलोकीं वास घडेल !

सावित्री—अरे देवा, हें मीं काय ऐकलं !

मालवी—सावित्री, हें तूं काय केलंस ! निर्दय दुर्दैवा, तुला करुणा ठाऊकच नाहीं कारे !

सारंग०—सखे सावित्री, शांतहो, अद्याप हातून बाण सुटून गेला नाहीं.

अश्व०—असो, आम्हां अंध पामरांना दुःखाच्या डोहांत पडण्यापूर्वींच मुनिवर्यांनीं वांचवलं. सावित्री, एक वेळ जशी तूं माझी आज्ञा मान्य केलीस तशीच आतांही पाळ ! सत्यवानाला हृदयांतून काढून टाक, आणि दुसरा कोणताही वर पसंत कर.

मालवी—विवाह म्हटला म्हणजे जन्माची गांठ, ती केवळ एकदांच मारली जाते. सावित्री, तुझ्या सर्व आयुष्याच्या, बरेवाईटपणाचा नीट विचार कर, मुनिवर्यांनीं वेळींच सावध केलं आहे.

अश्व०—सावित्री, यांत कोणताही अधर्म होत नाहीं. मुनिवर्य आपणच या वेळेस आम्हास मार्ग दाखवावा.



**सौभाग्य**.—इश्यं! आपणच का माझे गुप्त गंधर्व? (अं. २)

नारदः——राजा, अल्पायुषी वराला कन्यादान करण्याची मी तरी कशी संमति देऊं ?

सावित्रीः—मुनिवर्य, आई, बाबा, थांबा, तुम्ही कां चिंता करतां ?

पद २३ वें.

त्रिभुवन राजाधिराज। राखिल तो माझी लाज। हृदयीं न व्हा लव निराश। चिंतेचें मुळीं न काज॥ ध्रु०॥ कल्पांतीं वचन टळे। अचल जरी मेरु चळे। दाहकता सूर्य त्यजुनि। शशीपरी जरी तो निवळे॥ १॥ लाविल तो पैलपार। भवसिंधू जरी अपार। मनुज झुरे निराधार। सकलांसी जो आधार॥ २॥

तुम्ही तुमचं ऋण फेडलंत, मला माझं ऋण फेडूं द्या.

अश्व०——सावित्री, विचार कर. ही वेळ पुन्हा येणार नाहीं. एकदम जन्माचा निर्णय देऊ नकोस !

सावित्री—जें व्हायचं तें तर आतां होऊन गेलं, आतां काय त्याचं? या शरीराला जन्म व मृत्यु हीं जशीं एकदाच येतात, तसंच त्यांच दानही एकदांच असतं ! जगांत कृत्याला मोल आहे, वर्तनाला नाहीं. मृत्यु ही खचित परमावधी नाहीं, त्या पलीकडं कांहीं तरी निश्चित आहे.त्याशिवाय प्राणीमात्र त्या पलीकडं जाण्याची इच्छा कां धरील ? श्रीराम, जर एकवचनी नसतां तर त्यांत काय राम होता ? देवाधिदेव जर करुणेचा सागर नसतां तर त्या वाळवंटाकडे कोण धांव घेतां ? ज्या परमेश्वरानं आमचीं हृदयं एकरूप केलीं, ज्याच्या कृपेनें एकमेकांना वाणीचं दान केलं,तें दान परत घेणं या सावित्रीच्या स्वप्नांत देखील येणार नाहीं. इतकंच नव्हे तर हें पावित्र्याचं आणि पातिव्रत्याचं असिधाराव्रत पालन करण्याकरतां एक जन्मच काय, पण सात जन्म वैधव्याच्या अग्निकुंडांत देहाची आहुती द्यायला ही सावित्री तयार आहे.

नारद—सावित्री, धन्य हो. हे सती, तुझ्या पातिव्रत्याला आणि दृढनिश्चयाला मी वंदन करतो. तुझा सत्यवानच तुला त्रिभुवनांत सत्यवान करील, असा माझा तुला आशीर्वाद आहे. ( सर्व पायां पडतात. )



अंक दुसरा समाप्त.

# अंक ३ रा

## प्रवेश १ ला

[ स्थळ–रस्ता, बगीच्या. काळवीट, प्रणयसिंह. ]

काळ०---प्रणयसिंहा, मी केव्हांही ऐकणार नाहीं! तूं जरी या लष्करी पोषाखानं तगडबंद झाला असलास, तरी माझं आपलं असं ठाम मत आहे कीं, या लष्करी पोषाकाच्या आंत जितका मूर्खपणा, भ्याडपणा झांकला जातो, तितका दाढीमिशांच्या आयाळानं षंढपणा देखील झांकला जात नाहीं! आंगचा जातीवंत गाढवपणा दाखवायला लष्करांत जितका अवसर किंवा संधी मिळते, तितकी संधी प्रधानपदावर पाजीपणाला, मंत्रीपदावर हलकटपणाला, पुढाऱ्यांत स्वार्थसाधुपणाला आणि कुंटिणीस चवचालपणाला देखील मिळत नाहीं! फार काय सांगू सैनिकाचा प्रत्येक दिवस, म्हणजे गाढवाच्या सर्व जन्माचा इतिहास. सरानसरीनं सैनिकाचं जर शंभर वर्षांचं आयुष्य धरलं, तर दर एक सैनिक, छत्तीस हजार गाढवांचा काढा कशाय, अर्क असतो.

प्रणय०---या लष्करच्या रिकाम्या भाकरी भाजण्यापेक्षां तूं भ्याड आहेस असं कबूल करिनास?

काळ०---मी! एकटा? छट् मुळींच नाहीं, सर्व प्राणी भित्रे आहेत!

### पद २४ वें.

**भ्याड जात ही गमे नरांची। उपजत खोडी ही सकलांची ॥ ध्रु० ॥ रसिकपणाची सौजन्याची भीति कुणाला खरे-पणाची ॥ १ ॥ गुणग्राहकता, मधुवाकपटुता। कुणासी भीति गुणी जनांची ॥२॥ दया प्रेम औदार्या धाके। कुणासी भीति जगीं न्यायाची ॥ ३ ॥ शौर्य वीर्य तेजा शीलाची। धडकी घेई कुणी पौरुषाची ॥ ४ ॥ गूढमूढ जरी मिशा मुखावर। अंतरिं भीति त्या समराची ॥ ५ ॥**

संकटकाळीं सर्व सारखेच भितात! कांहीं जणांना भ्याडपणा लपवता येतो दुसऱ्यांना नाहीं. मी, दुसऱ्यापैकीं आहे! कांहींजण आपण भ्यालों घाबरलों असें मेल्यानं सुद्धां कबूल करीत नाहींत. दुसरे करतात. मी दुसऱ्यापैकीं आहे! इतकं कशाला, मी सप्रमाण सिद्ध करतो, अरे इकडं ये ( नरडं धरून दावतो तो घाबरतो ).

प्रणय०--अरे अरे अरे अरे!

काळ०--बस, झालं माझं काम! बोल घाबरलांस कीं नाहीं?

प्रणय०--मुळींच नाहीं.

काळ०--मग काय आता अरे अरे, म्हणून जी किंकाळी फोडलीस ती काय अंगांत वीरश्री संचारून रणकल्लोळांतली आरोळी ठोकलीस? पण असा अचानक घाला घातल्यावर कोणीही असेच करील.

काळ०--हे पहा, ते अचानक मला कांहीं सांगू नकोस. संकटकाळीं सर्व सारखेच भित्रे आणि भ्याड असतात. तुझ्यामधें तें धैर्य तर नाहींच, पण दोष कबूल करायचं धैर्य देखील नाहीं! तें धैर्य माझ्यांत आहे, आणि तुला, लष्करी पोशाक घातलेल्याला तें मीं दाखवतो आहे. माझ्यासारख्या सत्यवचनी शूराचं पादत्राण तूं खरं म्हणशील तर शिरस्त्राण म्हणून वागचावयाला पाहिजे!

प्रणय०--तुझ्या शूरपणाची व्याख्या तर फार बहारीची आहे. जर तुला शिपाईपेशाची इतकी चीड होती, तर, यापूर्वी तूं हा लष्करी पोशाख चढवला होतास कशाला? बांगड्या भरायच्या होत्यास.

काळ०--सेनासारंगांनीं केला हुकूम तुडीव आईबापांना! लागला तुडवायला! मार मुलालेकरांना कीं लागला मारायला, काप भाऊबंदांचे गळे कीं लागला कापायला, घे अब्रू आयाबहिणींची लागला झोंबायला, जाळ घरं शेजाऱ्यापाजाऱ्यांची कीं लागला पेटवायला, मार काळ्या कीं लागला मारायला, खा शेण कीं लागला गिळायला. रणमर्दा, चुकलों. समरांगण तर तूं अजून डोळ्यांनीं पाहीलं नाहीस तेव्हां रणमर्दा कसलं म्हणा, मंचकमर्दा, माजघरमर्दा, तो पोशाक मीं माणुसकीचा अभाव दाखवण्याकरतां धारण केलेला नव्हता. कुंभार जसा चिखल तुडवायला रेडा लावतो,

तसे सैन्य म्हणजे हाडामांसाचा चिखल तुडविणारा रेडा नाहीं, लष्कर म्हणजे मुसुंडी मारणारा डुकराचा कळप नव्हे!

प्रणय०--बस्स् कर तुझी वल्गना, तुझ्यासारखे भेकड म्हणजे सैन्याला लांछन आहे.

काळ०--गळेकापूंच्या कळपांत, माझ्यासारखा सत्यवचनी, एकवचनी, एकपत्नी, केवळ भूषण आहे! तुला लढाऊ कोंबड्याला या रत्नाची काय किंमत?

प्रणय०—या असल्या रत्नाचा दागिना करण्यांत त्या हरणीनें मोठी घोडचूक केली आहे.

काळ०--अमर्यादा करतो आहेस. स्त्री जाती बद्दल केवळ अनादर दाखवतो आहेस. तुझ्या माझ्यांत दक्षिण ध्रुव, उत्तर ध्रुवा इतकं अंतर आहे. मला जगांतील सर्व स्त्रीजात कोमल वाटते मनोरम वाटते. माझी हरणी काय सांगूं प्रणयसिंहा, त्या कल्पतरूला माझ्या संसाराची गोड फळं लागणार आहेत, आणि त्या प्रत्येक फळाचं बीज पुन्हा भूमींत रुजून, हा काळवीट सर्व जग वंशविस्तारानं भरून काढणार आहे. मीं सर्व विश्व व्यापून उरलो आहे ही भावना, स्त्रीजातीबद्दल दया, आदर, प्रेम, असल्याशिवाय उत्पनच होत नाहीं!

प्रणय०--तुझ्यासारखे एकपत्नी एकवचनी सैनिक असले म्हणजे आटोपलाच लष्करचा कारभार! मला तुझ्याशीं वितंडवाद घ्यायला वेळ नाहीं. आपण जर इथंच रेंगाळत राहिलो तर रणदुंदुभी महाराज आपला वंशविस्तार आटपून टाकतील! चल तर! (जातात.)

---

## प्रवेश २ रा.

(स्थळ—जंगल. सारंगनयना व व्याध.)

व्याध—छे छे, असं कसं होईल? अग, मला पण तें खरं वाटलं पाहिजे ना? सत्यवान झाला, सारंगनयना झाली, ही म्हटली म्हणजे पृथ्वी-

च्या पोटीं जन्म घेतलेली नक्षत्रं, आणि ध्रुव झाला, अरुंधती झाली ही म्हटली म्हणजे आकाशांत जन्म घेतलेलीं नक्षत्रं.

सारंग०--खरंच व्याधा. पण, आकाशांतल्या नक्षत्रांत तुला व्याध नाहीं का दिसलां ? खरंच तो आकाशांतला व्याध मात्र रात्रंदिवस धनुष्य-बाण सज्ज करून निर्दय काळासारखा जीव घेणारा क्रूर दिसतो; पण हा आमचा मृत्युलोकीचा व्याध, जीवांच्या दुःखानं आणि करुणेनं विरघळून जाऊन, त्यांच्या जीवाकरतां आपल्या स्वतःच्या जीवाचं दान करयला सज्ज असतो, खरंच व्याधा, आकाशांतल्या नक्षत्रांपेक्षां मृत्युलोकाच्याच रत्नांचं तेज जास्त असतं.

पद २५ वें.

तळपती व्योमीं या तारा। अरुणोदयीं परी लपविती मुखास ॥ ध्रु० ॥ भूलोकीच्या या नरतारा। अखंड तळपती, देवोनि प्रकाश ॥ १ ॥ उद्धरती जग सद्गुण तेजें। दुर्गुण तिमिरा, करोनी विनाश ॥ २ ॥

व्याध--सारंगनयने, मला कशाला गरीबाला येवढा थोरपणा ! मी एक गरीब रानंवनं तुडविणारा अडाणी माणूस.

सारंग०--छे छे, कस्तुरी मृग देखील बिचारे रानंवनं तुडविणारे रान-वटच असतात; परंतु त्यांच्या कस्तुरीचा सुगंध प्रत्यक्ष परमेश्वर आपल्या वक्षस्थलावर विलेपन करतो, मग इतरांची काय कथा ? खरंच व्याधा, मी आज बरेच दिवस तुला विचारीन विचारीन म्हणत होते, आतां बरी आठवण झाली. तूं अनेक रानंवनं धुंडाळलीस, अनेक वनस्पतींची तुला माहिती आहे. महाराजांना रात्र आणि दिवस यांतील भेद तुझ्या औषधानं समजू लागला. काय सांगावं देवानं तुझ्या हाताला यश दिलं तर कदाचित त्यांना दृष्टीही येईल. खरंच, तुला अनेक रोगांवर अनेक दिव्य औषधी टाऊक आहेत, असं या आश्रमांतील प्रत्येक माणसाच्या मुखीं आहे; इतकंच नव्हे, तर शेकडों व्याधिग्रस्तांना तूं त्यांच्या यातनेंतून मुक्त करून जन्माचं ऋणी करून ठेवलं आहेस. मी तुला एक विचारतें सांगतोस का ?

व्याध—सारंगनयने, मला अनेक दिव्य औषधी, अनेक दुर्धर रोगां-वर ठाऊक आहेत, हें खरं! पण गुण मात्र माझा कैलासनाथच देत असतो, तो भोळा किरात मला उगीच निमित्तमात्र करतो, सारंगनयने बोल, तुला काय? कुणाला? आणि कोणत्या रोगावर वनस्पति पाहिजे? वेड, फेफरं, राजयक्ष्मा—

सारंग०—नाहीं, यांपैकीं कोणताही रोग नाहीं. देवा, हे रोग शत्रुला देखील होऊं नयेत! व्याधा, मी सांगतें तो रोग आणि रोग्याचं नांव जर तूं ऐकलंस, तर तुझं देखील काळीज फाटून जाईल!

व्याध—म्हणजे तूं काय म्हणतेस हें? या तुझ्या बोलण्यानं मी कसा अगदीं गोंधळून गेलों आहे! काय होतं आहे? कुणाला होतं आहे? कां, तूं अशी खिन्न कां? सारंगनयने, एकदम असा रडवा चहेरा करून एकदम डोळ्यांत पाणी कां आणलंस? सांग, मला चटकन सांग, जर तुझं कार्य होत असेल तर जगांतील कोणचेही कष्ट मी आनंदानं सोशिन, माझ्या प्रयत्नानं इकडचा डोंगर तिकडे उचलून ठेवीन, तुझ्या ममतेच्या माणसा-चा प्राण वांचत असेल तर या माझ्या शरीलाला तुंबडी लावून, या व्याधा-च्या रक्ताचा थेंब नी थेंब देतो, मग तर झालं ना!

सारंग०—व्याधा, कायरे तुला सांगू? पण तुला रोगाचं आणि रोग्याचं नांव सांगण्यापूर्वी, त्या दोहोंचं नांव, केवळ कैलासनाथाशिवाय दुसऱ्या कोणालाही सांगणार नाहीं, असं मला वचन पाहिजे, तरच तुला सांगतें. तुझी कैलासनाथावर पराकाष्ठेची श्रद्धा आहे, आणि श्रद्धावान्, मनुष्या-लाच परमेश्वर निबिड अंधकारांतून दृष्टि देतो. आणि म्हणूनच तुझं मला प्रथम वचन पाहिजे, नाहीं तर माझं भयंकर दुःख माझं मीच गिळून टाकतें.

व्याध—(स्वगत) ही काय सांगणार आहे? कांहीं विपरीत तर न सेलना? काय बोलणार आहे! कांहीं नीतिभ्रष्टतेचं तर नसेल ना?. अहाहा! ही कैलासनाथाचं वचन मागत आहे! वचन दिल्यावर मग काय राहिलं? केवढा भयंकर संशयाचा डोह या हृदयांत खवळूं लागला. संशय! संशय!! संशया, चल निघ येथून. कैलासनाथा तुझ्यामध्यें आणि प्राणीमात्रामध्यें ताटातूट करणारा, जर हा संशय नसता, तर या जगांवर

मृत्यूचं तोंड केव्हांच काळं झालं असतं. (उघड) सारंगनयने, तुझ्या हृदय-खाणींत घातपात, सूड, द्वेष, मत्सर, या दुर्गुणांचे कोळसे नसून, प्रेम, दया, आनंद, उपकार, या अमोलिक रत्नांची संपत्ति आहे हें मला ठाऊक आहे, आणि म्हणूनच केवळ माझ्या प्राणापेक्षां प्रिय कैलासनाथाची शपथ घेऊन तुला वचन देतों कीं, रोगाचं आणि रोग्याचं नांव, हा व्याध कोणालाही कळविणार नाहीं, बोल, चटकन् सांग !

सारंग०—व्याधा, ऐक तर, तुझ्या रोग्याचं नांव "सत्यवान्" आणि दुर्धर रोगाचं नांव "अपमृत्यु" आणखी एक—

(कानांत सांगते.)

व्याध—काय ! प्रत्यक्ष नारदांनीं रोगाचं निदान केलं म्हणतेस ? अरे अरे, आईच्या मांडीवर स्तनपान करीत असतांना, बालकांनं दुधाची चूळ, आईच्या तोंडावर हंसत हंसत टाकून तिला क्षणैक स्वर्गसुख द्यावं, तोंच आकाशांतून, कडाडून वीज तुटून त्या उभयतांवर पडावी किंवा माझ्यासारख्या अधमानं, आपल्या पिलांच्या चोचींत अन्न घालीत असतांना, त्यांच्या आईला, त्या कपोतीला घायाळ करावी असंच हे झालं नाहीं कां ! काय सांगावं ? कैलासनाथा, केवढं भयंकर हें क्रौर्य !

## पद २६ वें.

**वद काय गरीबांचा । कारुण्य उमाळा । कां सांग निमाला ॥ ध्रु० ॥ जगतात दुजे वद स्थान कुठें ?। मग दुःख वदाया । रे शरण रिघाया । वदताती तुला भोळा । मग केवी रुचे हा । संहार मनाला ॥ १ ॥**

होय, पण त्या कपोतीचा अपमृत्यु, एका लहानशा मुगीनं टाळला नाहीं का ? काय सांगावं सारंगयने, तो नाटकी भोलानाथ कोणाला निमित्य करून, काय घडवून आणील तें ? कायगं हा रोग सावित्रीला लग्नापूर्वी ठाऊक होता म्हणतेस ?

सारंग०—व्याधा, सर्व खरं, पण तूंच सांग. वचन आणि दान, जो सज्जन आहे, तो कधीं तरी माघार घेईल का ?

व्याध—वाहवा वाहवा ! सावित्री. तूं त्रिभुवनांत धन्य आहेस ! खरंच

वचनाची आणि दानाची किंमत, प्राणापेक्षांही जास्त आहे, हें ईश्वरी कृपेंतील माणसांशिवाय कोणालाही कळणार नाहीं. बरं पण तुला हें केव्हां समजलं ?

सारंग०—सावित्रीला आणि मला एकदमच समजलं !

व्याध—आणि, आज जवळजवळ एक वर्ष पुरं होत आलं, तूं मला सांगितलं नाहींस ? बायकांच्या पोटांत गुप्त रहात नाहीं असं म्हणणाराच्या डोळ्यांत तूं चांगलंच अंजन घातलंस ! ठीक आहे, सारंगनयने, तूं सांगितलंस त्या दिवसापर्यंत, ह्या व्याधाच्या डोळ्याची पापणीही लवणार नाहीं, अष्टौप्रहर हा डोळा सत्यवानावर पहारा करील, माझा कैलासनाथ वचनाचा धड आहे, दानाचा तर तो उचंबळणारा समुद्र आहे, आणि प्राणाचा तर तो नियंता आहे, त्याच्या वचनाच्या आणि दानाच्या पावलांवर पाऊल टाकून चालणारी ही सत्यवान् आणि सावित्री यांच्यावर आपल्या कृपेचं पांघरुण घालून, त्या अपमृत्यूला तो फसवल्याखेरीज कधींही रहाणार नाहीं ! रात्रंदिवस त्याच्यावर नजर ठेवून वेळ दिसतांच, ही कैलासनाथाची वारुळांत रहाणारी तैलमुंगी त्या अपमृत्यूच्या पायाला कडकडून चावून त्याच्या बाणाचा नेम चुकवल्याखेरीज रहाणार नाहीं, मीं पुढं जातो, त्या दोघांना केव्हां पाहीन असं मला झालं आहे, तसंच महाराजांच्या डोळ्यांतही औषध घालण्याची वेळ झाली. (जातो.)

सारंग०—काय देवाची करणी विचित्र आहे पहा ! दुर्जनांची आणि हलकटांचीं मनं खोल खोल जाण्यांत स्पर्धा करतात, तर सज्जनांचीं मनं उंच उंच उडण्यांतच स्पर्धा करतात. चला बाई, तिकडं सावित्री वाट पहात असेल. ( जाते. )

---

## प्रवेश ३ रा.

[ स्थळः–माजघर–व्यासपीठ–वळकटी. काळवीट व प्रणयसिंह येतात. ]

काळ०—अरे, अरे, अरे, सारख्या लाथा काय मारतां ? आज चार दिवस सारखं मला अंधारकोठडींत कोंडून घातलं आहे आणि उजेडांत

आणल्याबरोबर लाथांचा खुराक चालू केला आहेत. बरं त्या मारण्यांत तरी कांहीं सावकाशपणा, रणांतून शिस्तीनं पळतांना सुद्धां, माझ्या टांचा इतक्या जलद माझ्या मागं लागल्या नसतील ! माणसं आहांत कीं जनावरं आहांत ?

प्रणय०—खबरदार, एक शब्द तोंटावाटे बोललास तर ? सेनासारंगाच्या हुकूम आम्ही बजावीत आहोंत, त्यांनीं आम्हांला तुला केवळ इथं आणून सोडण्याचा हुकूम केला असून दारांत नागव्या तलवारीनं पहारा करण्यास सांगितलं. तसंच तूं दाराबाहेर पडतांच एक घांव दोन तुकडे करण्यास सांगितलं आहे. म्हणून म्हणतों, डोक्याची जरूर असल्यास गुपचुप बैस.

काळ०—बरं बाबांनो, जा तुम्ही, बसतों गुपचुप (प्रणयसिंहास जातांना) "हतगच्छ" "पलायन" (जातात) सैन्य म्हणजे नुसतं यंत्र करून टाकलं आहे महाराजांनीं ! शेवटची आज्ञा कानावर पडतांच संवयीनं एकदम चारी खुरावर उसळले. खरंच त्यांनीं पलायन केलं असल्यास तो मार्कंडेय येण्याच्या आंत आपणही पलायन करावं (पाहून) अरे बापरे, नागव्या तलवारी घेऊन मृत्यूचे जयविजय दारांतच उभे आहेत, झालं. ऐन तारुण्याच्या पंचविशींतच सांवत्सरिक उत्सवाची पाळी येणारस दिसतं, अरे हतभाग्या काळविटा आपल्या प्रियकर हरणीबरोबर, जाईजुई, चमेली, दवणा, शेवंती, यांच्या लताकुंजांत दंग व्हायचं सोडून, या सौभाग्यकांक्षिणीच्या निवडुंगाच्या कुंपणांत तुझ्या अकलेचीं शिंग अडकून तुझ्यावर गतःप्राण व्हायची पाळी यावी ना ?

(हरणी व श्रृंखला येतात.)

हरणी—खोटे कुठले, आतां कशाला दैवाला दोष देतां ? चांगलं पत्रलेखन करून तुम्हीच हा अमृतसिद्धीचा योग जुळवून आणला आहे. काय हो, माझ्यावरचं प्रेम कसं एकदम नाहींसं झालं ? माझा विश्वासघात करून तिच्याशीं लग्न लावणार का ?

श्रृंखला—हरणाताई, हे पुरुष असेच मेले कार्यसाधु असतात हो, पहा कसा भोंदूसारखा चेहेरा केला आहे तो !

काळ०—अग, मी भोंदू नाहीं, कार्यसाधू नाहीं, पण जबरदस्तीनं या

साधूच्या गळ्यांत हें कार्य तुझा काका बांधतो आहे, आणि हें कार्य जर मीं केलं नाहीं तर इथंच माझं क्रियाकर्मांतर होण्याचा रंग दिसतो आहे, आतां सांग मीं काय करूं ?

श्रृंखला—तें कांहीं नाहीं. सौभाग्यकांक्षिणीशीं मंगलकार्य करून तिचं धन लुबाडण्याचा तुमचा पूर्वीचाच डाव होता.

काळ०—हें काय बरं, माझ्यावर विनाकारण आरोप लादतां ! हरणे, तुझ्याशीं मंगलकार्य करायला मीं कसा पांखरासारखा तरफडतो आहे ग, पण या घुशीच्या सांपळ्यांतून सुटेन तेव्हां ना ! हें पहा, या काळविटाच्या डोक्यांतली अक्कल कशी अगदीं गुंग झाली आहे !

श्रृंखला—अहो पण मंगलकार्याला तुमच्या डोक्याची मुळींच जरूर नाहीं, पण मीं म्हणतें तुम्ही सेनासारंगांशीं द्वंदयुद्ध करानात, मग म्हणेन तुमचं हरणाताईवर खरं खरं प्रेम आहे ! नुसतं प्रेम करतां, नीं धाडस नाहीं प्रेमी पुरुषांत ! मग कसलं प्रेम.

काळ०—सर्व खरं, पण त्या यमाशीं झुंझ घेऊन गतःप्राण झाल्यावर हरणे, मीं आणि प्रेम कशानं करूं ! शिल्लक काय रहाणार ! नुसत्या हाडांचा खुळखुळा ! तें कांहीं नाहीं. हरणे, तुझ्या हृदयांत यत्किंचित ओलावा असला, माझ्यावरील पूर्वीच्या प्रेमाचा जर कांहीं अंश वास करीत असला तर, प्रेमले या दासाला कुठं तरी ताबडतोब लपीव गं—

### पद २७ वें.

काळ०—नच करी उपेक्षा लपीव कुठें तरी कुरंगनयने हरणे ॥
मायेच्या तव पदरीं झांकी हा दास तुझा मनमोहने ॥ ध्रु० ॥
हरणी—फसाविलींत देवोनि वचनें,नच रुचे हें मायावी वदणें ॥
श्रृंखला—ज्याचें त्यांनींच स्वहित बघणें । संकटांत पडतां
असेच करिती कपटपटू नर बहाणें ॥
हरणी—गयावया मग असेंच करिती, मुखांसी केविलवाणें ॥
माणुसकी परी नसे अशांना पुन्हां स्त्रियांनीं फसणें ॥
काळ०—नवनीता परी हृदय स्त्रियांचें,जगांत वदती शहाणें ॥
इथें लपीव वा तिथं लपीव हें नसेच माझें म्हणणें ॥ १

हरणी—पण बाई कुठं लपवूं मीं ! शृंखले कुठं गं बाई तरी लपवायचं यांना !–

काळ०—हरणे, लपीव, लपीव, अमक्याच ठिकाणीं लपवण्याचा माझा मुळींच आग्रह नाहीं, जें स्थळ तुला अडगळीचं वाटत असेल, त्या अडगळींत लपीव, या तुझ्या वाड्यांत कोठीचा माळा, बळदं, भुयार, कांहीं नाहींत कां ! कांहीं धान्याचीं पेवं वगैरे नाहींत का ! अग नाहींतर तुझ्या हंथरुणांत लपीव ! तुझा काका, तुझं हंथरुण पहायला कशाला येतो आहे !

हरणी—छे हो, त्यांची चोहोंकडे सारखी टेहळणी असते, शृंखले, तूं तरी सांग बाई, कांहीं तरी उपाय ! कसं ग करायचं तरी–

(रणदुंदुभी आंत ओरडतो).

शृंखला—अग बाई ! ते पहा रणदुंदुभी आणि कांक्षिणी येत आहेत. हरणाताई चला, चला, पळा, अहो धीर धरा, घाबरूं नका, शांत व्हा.

काळ०—आलीच आतां शांत व्हायची वेळ (पाहून) ही पहा आलीच, चैतन्यं संजीवनी !

रण०—(आंतून) अक्का, तूं हो पुढं, मी भूर्जपत्रं व खिळे घेऊन आलोंच तुझ्या मागोमाग.

कांक्षिणी—(येऊन) भृंगराजा, कशाला बरं तुम्ही उगीच दादाशीं हटवादांत पडतां !

काळ०—भवताप विनाशने, कुवलनयने, कोण गाढवाचा लेक हटवाद घेऊन बसला आहे ! आमच्या इतिहासाचा ग्रंथ या प्रवेशांतच आटपणारसा दिसतो ! मग प्रौढे ! नाहीं कां, माझ्या गळ्याभोंवतींचा तुझा पाश काढीत ?

कांक्षिणी—भृंगराजा, या करपाशांनी तुला बंधन करायचा मला हक्कच आहे.

काळ०—अग पण मंगलकार्य तरी व्हायला पाहिजेना ! (रणदुंदुभी आंत ओरडतो) अरे बापरे ! हा पहा यम आलाच कार्य उरकून टाकायला.

कांक्षिणी—असं गलित धैर्य होऊं नका गडे, भृंगराजा, धैर्य धरा, शेवट गोडच होईल गडे ! ऐकलंत ना !

रण०--(येऊन) अक्का, तूं कशाला त्या हरामखोराची समजूत पटविण्याचे श्रम घेतेस! काय रे दगलबाजा, काय तुझा विचार आहे?

काळ०--काय तुमचा सर्वांचा ठरेल तोच माझा विचार! तुम्ही ज्या मार्गानं ढकलाल, त्या मार्गानं जाणं मला भाग आहे.

रण०--ठीक आहे, बैस तर खालीं! मला अक्काकरितां तुझ्यासारखा रडतराव स्वार नको आहे. चल घे हीं भूर्जपत्रं! हा खिळा घे, आणि मीं सांगतों तसं त्याच्यावर लिहून दे. बैस चटकन्. धरतोस खिळा कीं नाहीं! वेड्या, अशा मंगलकार्याच्या वेळेला नवीन तरुणांचं सर्वांग कसं रोमांचित होऊन, सर्व इंद्रियं कशीं स्फुरण पावायला पाहिजेत! डोळ्यांतून जशा कांहीं ठिणग्या पडताहेत. अशी डोळ्याच्या नजरेंत चमक मारली पाहिजे. नाहीं तर तूं, वालीसुग्रीवासारखा चेहरा करून बसला आहे. हं चल लिही, सेनासारंग, रणदुंदुभी यांची भगिनी सौभाग्यकांक्षिणी हिच्याशी विवाह करूं इच्छिणारा (तो थांबतो) कां रे थांबला कां?

काळ०--हाताला वांब आला (रणदुंदुभी त्याचा हात जमिनीवर आपटतो.)

रण०--हं थांब, रक्ताभिसरण थांबले म्हणजे असा वांब किंवा पेटकं येतात. हं चल आटप, लिही पुढं, लिहतोस कां नाहीं? कां उडवूं आकाशांत!

काळ०--हे पहा, आतां प्राण गेला तरी हरकत नाहीं, मी तुम्हांला निदानींचं अखेरचं सांगतों कीं मी प्रणयभृंग नाहीं, नाहीं लिहीत एक अक्षर सुद्धां! नाहीं लिहीत, काय वाटेल ते होवो. मीं प्रणयभृंग नाहीं, मीं हिला पात्रिकालेखन केलं नाहीं.

कांक्षिणी—असं काय बरं? दादा हेच रे ते प्रणयभृंग! असं काय गडे, होय म्हणानांत? म्हणा गडे होय.

काळ०—नाहीं-नाहीं-

रण०—तें कांहीं नाहीं, तूं कोणीही ऐस, तूंच प्रणयभृंग. बोल या माझ्या आकाशीं मंगलकार्याला सिद्ध होतोस कीं नाहीं?

काळ०—या तुमच्या मातोश्रीबरोबर मंगलकार्याला सिद्ध होणार नाहीं. साफ सांगतों मीं प्रणयभृंग नाहीं. (कांक्षिणीला) हे मातोश्री, हे वृद्ध कुमारिके! तुझ्या या शरणागत अर्भकावर कृपा कर (स्वगत) कसला आहे

कपाळाचा मदन. दर्शन घडताच पौरुषाचा अभाव होतो (उघड) मातोश्री क्षमा कर.

कांक्षिणी—दादा, दादा, मला धर. माझ्या डोळ्यासमोर अंधेरी येऊन घेरी येत आहे!

रण०—हां,हां, अक्का हें काय, हें काय ? थांब प्रथम हिला पलिकडे नेऊन मग चांडाळा तुझा समाचार घेतो, अक्का सावध हो. सावध हो!

काळ०—(गेलेले पाहून) या वेळेस मातोश्रींना घेरी आली नसती तर मामासाहेबांनीं आमचा कंठनाळच चिरला असता. पण पुढं काय ?

हरिणी०—(एकदम येऊन मिठी मारुन) अरे देवा, उगीचगं बाई मी तुमच्याबद्दल संशय घेतला, किती तरी गडे माझ्यावर तुमचं प्रेम हें!

पद २८ वें.

**प्रेम किती माझेवरी अनीवार। चुकुनी छळिले तुम्हांसी मीं फार॥ध्रु०॥ पदरीं घ्यावी या दासीला। अपराध केले फार॥१॥**

**काळ०—जे झाले ते होउनि गेले। आतां काय पुढील विचार॥ लपविशी जरि ना या दासाला। क्षणांत होईन ठार॥२॥**

हरणे, ते सगळं खरं, पण आतां पुढं काय ? आहे कां कांहीं ? कां इथंच तुझ्या डोळ्यादेखत पिंडदान होणार माझं ?

हरणी—नका गडे असं अभद्र बोलूं. शृंखले बघ बघ ग, काका तिकडं काय करताहेत तें. बघ बाई तिकड काका काय करताहेत तें! बघ बाई कुठून तरी पळून जायला वाट आहे का ?

शृंखला—काकासाहेब तिकडे तिच्या तोंडावर पाणी शिंपडून वारा घालताहेत. कसं बाई करायचं तरी ?

काळ०—माझे प्राण वाचीव ग. अग तुम्ही येवढ्या थोरल्या दोन धूर्त चतुर कुमारिका इथं असून, माझ्यासारख्या एका लहानशा कुमाराला तुम्हांला लपवायलं जागा सांपडूं नये ना ?

हरणी--( रणदुंदुभी ओरडतो ) अगबाई माझे, शृंखले, ते पहा काका तलवार उपसून धांवतच येताहेत ! आतां कुठं लपवूं ?

शृंखला--चला चला लवकर, आतांपुरतं निदान या वळकटींत तुम्हांला गुंडाळून ठेवतें, आणि कोपऱ्यांत वळकटी ठेवतें, मग पुढचं पुढं पाहूं. ( दोघीं त्याला वळकटींत लपवतात. )

हरणी--( वळकटी गुंडाळतांना ) काय करायचं बुडत्याला काडीचा आधार !

काळ०--अग मला एकट्याला वळकटींत भीति वाटते, सोबतीला कोणी येत नाहीं का ?

शृंखला--आतां येतील काकासाहेब, तुमच्या सोबतीला, हं चला हरणाबाई, हं चला, चला हे पहा काकासाहेब आलेच.

( दोघी जातात रणदुंदुभी येतो. )

रण०--( रागानं ) हरामखोर, दगलबाज, विश्वासघातक्या, तूं काय समजला आहेस ? ( इकडे तिकडे पाहून ) अरे हा सर्प कोणच्या बिळांत शिरला ? माझ्या डोळ्याला भ्रम तर झाला नाहीं, म्हणजे एकदम वायुरूप झाला कीं काय ? ह्या कोठडींतही नाहीं. ( दुसरीकडे ) कोण आहे तो हरामखोर ? अरे इथेही नाहीं, म्हणजे काय ? शृंखले, हरणे सर्व वाड्याला आग लाऊन देतों, पळून जातो म्हणजे काय ? कायग ? कुठं होत्यांत तुम्ही,काय करीत होतात ?

हरणी--काका मी तिकडे सैंपाकघरांत ताक घुसळीत होतें, कां बाई रागावलांत तुम्ही ? काका, काय पाहिजे तुम्हांला ?

रण०--ताक घुसळीत होतीस, आणि तूंग काय करीत होतीस ?

शृंखला--( घाबरून ) लोणी काढीत होते ! नाहीं--नाहीं--पोहे कांडीत होतें. हरणाताईनीं ताकाचं नांव घेतलं म्हणून चुकून लोणी आलं झालं तोंडांत.

रण०--हरामखोर, दगलबाज, मग हा लांडगा कुठं लपला ? कुठं पळाला ? कुठं गेला ? कुठं आहे तो भृंग ?

हरणी--कोण भृंग ? कुठं पळाला ? कुठला लांडगा ? केव्हां घरांत शिरला ? कोण पाहिजे काका तुम्हांला ?

रण०--तुम्ही सर्व कांगावखोर लोक दिसतां ! मी त्या चांडाळाला आतां हुडकून काढतों ( घोडी, व्यासपीठ, खुर्च्या उलट्या पालट्या करतो व शेवटीं वळकटी ओढतो व लाथ मारून उलगडतो, काळवीट लोळण घेऊन लांब जाऊन उभा रहातो, रणदुंदुभी त्याच्यावर तलवार घेऊन धावतो. ) अरे भुजंगा, आतां एक घाव दोन तुकडे करून टाकतों, काय समजला आहेस तूं. ( तलवार उगारतो. हरणी येऊन पाय धरते. )

हरणी—काका, काका, थांबा, या तुमच्या मुलीकरितां यांना प्राणदान द्या. काका, येवढी मला, तुमच्या मुलीला भीक घाला !

काळ०—सेनासारंग, मी तुम्हाला शरण आहें, अहो, देवाची शपथ मी काळवीट आहे, प्रणयभृंग नाहीं, मी या कोमल हरणीचा काळवीट.

हरणी--माझ्याकरितां हे इकडे येत असत ! तुमच्या रागामुळं आणि भीतीमुळंच, हे घाबरून खोटं बोलले काका ? या तुमच्या मुलीला एवढं सौभाग्यदान द्या, ही पहा मीं तुमच्या पाया पडतें. ( रणदुंदुभीच्या पायावर डोकें ठेवते. )

रण०—अरे, अरे, बेटा उठ, उठ, तुला अभय आहे ! काळविटा, तुला हिच्याकरतां अभय आहे, पण या अक्काचं पुढं कसं काय ? तिचा भृंग कोण ?

काळ०—पुनर्जन्म झाला म्हणायचा यमाच्या कचाट्यांतून !

रण०—कायरे काळविटा, चोरट्या प्रेमाची तुला कां अवदसा आठवली ? उघड कां नाहीं मागणी केलीस ?

काळ०—उघड मागणी घालणार होतों पण तुम्ही तलवार उपसतांच धास्तीनं जीभ घशांत गेली ! मला नुसतं हूंका चूं करवेना ! मग मागणी कसली करणार ?

रण०--तें सगळं खरं, पण आमच्या अक्काचं पुढें कसं काय ? तिचा प्रणयभृंग कोण ?

कांक्षिणी—( आंतून ) दादा सांपडलेरे सांपडले. ( येऊन ) दादा माझा कीं नाहीं, या प्रणयभृंगांच्या टोपणनांवानं समजुतीचा घोंटाळा झाला होता, हे बघ ( काळविटाकडे बोट दाखवून ) हे प्रणयभृंग नव्हत ! तुझ्या धास्तीनं, आपल्या सैन्यांतले ते सांडणीसारंग, प्रणयसिंह—हे, प्रणय-

भृंग या टोपणनांवानं पत्रिकालेखन करीत असत. आतां इतक्यांत त्यांच्याशीं मीं आणाशपथा घेऊन तुझ्याकडून त्यांना अभय देण्याचं त्यांना वचन दिलं, तेव्हां ते तुझ्यासमोर येतों म्हणाले. दादा ते बघ ते इकडेच येत आहेत! अगबाई दादा, ते तुला पाहून घाबरून पुन्हां थाबले वाटतं. दादा, त्यांना हाक मारून अभय दे गडे.

काळ०––हो करतां काय ! यमराज पहाताच तसाच तिकडून तो पळ काढायचा !

रण०––वाहवा ! आज माझ्या आनंदाला पारावार नाहीं. हरकत नाहीं, एकदांचं जमवलंस चातुर्यानं ! या, या, धैर्यसागर प्रणयसिंह, तुम्हांला अभय आहे. ( प्रणयसिंह येतो ) तुम्हीं आज आमची बाजू राखलींत, या मेव्हणे प्रणयसिंह, या जामात काळवीट, चिरंजीव काळवीट, मी तुम्हाला आशीर्वाद देतो ( सर्व रणदुंदुभीच्या पायां पडतात. )

काळ०––या दासाला क्षमा असावी.

रण०––कांहीं नाहीं, यावेळेस जसं कांहीं माझ्या घरांत स्वर्ग उतरल्यासारखं मला वाटतं ! म्हणून म्हणतों देवदेवतांनो उठा, हा पहा मीं तुमच्या आनंदाचा संगम घडवून आणतों ( हातांत हात देतो ) जा, आनंद करा, खेळा बागडा, सोमरस प्या, वाटेल तसा दंगा करा.

कांक्षिणी––किती बाई माझ्या दादाचा गोड स्वभाव हो !

काळ०––यमाजीभास्कर काय भोळा मनमोकळा आहे ! हरकत नाहीं कसं का होईना !

शृंखला––देवा, या हरणीला काळवीट भेटला, कांक्षिणीला प्रणयसिंह भेटला, पण देवा या शृंखलेची काय वाट ?

प्रणय०––सेनासारंग, मतंगज, महाराजांची आज्ञा निवेदन करण्याकरतां आले आहेत.

रण०:––या सरदार मतंगज, या आनंदी आनंदांत तुम्ही देखील समाविष्ट व्हा, तुमची राजाज्ञा ऐकण्यापूर्वी, या मतंगजाच्या गळ्यांत मला ही शृंखला बांधू दे. चल ये शृंखले ! आज्ञा मानलीच पाहिजे. मतंगज, ही माझी मुलगी समजून मी तुम्हाला अर्पण करतो; शतायुषी व्हा !




रण.—देवदेवतांनो! उठा! सोमरस पिऊन दंगा करा!

(अंक ३)

मतंगज—आज कोणच्या कपिला षष्ठीच्या योगावर बाहेर पडलों देव जाणे !

काळ०—वाहवा, शृंखलाबाई, तुमची नौबत झडली म्हणायची ! दोस्त मतंगज, नमस्कार, घेतलीत शृंखलेची अंबारी पाठीवर? ठीक !

रण०—सरदार, बोला आतां तुमची राजाज्ञा !

मतंगज—राजकन्या सावित्रीच्या लग्नाला एक वर्ष पूर्ण होण्याला केवळ आठ दिवसांचा अवधि राहिला आहे, तरी जसे असाल तशा स्थितींतच आज्ञा ऐकतांच सहकुटुंब सहपरिवार सावित्रीकडील तपोवनांत जाऊन शिबिरं उभारून तेथें तळ देण्याविषयीं आज्ञा केली आहे, खास सरकार स्वारी उदईक निघणार आहे.

रण०—ठीक आहे. सहकुटुंब सहपरिवार ही राजाज्ञा शिरसामान्य आहे ! (सर्व माना लववितात) चला, परिवारानं ऐकलीच आहे ही राजाज्ञा. ठीक आहे ! सावधान ! द्वित्तभव ! ! ( जोडपीं होतात ) इतगच्छ ! सव्य-वाम ! सव्यवाम ! ( सर्व जातात. ) ठीक ! सर्व विश्व जसं सुव्यवस्थित यंत्रमय आहे, त्याप्रमाणें प्रत्येक घर देखील सहकुटुंब सहपरिवार यंत्रमयच झालं पाहिजे ! अरे, परिवार बराच लांब गेला. चला तर आपणही जाऊं या. "इतगच्छ ! सव्यवाम ! सव्यवाम !" ( जातो. )

## प्रवेश ४ था.

[ स्थळः-जंगल रस्ता. द्युमत्सेन, शैब्या. ]

द्युमत्सेन—दुसऱ्यांनीं आपलं राज्य हरण केलं, नाना प्रकारच्या मान-खंडण्या झाल्या, या तपोवनांत कष्ट सहन कल, या सर्व दुःखाचं, सावित्रीनं आपल्या आश्रमांत पाऊल ठेवतांच रिद्धीसिद्धीच्या रूपांत त्यांचं रूपांतर झालं कीं काय न कळे, आपलं अनंत जन्मीचं पुण्य म्हणूनच केवळ सीतेसारखी सून मिळाली.

**शैब्या**—तिचा मनमोकळा आणि भोळा स्वभाव यांनीं मला तर जशी कांहीं मोहिनी घातल्यासारखं झालं आहे. बिचारीचा जगांमध्यें कसं वागावं, हे शिकवण्याकरतांच देवानं नमुना घडवला आहे कीं काय न कळे ?

**द्युमत्सेन**—येवढी थोर राजकन्या, पण जसा काय बिचारीचा आमच्यापेक्षांही गरीबींत जन्म गेला ! गरीबांच्या संसारांतली काटकसर कशी करावी, हें जसं कांहीं तिला बाळकडूच मिळालं आहे. अशा देवतेसारख्या सद्गुणी मुलीच्याही कपाळी, देवा तूं वनवासच लिहिलास ना ?

**शैब्या**—काय करणार आपण ? आपणू होऊन तिनंच वनवास पतकरलान्. सज्जनांचे मित्रही सज्जनच हें कांहीं खोटें नाहीं. तिची मैत्रीण ती सारंगनयना, किती आनंदी, ममताळू आणि सद्वर्तनी आहे बिचारी. माझ्यापेक्षांही तिचं प्रेम सावित्रीवर आहे, दोन वहिणीसुद्धां इतकं प्रेम करणार नाहींत हो !

**द्युमत्सेन**—जातिवंतपणा ही ईश्वरी देणगीच असते ! हा आपला व्याधच पहानात ? सर्व जन्म रानांवनांत ! हिंसा, वध, क्रौर्य म्हणजे ज्याच्या पूर्वी हातचा मळ होता, पण संगतीनं त्याच्या हृदयांतील तवंग नाहींसा होतांच त्याच्या हृदयांत माणुसकीच्या गुणांचा कसा निर्मळ झरा वाहतो तो पाहिलास ना ? बिचारा माझी दृष्टि आणण्याकरितां नानाप्रकारच्या औषधी शोधण्यांत आपली दृष्टि देखील गमवायला तयार झाला, त्याच्या औषधीपासून मला आतांशा दिवस आणि रात्र यांमधील भेद कळूं लागला!

**शैब्या**—ही माझी सून, हा व्याध, यांचं आमच्यावरील हें प्रेम आणि कष्ट पाहून माझा जीव अगदीं कानकोंडा होतो. माझ्या सत्यवानाचं अनंत जन्मींचं पुण्य, म्हणूनच त्याला अशी बायको मिळाली. त्या दोघांचं तरी काय अनिवार प्रेम आहे एकमेकांवर ? जरा कुणाचं नख दुखलं कीं दुसत्याचा प्राण कासावीस होतो ! क्षणभर दृष्टिआड झालं कीं दुसरा लागलीच कासावीस होतो ! परवांची तुम्हाला गंम्मत सांगतें. सावित्री पानं वाढीत होती, सत्यवानाला वनांतून यायला उशीर लागला, तशी तिचं तोंड काय गोरं मोरं झालं, बावरल्यासारखी काय झाली, कांहीं विचारूं

नका ! पानांत कोणचे पदार्थ कुठं वाढले, कशांत काय वाढलं ! तें देखील कांहीं विचारू नका. माझ्या लक्षांत ही चूक आल्याचं तिला कळतांच, तिच्या डोळ्याला खळकन् पाणी आलं, तशी मी तिला पोटाशीं धरलं, तिचा हुंदका आंवरता आवरेना, बरं, काय तिच्या मनांत आहे, तेंही सांगेना, इतक्यांत, सारंगनयनेनं सत्यवान् आल्याचं सांगितलं मात्र, तों लागलीच सर्व पाऊस व मेघ जाऊन आकाश स्वच्छ होऊन, चंद्रमा झळकूं लागला ! मला तर हसं आवरतां आवरेना.

द्युमत्सेन—काय सांगूं, मी हें आतां ऐकत असतांना तूं माझ्या दृष्टीसमोर जणुं काय माझं बालवयच उभं केलंस. क्षणभर तूं मला अंधाला दृष्टि दिलीस ! असो, देवा ! अरेरे आपले तेही दिवस गेले !

शैब्या—महाराज, श्री रामचंद्राच्या कृपेनं आपले हेही दिवस जातील बरं–! देवा, माझं सर्व आयुष्य माझ्या सुनेला दे ! खरंच महाराज,मुलगा हा पतीचा अंशना ? तेव्हां आपल्या मुलांच्या संसाराला प्रारंभ झाला, म्हणजे आईबापांना त्यांच्याही आनंदाच्या घडीची स्मृति होणं अगदीं सहाजिक आहे. चलायचना आतां ! आश्रमांत जाऊन डोळ्यांना औषध घालण्याची वेळ झाली, बिचारा व्याध वाट पहात बसला असेल आपली !

द्युमत्सेन—होय चल,पण थांब, हा एकदम काळोख कसला बरं मला वाटला ? थांब, हा पहा प्रकाशामधेंच काळोख हालत आहे.

शैब्या—महाराज, हा समोरचा महावृक्ष वाऱ्यानं हालत आहे.(स्वगत) देवा, आमच्या आश्रमांतील गृहसौख्याचं चित्र यांना दृष्टि देऊन दाखवशील का रे ?

---

## प्रवेश ५ वा.

( काळवीट व हरणी, 'सव्य वाम' करीत येतात. )

काळ०—तिष्ठ—( हरणी व स्वतः उभा राहतो. ) सत्ययुगांतला किती जरी रागीट मनुष्य झाला तरी तो रागाच्या भरांत सत्याला ढळत नाहीं.

हरणी--खरंच गडे! हें आपलं लग्नाचं आख्यान कलियुगांत झालं असतं, तर पाहिल्या प्रवेशांतच ग्रंथ आटोपला असता!

काळ०—अग, त्या कलीयुगाचं नांव सुद्धां काढूं नकोस. परवां त्या गलंड ऋषीचं भविष्यपुराण चुकून ऐकलं नी थक्क होऊन गेलों!

हरणी—असं, काय ऐकलंत तरी बाई?

काळ०—तुला ऐकायची इच्छा आहे? पण एका अटीवर सांगतों.

हरणी--ती कोणती?

काळ०—त्या वर्णनांतला कोणताही गुण तूं उचलतां कामा नये.

हरणी—पण तसंच तुम्ही सुद्धां उचलता कामा नये. हं सांगा तर काय ऐकलंत तुम्हीं तें!

काळ--ऐक तर—

पद २९ वें.

**श्रवण मनन प्रथम करुनी। कलीचे विविधा प्रकार। चमत्कार तदनुसार। घेई सार॥ध्रु०॥ व्यापारी बुडवतील। सुवर्णकार फसवतील। सावकार नाडतील। पदरीची गरीब बापुडीं कुळें॥ १॥ भ्रष्ट बुद्धी नष्ट होतील। चौर्य कर्म कवी करतील। रासभ गंधर्व गणती। नसतां जल दावितील मृगजळे॥ २॥**

---

## प्रवेश ६ वा.

[ स्थळः–तपोवन, सत्यवानाची झोंपडी. सारंगनयना चुलीजवळ बसली आहे, व्याध लाकडें तोडीत आहे. ]

सारंग०—व्याधा, कितीरे हीं औषधं, वनस्पति आणि मात्रा या तुझ्या बटव्यांत? कांहीं कांहीं वनस्पति किती जड आहेत या? तशाच या मात्रा तुझ्या या झोळण्याच्या काळोखांत देखील चमकत आहेत. मला

तर असं वाटतं कीं जसं देवांनीं समुद्र मंथन करून रत्नं काढलीं तसंच तूं हें सर्व रान धुंडाळून हीं रत्नं गोळा केलीं आहेत! खरंच ना!

व्याध—होय, सारंगनयने, त्या बटव्यांत फार जुन्या आणि अमोलिक मात्रा आहेत. कांहीं कांहीं तर माझ्या आजोबांच्या पणजोबांच्या वेळच्या आहेत. कमींत कमी—आपल्या पलीकडे तिकडे जो मोठा वड आहेना त्याचं जितकं आयुष्य, तितक्या ह्या जुन्या आहेत. या सर्व संजीवनी मात्रा आहेत. कांहीं तर इतक्या जलाल आहेत कीं, त्या गेलेले प्राण देखील मागं खेचतील! सारंगनयने, तुझ्या रोग्याचं आणि रोगाचं नांव ऐकल्यापासून माझी काय स्थिति झाली आहे तें काय सांगूं? तूं माझं मन कसं हळवं करून टाकलंस! जो हा व्याध ह्या पलीकडच्या तुटलेल्या कड्यावरून, खालच्या दरींत दंड ठोकून उडी घ्यायला भिणार नाहीं; मेघासारखी गर्जना करणाऱ्या सिंहाचा जबडा फाडून त्याचे दांत मोजायला कचरणार नाहीं! जुनाट वारुळांत, उरायेवढा हात घालून, चवताळलेल्या नागाची फणा धरून खेचून बाहेर काढायला डरणार नाहीं, तें हें माझं दगडाचं हृदय, तूं तुझ्यासारखं भित्रं आणि कोमल करून टाकलंस! एखाद्या लहान मुलाप्रमाणं करून टाकलंस.

सारंग०—हें काय बरं व्याधा? तूंच जर हातपाय गाळलेस, तर आम्हांला धीर कोण बरं देणार! कसा मेला तोंड दाबून बुक्क्यांचा मार चालला आहे. आंतल्याआंत गुदमरल्यासारखं झालं आहे. मन मोकळं करायला, तुझ्याशिवाय जगांत कुठंच जागा राहिली नाहीं. देव करो आणि तुला यश मिळो आणि बाई हें अरिष्ट टळो!

व्याध—सारंगनयने, या जगांत प्राणिमात्राला निमित्त केल्याशिवाय मृत्यु हात लावीत नाहीं. ठेंच लागणं, पाण्यांत बुडणं, अग्नींत भाजणं, ताप येणं, क्षय, अपस्मार, कांहींना कांहींतरी निमित्त पाहिजे. ह्या व्याधाचा डोळा सारखा सत्यवानावर पहारा करीत आहे. पण माझं मन कसं त्याच्या निमित्ताच्या नाना कल्पनांत गुंग झालं आहे! त्याच्या निमिताचं निदान आणि त्यांवर योग्य वनस्पति आणि अनुपान मिळालं तरच अपमृत्यूला फसवितां येईल, नामांकित वैद्य जसा आपल्या एकुलत्या एक मुलाला

औषध द्यायला भितो त्याचप्रमाणं माझं झालं आहे, आणि कारण काय तर ही ममता! पाषाणाचं हृदयही लोण्यासारखं करून सारासार विचारांचं हरण करते! असं चमत्कारिक आहे!

सारंग०--व्याधा--खरंच रे. ही ममता, ही माया, हें प्रेम म्हणजे शहाणपणाच्या टोपण नांवाखालीं लपून बसलेलं वेडेपणच होय!

व्याध--गप रहा. ती पहा सावित्री पाणी घेऊन आलीच. सारंगनयने, आतां भ्याडपणा टाकून, प्रत्येक धीराचा शब्द तिला दिला पाहिजे. लक्षांत ठेव हं. लाग आपल्या कामाला. ( सावित्री पाण्याची घागर व फुलांच्या परडीसह येते ).

सावित्री--आजच विश्वसमाप्तीचा दिवस! ह्या हृदयाच्या मडक्यांत काळजीच्या आणि चिंतेच्या भडाग्नीनं खदखद शिजणाऱ्या माझ्या जीवा, अजून तुला कांहीं प्रहर असंच शिजलं पाहिजे! इतक्यांतच तुला वाढून टाकलं असतं रे, पण काय करूं, काळ कोणचाही कच्चा पदार्थ खात नाहीं! मीं पूर्वजन्मीं कोणाची कांहीं तरी ताटातूट केली म्हणून या जन्मीं माझी ही ताटातूट होत आहे!

सारंग०—सखे सावित्री हा मी तुला पदर पसरतें. आधींच तीन दिवस निर्जळी उपवास केला आहेस, आणि त्यांतून हें दुःख. मग मी तरी बाई कसं करायचं?

व्याध—तुझ्यासारख्या विचारी बायकोनं मन आंवरायला पाहिजे. तुला आम्हीं उपदेश करायचा म्हणजे शहाणपणालाच शहाणपण शिकविण्यासारखं आहे.

सावित्री—दुःखानं काळजीनं शहाणपण नाहीसं होतं. मीं वेडी झालें आहे. तुम्ही माझी समजूत घालून धीर देऊं नका. सरा, तुम्ही लांब सरा. हृदयांतील अग्नीच्या प्रचंड ज्वाला वाणीच्या रूपानं बाहेर पडून, तुम्हांला चटके बसतील. तुम्ही जर आतां माझ्याबद्दल कळवळा दाखवाल किंवा दुःख कराल, तर दुःख एकटं येत नाहीं बरोबर आणखी सोहीबती घेऊन येतं, असंच म्हटलं पाहिजे!

### पद ३० वें.

**मी चार घडींची असे प्रवासी । पळ घडी आतां मोजितसें गे ॥ या नश्वर जगींची सावित्री ही । क्षण पळ आतां लक्षितसे गे ॥ध्रु०॥ मज मोह आतां हे सोडूं दे । सखे, लोभ सकल मज तोडूं दे । ही रीत जगाची नित्य असे । कुणी येत असे कुणी जात असे गे ! ॥ १ ॥**

मी आतां परलोकची वाटसरू. चार प्रहरच केवळ या धर्मशाळेंत रहाणार आहें.

**सारंग०**—हा असा शोक करून, भविष्यवाणीच्या आधीं तूं मात्र प्राणसंकट खचित ओढून आणीत आहेस. अग, सर्व जगच वाटसरू आहे, कोण बरं इथला कामयचा रहिवासी आहे ?

**सावित्री**—कबूल, पण ओळीनं व्हावं, येवढंच कायतें माझं म्हणणं आहे. आम्हांला अबला म्हणतात, सुकुमार म्हणतात, पण आम्ही इतक्या प्रबल आणि सोशीक असतों, कीं दुःखानं पाषाण देखील दुभंग होतील, पण हा पहा माझ्या हृदयाला मुळींदेखील भंग झाला नाहीं. जर हंबरडा फोडून बडबडण्यानं माझे प्राण खचित जाणार असतील तर, सारंगनयने, व्याधा, मला रडून रडून मरून जाऊं दे ! माझ्या एका प्राणाचे शतशः तुकडे करुन त्या सतीचे, सीतेचे आणि रामाचे पाय मी झांकून टाकीन. सारंगनयने, सीतादेवी ही पतिविरहाच्या दुःखानं होरपळून निघाली आहे ग ! खात्रीनं ती माझ्याकरितां एक शब्द वेंचून रामचंद्राला दया आणील ! जिच्याजवळ दयेचा समुद्र उचंबळत आहे, ती इतकी काकुळती केल्यावर या अभागिणीला एक थेंब देखील देणार नाहीं का ग ? म्हणून म्हणतें, सारंगनयने, व्याधा, मला रडून रडून मरून जाऊं दे !

**व्याध**—राजकन्ये, हा तुझा भयंकर शोक आवर. मला दोन शब्द तरी बोलूं दे. प्रत्यक्ष नारदांनीं रोगाचं निदान केलं हें खरं, पण आजपर्यंत अल्पायु दीर्घायुषी झाला नाहीं, अपमृत्यु कोणाचाही टळला नाहीं, भविष्य खोटं झालं नाहीं, असं तर ते म्हणाले नाहींत ना ? असं जर ते म्हणाले असतील, तर त्यांनीं जगाला, एक नवीन मार्गच दाखवला म्हणायचा !

मग ऐन वेळीं दगा देणारा, धर्म तरी पाहिजे कशाला? आणि उपास-तापासांच्या कर्मांचं थोतांड तरी कशाला?

सावित्री—त्यांनीं केलेलं निदान चुकेल, असं कां म्हणतोस?

व्याध--तें मी काय सांगूं? पण मी तुला असं विचारतों कीं, जर भविष्य टाळतां येत नसलं, तर तो देव तरी कशाला? असा बहिरा, मुका, आंधळा, आणि पांगळा माझा भोळा कैलासनाथ नाहीं!

पद ३१ वें.

**दुर्बल भाकित काय असे ॥ ध्रु० ॥ झगमगती अंबरीं या ज्योति। ज्याच्या तेजे तळपत असतां। उत्पादन परी पालन लयही। ज्याच्या हातीं वसे ॥१॥ अंतिम तांडव नृत्याकरितां विश्वखगोला तुडवीत असतां। धाके थरकती ब्रह्मा विष्णु। इतरा पाड नसे! ॥ २ ॥**

माझ्या कैलासनाथाला भक्तीचा आणि धर्माचा कैवार आहे. पूस, पूस हे डोळे, मनुष्यमात्रांचं भविष्य वर्तविणारे, एवढे मोठे नवग्रह, त्यांना देखील आपलं भविष्य कळलं नाहीं, कीं एक वेळ पायऱ्याप्रमाणं आपण होऊन, आपल्या पाठी तुडवून एक कैलास हलवणारा प्रचंड दैत्य सिंहासनावर चढणार आहे! पंचमहाभूतांना देखील कळलं नाहीं. कीं, आपल्या कपाळीं झाडसारवण येणार आहे, रावणालाही ज्यानं एका बाणानं गत प्राण केलं त्या श्रीरामचंद्राचाही परमेश्वर जो कैलासनाथ त्याच्या सामर्थ्यांपुढें तुझ्या भविष्याची कथा ती काय?

सारंग०--व्याधा, व्याधा, आज जर तूं इथं नसतास, तर भयंकर प्रसंग ओढवला असता. सावित्री, डोळे पूस, नीटनेटकं वस्त्र सावर, ह्या पहा आईसाहेब आल्याच, अग तूं सगळं तें राहूं दे, मी ठेवतें नेऊन तिकडे!

सावित्री—पतीच्या प्राणाकरितां सर्वत्रांना शरण जाणाऱ्या माझ्या जीवा, गुदमर, असाच कांहीं प्रहर गुदमर! नाहीं तर या आईबापांसारखं प्रेम करणाऱ्या सासुसासऱ्यांच्या जीवांना यातना दिल्याचं आणखी तुला

पाप लागेल ! ( घागर, वगैरे उचलते. समोरून द्युमत्सेन, शैब्या, व दुसरीकडून सत्यवान् येतो. )

शैब्या--सारंगनयने, पलीकडच्या ऋषीपत्नी त्या अनुसुयाबाई त्यांनीं उभ्या उभ्या बोलावलं आहे, राहूं दे तें, मी तेवढं संध्या होईतों निराहाराचं करतें. ( सावित्री उभयतांस वंदन करतें. )

द्युमत्सेन--सौभाग्यवती हो ! हे कोण आहे वरं इकडे ?

व्याध—महाराज मी आहें.

द्युमत्सेन—कोण, आमचा पाठीराखा ? ये व्याधा, मला बाहेरून येण्यास थोडा वेळ लागला ! आण, तुझा बटवा आण, औषध घालतोस ना ? देणार, देणार तूं दृष्टि या अंधळयाला !

व्याध—राजा, मी नुसता निमित्तमात्र आहें. पाहूं (डोळे पाहातो ) हां-हां, सूर्यावर जसं अभ्र येतं, त्याचप्रमाणें राजा, तुझ्या दृष्टीवर साऱ्याचं जाड पटल आलं आहे. हो, हे पहा इकडच्या बाजूनं चांगलं पातळ होत चाललं आहे ! ही वनस्पति अशीच कांहीं दिवस उगाळून घालीत गेल्यास, हें पटल साफ वितळून जाईल.

सत्य०—बिचारा अहोरात्र आमच्याकरितां आपल्या जिवाचं रान करतो आहे ! आण-व्याधा, ती वनस्पति मी उगाळतों ( सहाण घेऊन वनस्पति उगाळूं लागतो ).

व्याध—राजा, तूं आतां थोडासा पड ! वनस्पति उगाळून होईतों, मी थोडी कानाशिलं आणि डोळ्याच्या शिरा चोळून देतों, रक्त चांगलं डोळ्यांत खिळलं म्हणजे गुणाला मदत होते ( शिरा चोळण्यास बसतो. )

सावित्री--( सत्यवानाजवळ जाऊन ) थांबा हो, तुम्ही कशाला श्रम करतां ? मी उगाळतें, असं काय वरं ?

शैब्या--सत्यवान्, तीं त्यांतलीं दोन लाकडं दे पाहूं ? ( सावित्री चटकन् देते. ) सावित्री, तूं थकलेली आहेस, तूं आतां जरा स्वस्थ बैस.

सावित्री—नाहीं हो ! मीं मुळींदेखील थकलेली नाहीं ! काय होतं यवढ्याशा श्रमानं मला ?

सत्य०—मी नको नको म्हणत असतांना कशाला बरं ती घागर इतक्या लांबून आणलीस ? स्वस्थ उभी रहा, सगळी कामं करायला तुला चार का हात आहेत ? नको उगाळूस तूं.

सावित्री—देवानं मला चतुर्भूजच केलं आहे ! थांबा बाई.

शैब्या—सत्यवाना, ती घागर थोडी दे रे (सावित्री चटकन् देते.) सत्यवाना, ती थकलेली आहे, तुला काय झालं होतं चटकन आणून द्यायला?

सत्य०—आई चूक झाली माझी.

व्याध—हं, आणा तें अंजन इकडे (सत्यवान् औषध देतो) हां आतां (औषध घालतो, राजा 'हंहं' करतो) प्रथम थोडा चरका बसतो पण परिणाम अगदीं गोड ! (दुसऱ्या डोळ्यांत घालतो.)

सावित्री--माझं हृदय तर कसं चरके बसून बसून करपून गेलं आहे, याचाही परिणाम, देवा गोड करशील का ?

सत्य०--आई, आतां तुला स्पष्ट सांगतों, आज तीन दिवस मी वनांतून कंदमुळं हिच्या उपवासाकरितां आणून दिलीं, तीं सर्व हिनं तपोवनांतील मुलांना देऊन टाकलीं ! अद्यापपावेतों पारणें सुटायला बराच वेळ आहे ! तरी पलीकडून थोडींशीं फळं आणतों, होमाचीं लांकडेंही संपलीं आहेत, तरी येतांना थोडींशीं लाकडंही घेऊन येतों, बाबांची संध्या आणि तुझं निराहाराचं होत आहे तोंच परत येतों.

शैब्या—सत्यवाना, जा जा, आधीं दोनचार फळं आणून दे पाहूं.

सावित्री—थांबा गडे, मी येतें बरोबर !

सत्य०--हें पहा, तुला पाऊल देखील टाकवत नाहीं, तूं थांब. हा पहा मीं आलोंच.

सावित्री--(स्वगत) देवा, या वेळेस मला ब्रम्हांडाचं बळ दे (उघड) तें कांहीं नाहीं, मी तुमच्याबरोबर येतेंच ! असं काय बरं !

सत्य०—तुला दुःख झालं, म्हणजे मला बरं वाटेल का ? असं काय बरं ? हा पहा, मी आत्तां येतों (जाऊं लागतो.)

शैब्या--कसलारे एकमेकांशीं कुजबुजून वितंडवाद घेतां आहांत, सत्यवाना, तिला एकदेखील शब्द रागावून बोलायचा नाहीं बरं का !

**सावित्री**—थांबा, थांबा, तुम्हांला माझी शपथ आहे. हें पहा सासूबाई, ते मला मुळीं सुद्धां रागावले नाहींत हो, मींच उलट हट्ट घेतला आहे ! सासूबाई, मी आपल्या पायां पडतें, माझी थोडीशी ही इच्छा आपण पुरवाल का ? पुन्हां कधीं मी आपल्याला त्रास देणार नाहीं हो.

**शैब्या**--सावित्री, काय पाहिजे तुला, तुझ्यावरून मी प्राण देखील ओवाळून टाकीन बरं !

**सावित्री**—मला त्यांच्याबरोबर जाऊन यायची परवानगी द्या ! नाहीं म्हणूं नका. पुन्हां मी आपल्याला जन्मांत गळ घालणार नाहीं हो.

**शैब्या**--एवढंच ना ? त्याला कशाला ग इतकी विनवणी पाहिजे ! मीं खुशाल जा म्हणून सांगितलं असतं, पण कीती तरी उपवासानं थकली आहेस तूं ! तीन दिवस तुझ्या डोळ्याला डोळा नाहीं, त्यामुळं तुझी झालेली स्थिति पाहून मन कसं कचरतं !

**सत्य०**—आई, मीं आतां घेऊन येतों. ( सावित्रीला ) काय बरं विनाकारण हट्ट धरतेस असा ?

**सावित्री**--नाहीं हो सासूबाई, मी मुळीं देखील दमलें नाहीं. पुन्हां या पायाशीं मी कधीं सुद्धां हट्ट धरणार नाहीं ! द्यायची मला परवानगी.

**शैब्या**--ऐकलंत कां ? सावित्री सत्यवानाबरोबर जाऊन यायची परवानगी मागत आहे. देऊं कां तिला परवानगी ?

**द्युमत्सेन**—कोण सावित्री ? असं असं ! समजलों ! ! समजलों ! ! ! ( हंसतो ) असं काय ? हे पहा दोघंही ममताळू तरुण आहेत. जाऊं देत त्यांना ! सूर्य अस्तास जात असतांना, वनांत एक प्रकारची मौज असते.

**शैब्या**--जा हो सावित्री, पण फार दूर जाऊं नका बरं ( सावित्री नमस्कार करिते. )

**द्युमत्सेन**—सत्यवाना, आज तुझ्याबरोबर सावित्री येत आहे. ती फार थकलेली, तेव्हां तिला प्राणापलीकडे जप बरं का ! जा लवकर परत या.

**सत्य०**—माझ्या पाठुंगळी बसत असलीस तरच नेतों, मी कांहीं तुला पायीं चालू देणार नाहीं.

सावित्री—सासूबाईंच्या देखतच कां मला पाठकुळी घेणार आहांत ? बसेन हवी तर.

सत्य०——लाडके, पतिव्रता प्रेमानं सुद्धां परमेश्वराला जिंकतील, मग नवऱ्याला दासानुदास करतील, यांत नवल काय ?

सावित्री——या देवानं ऐकलंन माझं गाऱ्हाणं. ( जातात. )

द्युमत्सेन—अग, गेले कां ग ते दोघेजण ? अग आपण नव्हतों का असंच लहानपणीं, थोडा मातापितरांचा डोळा चुकवून, उद्यानांतून फिरून येत ? आपल्यावरून जग ओळखावं, बरं संध्येचें दे पाहूं. ( ती संध्येचें देते व त्याला खालीं पाटावर बसवते ).

---

## प्रवेश ७ वा.

[ स्थळः–जंगल कऱ्हर–सत्यवान व सावित्री. ]

सावित्री——असंच गडे मला आतां नेहमीं बरोबर नेत जायचं, मुळीं देखील विसंबायचं नाहीं बरं का !

सत्य०——प्रिये, मला तरी कुठें क्षणभर विसंबावंसं वाटतं ? माझ्या सहवासांत तुला किती तरी त्रास सहन करावे लागतात, हें पाहून मला माझ्या स्थितीबद्दल वाईट वाटतं.

सावित्री—आपण माझ्याजवळ असलांत, आपल्या प्रेमाचे बोल मी ऐकलें, आपलं हंसतमुख मीं पाहिलं, म्हणजे सर्व विश्वांतील सुख घेऊन माझं सर्व जग, माझ्या जवळ उभं आहे, असंच मला वाटतं, देव जवळ असल्यावर त्याच्या भक्ताला कसली बरं उणीव वाटणार ?

### पद ३२ वें.

**नाहीं मला उणीव गमे ॥ देव सखा हा निकटीं असतां रिझवित नयना ॥ध्रु०॥ सकल सुखांना घेऊनि हातीं । विश्व उभें कां सन्निध माझ्या ॥ भास मना हो निरखुनि आपणा । मम निकटीं असतांना ॥ १ ॥**

सत्य०—सावित्री, आपल्या प्रेमाच्या मनुष्याचा शब्द किती मंजुळ वाटतो ! ही मूर्ति आज जवळ जवळ वर्ष होत आलं, सारखं या मूर्तीला हृदयांत ठेवतों, हातांत घेतों, तिच्याशीं खेळतों बागडतों, तरी देखील हा माझा स्वर्ग रोज नवीन नवीन वाटून जीवाची अधिरता वाढत आहे.

सावित्री—चला गडे, उगीच कांहीं तरी, देवाचं प्रेम असंच अनीवार असतं हो. माझ्यासारखी भाग्यवान् माझी मीच आहें! अक्षता डोक्यांवर पडल्यापासून माझा स्वभाव अगदीं अप्पलपोटा झाला आहे. माझ्यासारखं भाग्य त्रिभुवनांत देवा कुणालाही लाभूं नये असंच मला वाटूं लागलं आहे, देवा कायरे माझी ही स्थिति !

सत्य०—प्रिये, सूर्याचे किरण जसे अंधःकाराला गिरीकंदरांत कोंडून टाकतात, त्याचप्रमाणं तुझ्या या मुखकमलाचं मधुर हास्य इतर विकारांना नाहींसं करून ह्या हृदयांत केवळ आनंदच भरून टाकतें. सावित्री, हें काय ! तूं आज मधून मधून सारखी मुखाकडे टक लाऊन पहात आहेस आणि मी बोलत असतांना दुसऱ्याच कांहीं तरी गूढ विचारांत गुंतल्यासारखी दिसत आहेस, हे पहा, तुझे डोळे कसे किंचित् भयभीत झालेले आहेत!

सावित्री—नाहीं हो मला कसली देखील भीति वाटत नाहीं, या कल्पतरूच्या सावलींत मी उभी असतांना मला कसली बरं भीति वाटणार ! या कल्पतरूच्या छायेंतील होणाऱ्या परमानंदामुळंच, माझा कंठ गहींवरून, पाण्यानं डोळे भरून गेले. परमानंद किंवा दुःखाची परमावधि यांचं पर्यवसान—

सत्य०—हो हो, असं रडण्यांतच होतं! पण लाडके हे जर देवच असे रडूं लागले तर माझ्यासारख्या माणसानं काय करायचं ? छे, हे तुझे हुंदके आनंदातिरेकाचे तर खास नव्हत, सांग तुझ्या मनांतलं. मला नाहीं का बरं सांगायचं ?

सावित्री—असं कसं बरं म्हणतां ? जे देवाला सांगायचं तेंच तुम्हांला सांगायचं. पण जे तुम्हांला सांगायचं तें देवाला सुद्धां नाहीं बरं सांगणार ! महाराज, माझं मन कीं नाहीं आज अनावर झालं आहे, जो जो तुमच्या मुखकमलावरून दृष्टि टाकावी, माझ्यावरील तुमच्या मम-

तेचा एकावर एक वरचढ शब्द ऐकावा, तों तों, ह्या हृदयसमुद्रांत प्रचंड लाटा उसळतात, आणि त्या लाटांचे तुषारांचं या अश्रूंत रूपांतर होतं, हे माझं वादळ शांत करण्याकरितां मी तुम्हांला एक विनंती करणार आहे, तेवढी मान्य कराल का ?

सत्य०—ती अमान्य करणं मला शक्य तरी आहे का ?

सावित्री—तर मग तुम्ही माझ्याशीं कपट करा, खोट बोला, माझी निंदा करून मला झिडकारून टाका, म्हणजे तरी माझं मन थोडं स्थिर होईल. रागावा तर माझ्यावर—

सत्य०—त्यापेक्षां मी मृत्यु आनंदानं पत्करीन !

सावित्री—हाय रे देवा ! मीं चुकलें, क्षमा करा, त्याचं नांव सुद्धां तोंडातून काढूं नका. तो भाग्याचा वांटा मला आधीं पाहिजे. या वेळेला मला असं वाटतं कीं, जसं कांहीं मीं एका हातानं स्वर्ग कवळला आहे, आणि पाताळांत नेण्याकरितां माझा दुसरा हात कोणी ओढीत आहे. तापलेला लाल दाभण, काळ पुरुष एका डोळ्यांत खुपशींत आहे, आणि दुसऱ्या डोळ्याला श्रीविष्णूचं दर्शन होत आहे.

सत्य०—प्रिये शांत हो, बरं केलंस विष्णुचं आणि यमाचं भांडण लावून दिलंस, प्रिये या भांडणांत कमलापति श्रीविष्णुच जिंकणार !

सावित्री—देवा, मी ही आकाशवाणीच ऐकत आहे का ? जशी माझ्या भोळ्या विश्वासाला सीमा नाहीं, तशीच देवा, तूं आपल्या दयेला मर्यादा घालूं नकोस.

सत्य०—प्रिये शांत हो, आजची तुझ्या मनाची स्थिति अनावर झालेली पाहून माझं मनहीं अनावर होऊं लागलं आहे. तुझं पूर्वीचं हसरं मुख केव्हां पाहीन असं झालं आहे. हांस तर—हसतेस ना ?

## पद ३३ वें.

**सखे हासोनी बोलासी बोल । बोल तुझे बिन मोल ।**
**जीवींचे सखे सुखाचे ॥ ध्रु० ॥ हांसवी विश्वा तव हास्यानें ।**
**आनंदभरानें डोल ॥ १ ॥ चिंतातुर कां दिससी सखये ।**
**खिन्न गूढ अती खोल ॥ २ ॥**

तूं माझ्याजवळ हसून खेळून बोलत असलीस म्हणजे मला किती तरी सुख होतं म्हणून सांगूं ?

**सावित्री**—महाराज, मीं काय करूं ! माझ्या हृदयानं कशी धडकी घेतली आहे !

**सत्य०**—सावित्री, तूं वाटेल तशी माझी समजूत कर पण खात्रीनं तूं कांहीं तरी भयंकर चिंता करीत आहेस. या जगांत वाटेल तें लपवतां येईल, पण चिंता-काळजी ही लपवतां येणार नाहीं. ती वैरीण प्राणिमात्रांच्या भालप्रदेशावर, आपलं जाळं पसरून उभी असते. सांग, तुला काळजी कसली आहे ? तुला माझी शपथ आहे. सांग तर-

**सावित्री**—नका शपथ घालूं नका, म्हणा तर शपथ सुटली म्हणून ! देवा, या वेळेस खोटं बोलावं लागत आहे त्याची मला क्षमा करा !

**सत्य०**—मग सांग तर तुझ्या हृदयांतील दुःख, म्हणजे शपथ सोडतों.

**सावित्री**—महाराज (रडत) आतांशा किनई, मला माझ्या आईची आणि वडलांची फार आठवण येते हो. आजच एक वर्ष पुरं होत आलं, तेव्हां ते माझ्या दृष्टीस पडतील का असं वाटतं. खरंच वैर आणि ममता, यांना अंतच नाहीं, महाराज, माझ्या उदासीनतेमुळं मी आपल्या दुःखाला कारणीभूत होतें, त्याची क्षमा करा-

**सत्य०**—एवढंच ना ? मला वाटलं माझ्यामुळं, किंवा माझ्या मातापितरांमुळं, तुला कांहीं त्रास होत आहे. तुझ्यावरील प्रेमामुळं मला तुला माहेरीं पाठवण्याचं भानच राहिलं नाहीं, खरंच, नूतन वधूला, बाप आणि पति, यांच्या प्रेमाच्या कातरींत सांपडावं लागतं. त्या बिचाऱ्या आईबापांकरतां एकीकड झुरत असतात, आणि तिकड पतीची मर्जी संभाळण्यासाठीं वरपांगी हास्य पत्करतात ! खरंच प्रिये, प्रेमी एक प्रकारचे वैरीच होत. माझ्याकडून चूक झाली क्षमा कर. उदईक प्रातःकालीं तुला माहेरीं चार दिवस पाठविण्याविषयीं बाबांना सांगतों, चल, तर आपण बरेच रमत आहोंत, तूं किती तरी थकली आहेस. असा माझ्या खांद्यावर भार टाकून चल. (जातात.)

---

## प्रवेश ८ वा.

[ स्थळः—एक जुनाट वटवृक्ष. गवळ्यांचीं पोरें गुरें हाकीत येतात. ]

सर्व पोरें—अरे होरे हो ! ढवळी ढवळी, पवळी पवळी होऽ !

रामा—ए लेका लख्या, अहाहाहाहा ! होरे होऽ !

लक्ष्या—अरे, माझ्या बाला मी आवरायच्या नाहींत बघ ! अरे रानांतून घरीं जायची त्यांची येळ झाली अन् घरीं त्यांचीं वासरं बांधलेलीं, त्या काय आंवरतात म्हणतोस व्हय माझ्या बाला ? अरे होरे हो, जमनी, जमनी, छे नांव कशाला घेते.

सर्व मुलें—

### पद ३४ वें.

पहा कशा या तुफान झाल्या रे गाई ॥ चौखुरी उसळल्या पाही रे ! ॥ध्रु०॥ निज पुच्छ पृष्ठीवरी धरुनी । बघ कानहि टंवकारुनी । पावला गणिक हंबरुनी । घरचीच जाहली घाई रे ॥ १ ॥ ही आईची बघ ममता । जगिं नसे कोणी अडविता । ही अनावरची प्रेमलता । हीस भीड लाज मुळीं नाहीं रे!॥२॥ ही पान्हवली बघ ओटीं । पोटीच्याच गोळ्यासाठीं । थानांत दुधाची दाटी । ही धार लागली पाही रे ! ॥३॥ जीवांसी जन्म दे ममता । संरक्षि तिची वत्सलता । ही आई माया सरिता । खळवळोनी धांवत जाई रे ॥ तुफान झाल्या रे गाई ॥ ४ ॥

लक्ष्या—ए लेका राम्या, चाल बेगी बेगी, अरे सूर्य बुडाला म्हणजे जसं ढगांवरती रंग दिसत्याती, तसंच ह्यो तांबडा, पांढरा, काळा, करडा, समदा गाईंचा कळप एकमेकांमधें मिळूनशान धावतांना, जणूं कांहीं समदं ढग खालीं उतरल्यावाणी दिसतंया. अरे चाल चाल बेगी ! बेगी अरे लेका, आणखी एखादी गाय तर चुकून नाय राहलीना ?

रामा—नाय नाय—चल बेगी बेगी—अरे होरे हो !

**सर्व**--ढवळी, ढवळी, पवळी, पवळी, जमनी, जमनी होरे होऽ!

(सर्व मुलें जातात-सावित्री येते.)

**सावित्री**—आजच चतुर्दशी, आश्रमांतून निघाल्यापासून, नारदांची वाणी काळरूप घेऊन, कशी माझ्या भोंवतीं घिरट्या घालीत आहेसें वाटतं. हा पहा, अस्तास जात असलेला सूर्य देखील, कसा खिन्न मुख करीत आहे! सूर्यनारायणा, मी तुला शेवटचा नमस्कार करतें, तुझ्यासारख्या प्रतापशाली तेजोवंतालाही जर अस्त टळत नाहीं, तर आम्ही तर या मृत्युलोकचीं क्षणभंगुर दुर्बल माणसं, केवळ स्वप्नांतला आमचा संसार, आणि हा सगळा मृत्युलोकचा बाजार! सूर्यचंद्रासारखे महात्मे, आणि अनंत कोटी तळपणारे ताऱ्यांचे सत्पुरुष, प्रत्येक क्षणीं मृत्युलोकांतील आम्हां मानवांचे डोळे उघडीत असतात, पण आम्ही अंध, अज्ञानी, गर्विष्ठ, ह्या स्वप्नांतील गोष्टीच उराशीं कवटाळून, गर्वानं फुगून गेलों आहोंत. उदय आणि मध्य यापुढं अस्त आहे हें आम्ही विसरून जातों! असो, आतां काय त्याचं? (सत्यवान् येतो.)

**सत्य०**—सावित्री, तूं पराकाष्ठेची थकलेली आहेस! तूं क्षणभर इथंच बैस, आपण येतांना थोडींशीं फळं घेतलींच आहेत, आणखी चार तोडतो नंतर दोन मोठीं लाकडं घेऊं आणि परत जाऊं.

**सावित्री**—पण मीं येतें गडे बरोबर!

**सत्य०**--आतां आणखी कुणीकडे, कसं बरोबर यायचं? कडेवरच बसतेस का? म्हणजे अगदीं बरोबर, तसाच चढतो झाडावर, हं-चल बैस इथं, हें पहा, तुझ्या दृष्टीसमोरून जात नाहीं, मग तर झालं ना?

**सावित्री**—उगीच जास्त श्रम करूं नका गडे.

**सत्य०**—नाहीं मुळींच श्रम करीत नाहीं, हीं पहा तेवढीं चार फळं काढतों (सत्यवान् जातो).

**सावित्री**—एकीकडून मृत्यूचे भयंकर विचार, हा रानांतला पदोपदीं वाढणारा अंधकार, आणि या हृदयांतील कल्पनांचा बाजार! हा पहा, माझा उजवा डोळाही लवत आहे, जीव अगदीं कासावीस झाला, भयानं

सर्वांगाचा थरकांप होऊन, अंगावर केसा सरसरून कांटा उभा राहिला आहे, सुसर जशी तृषिताला भुरळ पाडून ओढून नेते, त्याचप्रमाणं काळाच्या सुसरीनं आम्हांला मोहांत तर घातलं नाहींना ? हा पहा, घुबडाचा घुत्कार ! हाय ! तोच पुन्हां शब्द ? किती भेसूर देखावा क्षणांत झाला ? अंधेराची घोंगडी डोक्यावर घेऊन, लपून छपून, मृत्युच पावलं टाकीत, येत आहेसं वाटतं ! कोण आहे तें ? प्राणनाथ, प्राणनाथ, याहो इकडे या, मला गडे अतिशय भीति वाटून तोंडाला कोरड पडत आहे. या हो या.

सत्य०—( येऊन ) कां घाबरलीस ? लाडके कोण आहे ? इथं तर कोणी नाहीं. वाहवारे वाहवा तूं फारच शूर दिसतेस ? काय भ्यालेल्या हरणीसारखी धांपा टाकीत आहेस ?

## पद ३५ वें.

**मन शांत करी सुकुमारे । काल्पनीक भय चिंतन न करी प्राणसखे सुविहारे ॥ध्रु०॥ मम सहवासें शिणलीस सखये । कोमल राजकुमारे । सोशिलेसी त्रासा या विपिनीं । लज्जि·त मी उपकारें ॥ मन० ॥ १ ॥**

प्रिये शांत हो, तुला सांगितलं ना ? कीं, तुझ्या हाकेच्या आणि दृष्टीच्या आड होत नाहीं म्हणून, मग कां बरं नुसतं कल्पनांचं काहूर उसळलं हें. घे हीं फळं ठेव, झालं काम म्हणायचं, तेवढीं १।२ लाकडं घेतो कीं परत जाऊं, ही पहा वाळलेली फांदी, आजला पुरे.

सावित्री—पण आतां तुम्ही बसा बाई, मीच तोडतें ती फांदी. द्या तो परशु इकडे–हा पहा–किती घाम आला आहे !

सत्य०—( हंसत ) हें काय बरं वेड्या सारखं ? हें बघ मी वाळक्या फांद्या खालीं टाकतों, तूं गोळा कर, तोंपर्यंत मीं एक दोन घावांत ती फांदी तोडतों.

सावित्री—तुमच्या:पुढं मी काय बोलणार ? प्राणनाथ, अंधार किती तरी पडला आहे, अगदीं जपूनच चढावं गडे.

**सत्य०**--लाडके तूं माझ्याजवळ असलीस, म्हणजे अमावस्यादेखील पौर्णिमेसारखी वाटते, हा पहा आलोंच. ( कुऱ्हाडीनं फांदी तोडतो. )

**सावित्री**--हे झाडावर चढत असतांना प्रत्येक पावलागणिक आणि परशूच्या प्रत्येक घावागणिक, माझं हृदय कसं वेदनांनीं दुखूं लागलं आहे! काळ, परशूचा घाव माझ्या हृदयावरच मारीत आहेसं वाटतं. हें पहा, काळाचा दूत हें घुबड पुन्हां ओरडूं लागलं, प्राणनाथ नको गडे ती फांदी, या हो खालीं.

**सत्य०**—हा पहा एकच घाव, हाय, मेलों सावित्री सावित्री, (फांदी मोडून पडते, सत्यवान् खालीं पडतो, हळुहळू बेशुद्ध होतो ) सावित्री, मला घेरी येत आहे.

**सावित्री**--हाय रे देवा, हें विघ्न एकाएकीं, प्राणनाथ कुठं हो लागलं तुम्हांला ?

**सत्य०**--माझ्या डोक्याला फांदी लागली, मला तुझ्या हृदयाशीं घट्ट धर, तूं घाबरूं नकोस, डोक्यांत भयंकर वेदना होत आहेत, माझी वाणी जड झाली, माझी शुद्ध जात चालली, मला तुझ्या हृदयाशीं घट्ट धर. ( त्याला उचलून त्याचें डोकें मांडीवर घेते. )

**सावित्री**—धरतें बरं, ब्रह्मांडाची शक्ति आणून हृदयाशीं धरतें बरं! बोलाहो माझ्याशीं बोला, मी तुमची ना ? तुम्ही माझे ना ? माझ्यावर रागावलांत होय ? मला एकटीला या रानांवनांत टाकून सोडून कसे हो जातां ? बोलाहो बोला, मीं नाहीं तुम्हांला सोडलं. हें पहा, मी तुम्हांला हृदयाशीं घट्ट कवळून बसलें आहे. ( आंचके देतो. ) हाय दुर्दैवा काळा, शेवटीं घाला घातलासच ना ? हें पहा. यांचं सर्वांग गार पडूं लागलं, धावा हो धावा, माझ्या दुर्दैवानं घाला घातला हो ! हाय हाय ! माझं जगच आटपलं ! नेत्रांनो, तुमची सर्व शक्ति एकवटून इतक्या सामर्थ्यानं माझ्या प्राणनाथाला अखेरचं पहा कीं तुमचीं बुबुळं बाहेर पडून त्याच्या खांचा झाल्या पाहिजेत ! पहाण्याचा विषयच संपला. आतां तुमच्या दृष्टीचं तरी कारण काय ! हातांनो, इतकं घट्ट आलिंगन द्या कीं माझ्या काळजाचा चुराडा झाला पाहिजे ! ओठांनो, आहे कां तुमच्यांत करामत ?

असेल तर असं चुंबन घ्या कीं, माझ्या शरीरांतील प्राणज्योत शोषून माझ्या प्रियकराला जिवंत करा, तरच म्हणेन तुमची करामत! सख्या, तू सत्यवान् ना? मग कां बरं माझ्याशीं खोटेपणा केलास! काय, मला रडतांना तुम्ही हसतां! छे, नाहीं ग बाई, माझे सखे असे निष्ठूर, नाहीं बरं मीं मिठी सोडणार! माझ्या प्रेमाच्या कवच्याचं असं पांघरूण घालून कल्पांतापर्यंत अशीच पडून राहणार. तुम्हांला नाहीं बरं सोडणार! तुम्ही जिथं तिथं मी येणार (सत्यावानाच्या आंगावर मूर्च्छा येऊन पडते).

(गवळ्याचीं पोरं येतात.)

लक्ष्या—तरी लेका राम्या, तुला म्हणालों होतों कीं गायबी चुकली नायना? आतां आपल्या थोरल्या महाराजांचीच गाय कशी या काळोखा-मंदी सांपडलीर?

रामा—हा लेका लख्या, अरे ह्योरे काय, ह्यो तर अक्षी न्यारं दिसतं या! पाहूं, पाहूं काय, आपला सत्यवंत आणि सावित्रीबाई! काय कोणी खून! अरे बापरे!

लक्ष्या--काय खून, अरे राम्या, जा जा आधी महाराजांना सांग जा. (राम्या जातो, लक्ष्या व दुसरा गवळ्याचा पोर सावित्रीस उचलून बाजूस करतात. सत्यवानाची प्राणज्योत निघून जाऊ लागते. सावित्री मागोमाग जाऊ लागते. पोरं भितीनं पळून जातात.)

सावित्री--कोण? कोण तुम्ही? कुठं हो नेतां त्यांना, नका हो नेंकां ही माझी अंधाळ्याची काठी हिरावून नका हो नेऊं! देवा, थांबा, देवा, थांबा (सत्यवानाच्या प्राणज्योतीमागें जाते. दुसऱ्या बाजूनें व्याध, सारंग-नयना, व गवळ्याचें एक पोर येतें.)

रामा--ह्यो बगा ह्यो बगा (रडत रडत.)

व्याध--बाळ रडूं नकोस. सारंगनयने शोक आंवर! मला एक वेळ राजपुत्राला पाहून परीक्षा करूं दे. सारंगनयने जा, तावडतोब पाणी आण (ती जाते.) अरे, सावित्री कुठं दिसत नाहीं. जा जा, बाळ तूं तिला शोध (रामा जातो.) कैलासनाथा, तुझी करणी अगाध आहे. सारंग-नयने, याच्या डोक्यावर पाण्याची घडी ठेव. ह्याच्या डोक्याला ह्या झाडाच्या

फांदीचा मार बसल्यामुळं रक्त डोक्यांत सांखळलं आहे. मी फांसणी टाकून रक्त थोडंसं काढून टाकतों. ही पहा माझ्याजवळ रक्तसारिणी मुळी आहे, ती उगाळून लेप देतो म्हणजे रक्त तावडतोब फांकलं जाईल.

**ट्रॅन्स्फरसीन.**

( ढगांत यम स्वर्गलोकीं रेड्यावर बसून जात असलेला. )

**सावित्री**—भगवंता, माझ्या सत्यवंताला सोडा, मीं ओलीस येते. देवा, तुम्ही प्रत्यक्ष आलांत ना ? कशाला बरं कष्ट घेतलेत हे ? ज्यांच्या इच्छामात्रें ब्रह्मांड भस्म होईल, अशा भगवंतालासुद्धां मृत्युलोकिचे दोन अनाथ केविलवाणे जीव न्यायला इतकं शस्त्रास्त्रानं का सिद्ध होऊन यावं लागतं ? खरंच देवा, आम्ही अधम बरं ! मरतांनासुद्धां देवा आम्ही तुम्हांला कष्ट दिले ना ? भगवंता—

**यम**—सावित्री, तूं भगवंता म्हणून ज्याला म्हणतेस तो मी नव्हें ! यम आहे. सत्यवानासारख्या पुण्यवान् जीवाकरतां मला स्वतःच यावं लागतं.

**सावित्री**—कोण आपण ? धर्म ? श्रीसूर्यनारायणाचे पुत्र ! अहाहा ! माझं अनंत जन्मींचं पुण्य, म्हणून या कृपाळू धर्माचे पाय दिसले. सर्व विश्वाच्या न्यायाधीशा, दयेनं ओथंबलेला न्याय, आपल्याशिवाय दुसऱ्या कोणाला बरं देतां येणार ?

**यम**—वत्से सावित्री, उठ. मी अत्यंत संतुष्ट झालों आहे. तूं फार दूरवर आलीस ! तूं पतीच्या ऋणांतून मुक्त आहेस. जा, परत जा. पतीला सद्गती मिळण्याकरितां धर्मविधींचं अनुकरण कर.

**सावित्री**—धर्मराजा, माझं आयुष्य माझ्या पतीला घालून मला या पाशानं बांधून न्या ! माझ्या पतीच्या जीवाकरतां, जर तुम्ही माझा जीव घेऊन गेलांत, तर खचित सांगतें, त्या अनंतकोटीब्रह्मांडनायकाच्या लक्षांत ही क्षुल्लक चूक येणार नाहीं.

**यम**—( स्वगत ) काय पतिप्रेम हें ! ही प्रेमाच्या अतिरेकामुळें, देवाधिदेवालासुद्धां फसवायला मला सांगत आहे ! ( उघड ) वत्से सावित्री, हे सती, सत्यवानाच्या जीविताशिवाय तुला वाटेल तो वर मागून घे !

**सावित्री**—धर्मराजा, अरे कितीरे तूं दयाळू आहेस ! देवा, वर देतांच

तर अनादर तरी कसा करूं ? "माझ्या आईबापासारख्या सासूसासऱ्यांना संपन्नता आणि दिव्यदृष्टि यावी !"

**यम**—वत्से सावित्री, जा तुला मागितलेलं वरदान दिलं !

**व्याध**—सारंगनयने, शोक आंवर. प्रयत्नाला जर यश आलं नाहीं, तर सर्व जन्म सगळ्यांना रडायला सारखाच मोकळा आहे ! मला अजून आशेचीं किरणं दिसत आहेत. तूं ह्याचे पाय चोळ, म्हणजे रक्त थोडं हालेल.

**सारंग०**—माये, या आशेला लाज नाहीं. व्याधा, तू सांगशील तसं करतें. ( पाय चोळते. )

**यम**--सावित्री, तूं अजून इथंच उभी ? घे, दुसराही वर मागून घे.

**सावित्री**--दीनदयाळा, धर्मराजा, पुत्र नसल्यामुळं माझे आईबाप खिन्न झाले आहेत.

**यम**—उभय कुलांचा उद्धार करणाऱ्या सती, तुझे मनोरथ पूर्ण होतील. जा परत फीर, आतां इथून देवतांचा प्रदेश लागेल !

**सावित्री**—आईबापापेक्षां तुम्ही ममताळू संत. छे छे, तुमच्याजवळ माझ्या पतीचे प्राण सुरक्षित असतांना मला कसलं दुःख वाटणार ? आतां मला कसले श्रम ? धर्मराजा, आमच्या मृत्युलोकीं नुसत्या दगडावर जर विश्वास ठेवला तर तो दगड देखील विश्वासाला पावतो हें सर्व जगाला ठाऊक आहे. मग तुमच्यावर जर मीं विश्वास ठेवला, तर दुःखाचा निश्वास टाकण्याची माझ्यावर पाळी येईल का ? आतां देवतांचा प्रदेश लागेल म्हणून म्हणालांत, तर यक्ष, गंधर्व, देवदेवता मला हंसतील होय ! छे, छे, धर्मासारख्या कुबेराच्या मागून, मीं माझ्या पतीकरितां, जर धावत करुणा भाकत आलें, तर ते मला अनाथाला, माझ्या केविलवाण्या वेड्या प्रेमाला हंसतील होय ! छे छे; देवा, ते मला कशाला बरं हंसतील ? ते तुम्हांला हंसतील ! जर प्रेमाच्या शक्तीचं त्यांना पाठबळ नसतं तर देवदेवता, कधीं तरी देवलोकीं राहिल्या असत्या का ?

**यम**—सती, प्रेम विश्व व्यापून उरलं आहे, आणि तेंच विश्वाचं चालक आहे. मार्कंडेय, ययाती, शिबी, मदालसा यांच्या तोडीचं

प्रेम आज मला दिसलं. सावित्री, पतीच्या जीविताशिवाय तिसराही वर मागून घे.

सावित्री--मला सारखं, परत फीर, परत फीर म्हणतां तर मीं कुठं परत फिरूं? माझं कुठं काय आहे! अनेक माझ्यासारख्या केविलवाण्या झालेल्या अबला, मृत्युलोकीं रात्रंदिवस तळमळत आहेत, आपल्या तान्ह्या लेकरांना, उराशीं कवटाळून, पतीचा विसर पडावा म्हणून जीवाची समजूत करीत आहेत. पण ह्या शुष्क झालेल्या हृदयाशीं कवटाळण्याला मृत्युलोकीं पतीच्या प्रेताशिवाय मला काय बरं राहिलं आहे! वरदवत्सला, धर्मा, ही सती पुत्रवंती व्हावी एवढंच मागणं पदर पसरून आहे.

यम—( एकदम ) तथास्तु-तथास्तु-जा परत फीर कशी!

व्याध—सारंगनयने; याचा श्वास आतां बंद पडला आहे. मी प्रयत्न करतों. कैलासनाथा, आज जर तूं यश दिलं नाहींस, तर हें एक आणि हें दुसरं, अशी दोन शिरकमलं, तुझ्या पायांवर वाहून टाकणार. आज माझी लाज राखणं तुझ्याकडे आहे.

यम—सावित्री, अजून तूं इथं! आतां मला एक क्षण देखील थांबतां येणं शक्य नाहीं, तूं किती तरी लांब आलीस! तूं पुन्हां कुठं येतेस?

सावित्री--अमृत आपला गुण टाकील, सूर्यनारायण आपला प्रकाशाचा गुण सोडील, पण त्याचा हा सत्यवंत धर्म, प्रेम कधींही टाकणार नाहीं! देवा, द्या तर माझ्या पतीचे प्राण माझ्याजवळ.

यम—नाहीं, ते केव्हांही परत मिळणार नाहींत! जा परत फीर कशी!

सावित्री—ठीक आहे, हा नमस्कार करते देवा. तुमच्या आज्ञेनं मी परत फिरतें पण— ( चार पावलें जाते. )

यम—सावित्री-थांब, पण काय?

सावित्री—देवा, माझ्या गरीबाचा काय बरं " पण " असणार! केवळ सर्व विश्वाचा जो न्यायाधीश, त्याचा निवाडा मृत्युलोकीं मी ओरडून सांगणार!

यम—सतीसावित्री काय, सांगणार तूं?

सावित्री--जगांत हेंच सांगणार, कीं अत्यंत प्रेमळ अबलांनो, कुमारी-

कांनो, भगिनींनो, पतीला परमेश्वरासारखं लेखणाऱ्या सतींनो, आज सर्व विश्वाचा जो न्यायाधीश, त्याचा असा अभिप्राय आहे कीं " व्यभिचारांत पातक नाहीं. " देवाधिदेव ज्याच्या न्यायाला मान तुकवतात, ज्याच्या निस्पृहतेला पाहून, त्रैलोक्याचा थरकांप होतो, तो प्रत्यक्ष धर्मच सांगत आहे, कीं अविचार, अनाचार, आणि व्यभिचार, हे शब्द निरर्थक आहेत.

यम—हां, हां, सतीसावित्री, ही आघोरवाणी मीं केव्हां उच्चारली ?

सावित्री--देवा, आपण नाहीं उच्चारली, पण ज्याअर्थी माझ्या पतीचे प्राण मला परत न देतां मला पुत्रवती होशील असा आपण वर दिला, त्यामुळं या मृत्युलोकच्या पापिणीला, आपला निवाडा दुसरा काय बरं वाटणार ? माझ्यासारख्या पापिणीचं मन दुसरा काय बरं अर्थ काढणार ? देवा, मी पापिणी असेन, खरंच मी पापिणी पण देवा, तुम्ही तरी सत्यवंत व्हा !

यम—( आनंदानें ) अहाहा ! तूं सती-नव्हे प्रेमाची शक्ती आहेस ! मार्कंडेयाचं जसं शंकराच्या शक्तीनं संरक्षण केलं तसंच सत्यवानाचं संरक्षण सावित्रीच्या प्रेमाची शक्ती करीत आहे. सावित्री, तूं त्रिभुवनांत धन्य होशील, इतकंच नव्हे, तर ज्या स्त्रिया, तुझ्यासारख्या जीवभावानं एकनिष्ठ पतीप्रेम करतील, त्यांच्याही पतीचे अपमृत्यु टळतील. जा, तुझा पती दीर्घायुषी होऊन, तुला मृत्युलोकींच सर्व सुख देईल ! जा आनंदानं परत जा.

सावित्री--देवा तुमच्यासारखा, दयाळु, कृपाळु दुसरा कोण बरं आहे. हा माझा अनन्य शरणांगताचा नमस्कार घ्या.

यम--हा घे तुझ्या पतीचा प्राण-( प्राणज्योत परत फिरते, मागोमाग सावित्री परत फिरते.

व्याध—( आनंदानें नाचत बागडत ) माझ्या मृत्युंजया, हें खरं का ? सारंगनयने, यानं श्वास घेतला. अग यानं श्वास घेतला ! अग हा पहा, दुसऱ्यांदा घेतला. ( द्युमत्सेन शैब्या येतात. ) अरे राजा, त्यानं श्वास घेतला, तूं ऐक, आई तूंही ऐक.

द्युमत्सेन—देवा, आम्हां दोघांचे श्वास याला दे.

व्याध—भिऊं नका, भिऊं नका, हा पहा श्वास सुरू झाला !

( सत्यवान् कण्हतो ) अरे राजा, राजा, अरे हा पहा समाधींतून जागृतींत येत असतांना सिद्ध पुरुष करीत असलेला शब्द. हें पहा याचें काळीज पुन्हां शिल्लक राहिलेलें आयुष्याचे क्षण मोजूं लागलें. आई तूं ऐक, राजा, तूं ऐक.

**द्युमत्सेन**—प्रत्यक्ष कैलासनाथच व्याधाच्या रूपानं प्रगटला कीं काय न कळे. व्याधा, आम्हीं आमचे प्राण तुझ्यावरून ओवाळून टाकले पाहिजेत!

**सत्य०**—( बसून ) कोण बाबा ? आई ? तुम्ही इथंच आहांत ? व्याधा, या मात्रा, बटवा, हे शेक, हें पाणी कशाकरितां ? बाबा, तुम्ही आजारी तर नाहीं ? बाबा, काय होतं आहे आपल्याला ?

**द्युमत्सेन**—मला हर्षवायु झाला आहे. बाळा, ये. मला तुला डोळे भरून पाहूं दे.

**सत्य०**—काय ? बाबा एकाएकी उत्तम दृष्टि झाली ? (लख्या येतो.)

**लख्या**—आईसाहेब सांपडली हो सांडपली ! तो पहा राम्या सावित्रीबाईंना घेऊन इकडेच येत आहे. ( राम्या सावित्रीला घेऊन येतो.)

**राम्या**—महाराज, ह्या त्या पलीकडच्या टेकडीवर कशा भ्रमिष्टावानी हिंडून, सत्यवान् महाराजांचा शोध करीत होत्या. येक पाऊल पुढं टाकलं असतं तर कड्यावरून खालींच कोसळल्या असत्या.

**शैब्या**—काय करणार विचारी ! दुःखानं वेडी झाली असेल !

**सावित्री**—( नमस्कार करते ) हा नमस्कार करते. ( सत्यवानास पाहून ) हें स्वप्न, कां तें स्वप्न ? का ही जागृती आणि तें स्वप्न ? का ती जागृती आणि हें स्वप्न ? कां सर्वच स्वप्न ? परमेश्वरा, मीं कशी गोंधळून गेलें आहे.

( नारद येतात. )

**नारद**—भगिनी सावित्री, विश्व हें स्वप्न आहे का जागृती आहे ? हा गोंधळ मानावा तसा आहे ! सावित्री, वंशपरंपरागत चालत आलेले संस्कार कसे नष्ट होणार ? भविष्यवाणी खरी ठरलेली पाहून दुःखवेगानें पतीच्या हृदयावर मूर्छित होऊन पडलेल्या आर्य स्त्रिला, सावित्री, दुसरं काय बरं स्वप्न पडणार ? ज्या ठिकाणीं ज्ञानाला देखील मृत्यूचं कोडं उलग-

डलेलं नाहीं, तें तुला अवलेला कसं उलगडणार! राजा, केवळ या सती सावित्रीनं सत्य आणि शील यांनीं मृत्यूशीं झगडून, त्याला प्रसन्न करून पतीकरितां संजीवनी हिरावून आणली! या परमभक्त व्याधाचा प्रयत्न आणि सती सावित्रीची अनन्यभक्ती यांनींच तुझ्या मुलाचा "पुनर्जन्म" केला आहे!

सर्व—महाराज, हे सर्व त्रिभुवनवंद्य साधूंच्या आशीर्वादांचेंच फळ आहे.

पद ३६ वें.

**जीव प्राण भारत आमुचा दास्य, मुक्त व्हावा । हिंद-जनां वरप्रसाद हाची एक द्यावा ॥ ध्रु० ॥ कलह द्वेष रोगां-तूनी देश सोडवावा । प्रेमपूर्ण स्वातंत्र्याचा " पुनर्जन्म " व्हावा ॥ १ ॥**

( श्रीगोपाळकृष्णार्पणमस्तु. )

**समाप्त**

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
दा. क. 9030 नों. दि ............
वि. नाटक. क. ............

# श्रीसरस्वती मंडळाचें प्रकाशन.

(४९५-४९६ शनिवार, पुणें नं. २)

कै. राम गणेश गडकरी

संगीत वेड्यांचा बाजार १—०—०

दे. भ. विनायक दामोदर सावरकर

संगीत सन्यस्त खड्ग १—०—०

रा. महादेव नारायण जोशी

संगीत स्थानिक स्वराज्य ०—१२—०

संगीत वऱ्हाडचा पाटील ०—१२—०

संगीत गिरणीवाला ०—१२—०

वीर वामनराव जोशी

संगीत रणदुंदुभि १—४—०

रा. लक्ष्मण बळवंत भोपटकर

नवरत्नांचा हार १—०—०

रा. भार्गव महादेव साठे

कीर्तन-कुमुदिनी १—०—०

रा. नरहर गणेश कमतनूरकर

संगीत श्री १—४—०

कै. वा. ब. केळकरकृत

चौदावें रत्न १—०—०

कॅप्टन लिमयेकृत

विनोदी लेखसंग्रह १—८—०

परचुरे पुराणीक मंडळी, बुकसेलर्स, माधवबाग, मुंबई.

लक्ष्मण नारायण गोडबोले, बुकसेलर, लक्ष्मीरोड, पुणें २.